

# माणूस

शनिवार
९ सप्टेंबर १९७२
किंमत पन्नास पैसे


अ विभाग

## मंगल मूर्ती मोरया....

गणपतीबाप्पांची भक्ती करण्याचे अनेक मार्ग आहेत. कोणी अथर्वशीर्ष म्हणतो, कोणी त्यांना दुर्वांची जुडी वाहतो तर कोणी संकष्टी करतो.—'समस्त भाचे' मंडळींसाठी मंगलमूर्तीची सेवा करण्याचा आणखी एक मार्ग आम्ही सुचवीत आहोत !

→

रंगतरंग स्पर्धा क्रमांक चार




चित्र २

## अ विभाग

‘अ’ विभागातील तीन फोटो नीट पाहा. ते फोटो आफ्रिकेतील भाग्यवान प्राण्यांचे आहेत. क्रमांक एकच्या चित्रातील सरडा पाहा. त्या सरड्याची जीभ त्याच्या शरीरापेक्षा दुपटीने लांब आहे. बच्चमजी पाहिजे तेव्हा ती जीभ बाहेर काढून दूरच्या अंतरावरील माशा वा इतर भक्ष मजेत टिपू शकतो. क्रमांक दोनच्या चित्रातील फुलपाखरू पाहा. त्याचे डोळे थेट त्याच्याजवळ ठेवलेल्या घुबडाच्या डोळ्यासारखे दिसतात. या डोळ्यांना घाबरून चिमण्या वगैरे पाखरे त्या फुलपाखराच्या वाटेला जाण्याचे धाडस करीत नाहीत. क्रमांक तीनच्या चित्रात गुलाबाचे काटे दिसतात. पण त्याच काट्यात काट्यासारखे दिसणारे दोन कीटक लपलेले आहेत. शरीराच्या या विशिष्ट ठेवणीमुळे हे कीटक बेटे मजेत दिवसभर गुलाबाच्या झाडावर सहजपणे पाने खात राहू शकतात.

आता आमची कल्पना अशी. आपल्या उंदिरमामांच्या शरीराच्या रचनेत असा एखादा बदल आपण सुचविला पाहिजे, की ज्यामुळे उंदिरमामांचे जीवन अधिक सोपे व सुखाचे होईल. तुमच्या कल्पना शक्तीला खूप त्रास द्या आणि असा एक बदल सुचवा. तुम्ही सुचविलेला हा उंदराच्या शरीराच्या रचनेतील बदल तुम्ही चित्ररूप केलात तर अधिक मजा येईल. पण ते शक्य नसेल तर दहा बारा शब्दात तो बदल लिहा.

चित्र ३



**पर्याय :**

पन्नास पैसे

शनिवार
९ सप्टेंबर १९७२

संपादक
श्री. ग. माजगावकर

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये वर्ष : बारा अंक : पंधरा
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९


## सप्रेम नमस्कार

□ माणूसने रंगतरंग स्पर्धा काढली आहे. स्पर्धा कल्पकतापूर्ण आहे. स्पर्धेच्या उत्तरपत्रिका पाठवावयाची अखेरची तारीख प्रत्येक वेळची निराळी आहे का? की सर्व स्पर्धेची मिळून एकच एक तारीख आहे? सर्व उत्तर पत्रिका एकदम पाठवल्यास चालतील का?

२७ ऑगस्ट **किशोर पेंढारकर**, मुंबई

[ माणूसची ही रंगतरंग स्पर्धा एकूण अकरा अंक चालेल. शेवटची—म्हणजे अकरावी स्पर्धा दिवाळी अंकात असेल. सर्व स्पर्धेच्या उत्तरपत्रिका (म्हणजे एकूण अकरा उत्तरपत्रिका) दिवाळी नंतर एकत्रितपणे 'माणूस' कार्यालयाकडे पाठवावयाच्या आहेत. सुटचा उत्तर-पत्रिका कार्यालयाकडे पाठवू नयेत. त्या बाद ठरवल्या जातील. संपादक ]

मुखपृष्ठ : माणूस रंगतरंग स्पर्धा क्रमांक ४ यावेळी मुखपृष्ठावर देण्यात आली आहे. स्पर्धकांनी हे मुखपृष्ठच स्पर्धापत्रक म्हणून भरावे.


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

## मुंबई वार्ता

# रजनी पटेल जाणार ?

प्रतिनिधी

मुंबईत चाललेला संप गेल्या आठवड्यात मिटला. संप मिटला आहे पण त्या संपाचे पडसाद बी. पी. सी. सी. (नवकाँग्रेस) मध्ये जोरात उमटत आहेत. वातावरण अत्यंत गंभीर बनले आहे. बी. पी. सी. काँग्रेस सदनाच्या आवारात सर्वत्र एकच कुजबूज चालू आहे, 'रजनीभाई जाणार का ?'

बॅ. रजनी पटेल यांना बी. पी. सी. सी. तून 'हाकलण्याचा' एकूण अनेकांनी चंगच बांधला आहे. श्री. पटेल यांची सारी कारकीर्दच तणातणी, कटकटींनी भरलेली आहे. सुरवातीपासूनच–पटेल कंपूने–(यात पक्षाचे चिटणीस ॲड. मेंगदे आणि उपाध्यक्ष बॅ. टी. गोदिवाला येतात) पक्ष कार्यकर्त्यांच्यात विश्वासाचे वातावरण उभे केले नाही. त्यांना विश्वासात घेतले नाही. पक्षाच्या बैठकीत कोणाला विशेष टीका करू दिली नाही. या त्रिकूटाने निर्णय घ्यावेत आणि पक्षावर बंधनकारक ठरवावेत असा सारा मामला. या लोकांनी बी. पी. सी. सी. चे रूपांतर 'बार असोसिएशन'मध्ये करून टाकले. या प्रकारांमुळे बहुतेक सारे कार्यकर्ते नाराजच असत. संधी येताच त्यांनी वेळोवेळी पटेलकंपूला नामोहरम करण्याचा प्रयत्न केला. संप निमित्ताने व बोनस प्रकरणाने आता या प्रक्रियेला शेवटच्या घटकेप्रत आणले आहे असे वाटते.

काही दिवसांपूर्वी या पर्वाला आरंभ झाला. संपात बी. पी. सी. सी. फारच बदनाम झाली, तेव्हा त्याचे वादळी पडसाद बी. पी. सी. सी. च्या सभेत उमटले. इंदुमती पटेल, भगवती श्रॉफ, नाना सावंत यांच्यासारखे नगरपिते, बॅ. छागलांसारखा वजनदार कार्यकर्ता यांनी पटेल यांच्यावर प्रखर हल्ला चढविला. पण तरीही हे सारे काही बोलायला प्रथम कोणी धजावत नव्हतं. हे सारे काम श्री. भाऊराव पाटील (अध्यक्ष युवक काँग्रेस) या पठ्ठ्याने केले. त्यांनी प्रथम याला वाचा फोडली मग इतर बोलले. बोनसचा ठराव कोणत्या परिस्थितीत झाला वगैरेबाबत काहीतरी सांगून सारवासारव करण्याचा बी. पी. सी. सी. चे उपाध्यक्ष गोदिवाला यांनी प्रयत्न केल्यावर भाऊराव पाटील उठले. बोनस प्रश्नावर पक्ष आणि काँग्रेसजन यांना काळिमा लागलेला आहे तेव्हा बी. पी. सी. सी. चे पदाधिकारी आणि काँग्रेसचे नगरसेवक यांनी राजीनामा द्यावा यावर त्यांनी भर दिला.

इंदुमती पटेल आणि भगवती श्रॉफ यांनीही स्पष्ट शब्दात सांगितले की,

त्यांचा ठरावाला विरोध होता पण पक्ष-बैठकीत त्यांना त्यावर बोलू देण्यात आले नाही. पालिका सभागृहात ठराव आल्यावर त्याला विरोध करायचा नाही, पाठिंबा द्यायचा असा व्हिप काढला असल्याने ठरावाला विरोध करता आला नाही यावर त्या दोघांनी भर दिला. संघातही नेत्यांनी चुकीचं मार्गदर्शन केलं. हे त्यांचं 'ठाम मत'.

बोनस प्रकरणाबाबत सारवासारव करताना श्री. गोदीवाला, 'आम्ही बी. पी. सी. सी. टेक ओव्हर केल्यावर' अशा प्रकारचे काही तरी शब्द पटकन बोलून गेले. अध्यक्ष रजनी पटेल हे परदेशी असल्याने उपाध्यक्ष म्हणून ते सभेचे कामकाज चालवीत होते. पण त्यांची चक्क भंबेरी उडाली होती. शेवटी पक्षाचे सचीव ॲड. व्ही. डी. मेंगदे यांना त्यांच्या मदतीला धावावे लागले.

त्यांच्या 'टेक ओव्हर'चा बॅ. छागलांनी खरपूस समाचार घेतला. त्यांनी सरळ प्रश्न टाकला. 'गोदीवाला तुम्ही टेक ओव्हरची भाषा कसली बोलता?' तुमची निवड झाली आहे. तुम्हाला कोणीतरी नियुक्त केलं आहे. जरा लोकशाही मार्गाने चला की. बोनस ठरावावरील तुमचा निर्णय पक्षाचा निर्णय नव्हता. तो तीनचार पदाधिकाऱ्यांचा निर्णय होता. तेव्हा हा निर्णय तुमचा होता हे जाहीर करा, लोकांना तुमची चूक कळू द्या!

या साऱ्या मामल्यात तीन अंतर्गत गट जोरात प्रयत्न करीत आहेत. सध्याच्या मंत्रीमंडळातील दोन मंत्री, विशेषतः एक गुजराती भाषिक मंत्री रजनी पटेल यांच्या विरूद्ध काही कारस्थाने करीत असल्याचे विश्वसनीयरित्या कळले आहे. दुसऱ्या गटाचे नेते एक माजी महापौर असून भगवती श्रॉफ, इंदुमती पटेल, जयंतीलाल पारेख यांच्या तर्फे पटेलांना उडवायच्या कारवाया ते करीत आहेत. तर श्री. भानुशंकर याज्ञिक यांचा गट तिसरा पण अत्यंत प्रबळ आहे. या गटात बी. पी. सी. सी. चे एक उपाध्यक्ष व खासदार डॉ. एम्. आर. व्यास, खासदार भांडारे, खासदास कैलास व

यापुढील अंक

# छोटा दिवाळी अंक

पुढील अंकी

स्नेहप्रभा प्रधानांच्या

आत्मचरित्रातील

काही पाने....

# छोटा
# दिवाळी अंक

# माणूस

खासदार कादर हे असल्याचे म्हणतात. यांना ए. आय. सी. सी. च्या हाय कमांडमधील बडयांचे आशीर्वाद आहेत असे ऐकीवात आहे. कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. शंकर दयाळ शर्मा यांना रजनी पटेल कधीच मान्य झाले नव्हते. तेव्हा, डॉ. शर्मा, बाबूजी जगजीवन राम आणि उमा शंकर दीक्षित यांचे आशिर्वाद या गटाच्या मागे आहेत असे दिसते. हे गट वेगवेगळे असले तरी त्यांचे अंतिम ध्येय रजनी पटेलांना उडविणे हेच आहे. बी. पी. सी. सी. तील बहुसंख्यांकांचे अगदी ठाम मत आहे की पटेल कंपूच्या भूमिका सुरुवातीपासूनच चुकीच्या होत्या. त्यांनी बऱ्याच घोडचुकाही केल्या, त्यांची कृती, आडाखे संपूर्णपणे कोसळले आणि जनता व हा कंपू एकमेकांपासून दूरच जात राहिली तेव्हा कसलेल्या कार्यकर्त्यांचीच पदाधिकारी म्हणून नेमणूक व्हावी.

बोनस आणि संप प्रकरणाने (आणि अथाईडवाईच्या पटेलांविरुद्धच्या उपोषण प्रकरणाने) रजनी पटेलांची इंदिराबाई कडील पत कमी झाली आहे. संप प्रकरणी तर त्यांनी रजनी पटेलांची चांगलीच कान उघडणी केली, असं ऐकतो.

यातच कार्यकर्त्यांच्या नाराजीत भर पडण्याचे एक कारण घडले. १५ जून ते ३१ जुलैपर्यंत पक्ष सदस्य करण्याची मोहीम हाती घेण्याचा आदेश दिल्लीहून आला. ए. आय्. सी. सी. ने ती मुदत वाढवून १५ ऑगष्टपर्यंत केली आणि पावती पुस्तके परत करण्यासाठी चार दिवसांचा अवधी कार्यकर्त्यांना दिला. असे म्हणतात की या साऱ्या नियमांना हरताळ फासून श्री. पटेल यांनी बी. पी. सी. सी. वर आपली पकड कायम ठेवण्याचा भाग म्हणून आपल्या खास कार्यकर्त्यांकरवी, गुप्तरीत्या त्यांना अनुकूल असलेल्यांना सदस्य करण्याची मोहीम हाती घेतली. पावत्यांवर मागच्यातारखा टाकण्यात आल्या. शेवटी इतर कार्यकर्त्यांना कळायचे ते कळलेच आणि कार्यकर्ते संतापले. तेव्हा रजनीभाई गेल्याशिवाय किंवा त्यांना घालविल्या, शिवाय ही मंडळी शांत होतील असं दिसत नाही.

याच वेळी इंटकच्या कार्यकर्त्यांनीही उचल खाल्ली आहे. तेथूनही रजनीभाईंना हाकलण्याचा प्रयत्न चाललेला दिसतो आहे. एकूण काय पटेलांना दिवस बरे नाहीत असं दिसतं.

सध्या भानुशंकर याज्ञिक यांचं पारडं बरंच जड झाल्याचं दिसतं. इंदिराजींनाही ते ॲक्सेप्टेबल आहेत असं म्हणतात. चव्हाण स्वस्थ आहेत पण त्यांनाही याज्ञिक पसंत पडतील असं दिसतं. ते पुन्हा अध्यक्ष होतील किंवा त्यांचा माणूस बी. पी. सी. सी. चा अध्यक्ष होईल अशीच बरीच शक्यता आहे. ॲड. माधवराव परांजपे यांचेही नाव अध्यक्ष पदासाठी घेतलं जात आहे. नोव्हेंबरातील पार्टी निवडणूकांपूर्वी रजनी पटेलांना जावेच लागेल असं दिसतं. बाई त्यांना परदेशी पाठवतील असा अंदाज आहे.

□ □ □

## दिल्ली वार्ता

# वेस्टर्न कोर्टातील कुणी एक
# के. एम्. जोशी

निळू दामले

दिल्लीच्या वेस्टर्न कोर्टमध्ये एक माणूस रहातो; चोरून. त्याचा खून होण्याची भीती आहे. ओळखीचा माणूस असल्याशिवाय हा माणूस फोनवर बोलतही नाही. फोनवरून त्याला सारख्या धमक्या दिल्या जातात.

ह्याची बायकामुले व परिवार मुंबईत आहे. तेथेही कायम भीतीचे सावट पसरलेले. केव्हाही फोन करा, घरी नाहीत असेच उत्तर मिळणार. घरी गेलात तरी हजार वेळा चौकशी करून मगच घरात प्रवेश. कारण मुंबईतही ह्याच्या पाठी कोणी ना कोणी-तरी लागलेलेच असते.

दिल्लीत असताना कोणीतरी ह्या माणसाच्या अंगावर ८।१० पौंडांचा गोळा फेकून मारला होता. नशीब बल-वत्तर म्हणूनच तो वाचला. तेव्हापासून अगदी जवळच्या मित्राबरोबर हा माणूस बाहेर जायला तयार होतो, तेही क्वचितच.

हा कोणीतरी आंतरराष्ट्रीय स्मगलर असला पाहिजे किंवा भूमिगत जगातला एकादा दादा तरी असला पाहिजे अशीच माझी कल्पना झाली. एका नव्या जगाची ओळख होईल म्हणून त्याची गाठ घ्यायला वेस्टर्न कोर्टमध्ये गेलो. पण निराशाच पदरी आली. अगदी तुमच्या आमच्या सारखाच माणूस निघाला.

का म्हणून त्याला सारख्या खुनाच्या धमक्या ? हा कोणी खरेच स्मगलर होता ? नाही ! गुन्हेगार होता ? होय.

काय गुन्हा केला त्याने ?

राष्ट्राच्या सुरक्षिततेशी जुगार खेळू मागणाऱ्या लोकांशी झगडला हाच त्याचा गुन्हा !

हेच एक मोठे पुराण आहे. ज्याचे अनेक अध्याय अजून सापडलेले नाहीत आणि जे सापडले आहेत ते झोप उडव-णारे आहेत ! पाईप लाईन प्रकरण या नावाने सध्या ते दिल्लीत गाजते आहे.

आसामच्या तेलाच्या साठ्यांपासून बरौनीच्या तेल शुद्धीकरण कारखान्या-पर्यंत एक तेलाची पाईप लाईन होती ! आहे. आसामचे अशुद्ध तेल बरौनीला येऊन शुद्ध होते. हेच शुद्ध तेल भारत-भर जाते आणि विशेषत: आपल्या उत्तर सरहद्दीवर विमाने, रणगाडे व लष्करी वाहनांना त्याचा पुरवठा केला जातो.

१९६२ च्या चिनी आक्रमणाच्या वेळी एक अत्यंत महत्त्वाची बाब ध्यानात आली. ही पाईप लाईन उत्तर सरहद्दीच्या जवळ आहे, चीनच्या

हल्ल्याच्या टप्प्यात आहे. ही लाईन जर उद्ध्वस्त झाली तर उत्तरेकडली सर्व संरक्षण-व्यवस्था कोसळून पडेल. ह्या धोक्याची जाणीव झाल्याबरोबर आपल्या मंत्रिमंडळाने निर्णय घेतला—एक पर्यायी पाईप लाईन टाकण्याचा. जेणेकरून समजा गौहत्ती-बरौनी पाईप लाईन नष्ट झाली तरी दुसऱ्या मार्गाने तेल आणता यावे. कलकत्त्याजवळच असलेल्या हल्दीया बंदरापासून बरौनीपर्यंत ही लाईन असावी. आणीबाणीच्या वेळी समुद्रमार्गे तेल आयात करून ते बरौनीला ह्या लाईनद्वारे पाठवावे. हा त्या मागचा उद्देश आणि ह्या लाईनची तेल पाठवण्याची क्षमता वर्षाला ३० लाख टन एव्हढी असावी असाही निर्णय जानेवारी ६३ मध्ये मंत्रिमंडळाने घेतला. ह्या पाईप लाईनचे सामाजिक महत्त्व लक्षात घेऊन ह्या प्रकल्पाला अग्रक्रम देण्यात आला आणि युद्ध पातळीवरून हा प्रकल्प हाताळला जाऊन तातडीने डिसेंबर १९६४ पर्यंत तो पूर्ण केला जावा असाही निर्णय झाला. तेव्हढे महत्त्व ह्या प्रकल्पाला निःसंशय होते. कारण चीनचा धोका कमी झालेला नव्हता. त्यांच्या हालचाली सतत वाढत्या प्रमाणावर होत होत्या.

हा घटनांच्या सुरुवातीचा बिंदू. शेवट काय झाला? ६४ साली पूर्ण व्हावयाचा हा प्रकल्प ६८–६९ मध्ये व तोही अनेक दोषांसह जेमतेम पूर्ण झाला. आजही त्यात अनेक उणीवा आहेत. ३० लाख टन तेल वाहून नेणाऱ्या या लाईनमधून जेमतेम १७ लाख टन तेल जाऊ शकते. करोडो रुपयांची अफरातफर व अनाठायी खर्च झाला आहे. दुर्मिळ परकीय चलनाचा दुरुपयोग झाला आहे.

६२ नंतर चीन सतत युद्धाचा पवित्रा घेऊन आहे. ६५ साली आपण पाकिस्तानशी युद्ध खेळलो, ज्यावेळी पाकिस्तान-चीनचे संबंध आपल्याला दटावत होते. परवाचे बंगला युद्धही आपल्याला खेळावे लागले. अशा ह्या ८ वर्षांच्या काळात ह्या पाईप लाईनचे काम कूर्मगतीने चालले होते. पैशाची उधळमाधळ चाललीच होती. कोणालाच ह्या सामाजिक महत्वाच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची फिकीर नव्हती. सगळीकडे ऐषआराम, आनंदीआनंद व परदेश वाऱ्या चालूच होत्या. आक्रमण होऊन बरौनी-गोहत्ती लाईन नष्ट झाली असती तर?

ह्या दोन बिंदूंना जोडणारी रेषा सरळ आहे काय? फार वाकड्या तिकड्या वळणांनी घटना घडत गेल्या.

२६–२७ कोटींचा हा प्रकल्प. त्यात ११ कोटींपेक्षा जास्त रुपये परकीय चलनात खर्च होणार होते. पुन्हा संरक्षणाशी संबंधित. कोणाला कंत्राट द्यायचे? कायदेशीर प्रथा आहे टेंडर्स मागवण्याची. ही प्रथा डावलली गेली आणि स्नाम व बेचेल अशा दोन कंपन्यांना कंत्राट देण्यात आले. सरकारला हे माहीतही नाही! इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. नायक स्वतः व्यक्तिशः त्या कंपन्यांशी

संपर्क राखतात, त्यांच्याशी बोलणी करून परस्पर निर्णय घेतात, आय. ओ. सी. च्या डायरेक्टर बोर्डाला बाजूला सारून त्यांना कळू न देता आय्. ओ. सी. चा निर्णय म्हणून सरकारला कळवूनही टाकतात ! ही तऱ्हा. कशासाठी त्यांना कंत्राट देण्यात आले ? त्यांच्यापेक्षा कमी पैशात, कमी दिवसात आणि जास्त चांगली डिझाईन्स देऊ शकणाऱ्या इतर अनेक कंपन्या पुढे आल्या असतानाही त्यांना कंत्राट का देण्यात आले ? कारणे जितकी उघड आहेत तितकीच कागदावर न लिहिण्यासारखी आहेत !! बेचेल कंपनीला कंत्राट दिले नाही तर माझी जगभर बदनामी होईल – कारण मी त्यांना शब्द दिला आहे – ह्या शब्दात बेचेल कंपनीला कंत्राट द्यायला सरकारला भाग पाडले, श्री. पी. आर. नायक यांनी ! ह्याचा अर्थ काय होतो ? ज्या प्रकल्पांचा खर्च १० कोटींपेक्षा जास्त आहे व ज्या प्रकल्पात ५ कोटींपेक्षा जास्त खर्च परकीय चलनात करावा लागेल अशा प्रकल्पांबाबत लोकसभेने काही सूचना आणि विशिष्ट नियम घालून दिले आहेत. त्यातून संरक्षण-संबंधित प्रकल्पांची तपासणी आणखी जास्त दक्षतेने होते. पाईप लाईनचा प्रकल्प अत्यंत गुंतागुंतीचा आहे. त्यात असंख्य तांत्रिक, स्थापत्य-विषयक व अन्य शास्त्रीय तपशीलांना फार महत्त्व आहे. अशा ह्या प्रकल्पाचा आराखडा ह्या दोन कंपन्यांनी तयार करून दिला. त्यात असंख्य चुका होत्या तपशील नव्हता. थातुर-मातुर करून सरकारच्या गळ्यात कागद मारण्याचाच तो प्रकार होता.

३० लाख टनांची क्षमता असावी हा सरकारचा निर्णय. पण बेचेलनी दिलेल्या आराखड्यात पाईप लाईनच्या क्षमतेबद्दल उल्लेखच नाही ! १०० रुपयाला गव्हाचे पोते असा सौदा करायचा पण पोत्यात किती किलो गहू असतील ते मात्र सांगायचेच नाही तसलाच प्रकार. पण तरीही तो अहवाल स्वीकारला गेला. पाईप लाईनचा हा प्रकल्प; पण नेमके किती पाईप लागतील ह्याचा उल्लेख नाही. तेल साठविण्याची काय व्यवस्था, तेल पाईपात सोडण्यासाठी पंप किती लागतील, अशा साध्यासुध्या गोष्टींचाही अंतर्भाव करारात नव्हता आणि खर्चाचे आकडे मात्र अव्वाच्या सव्वा देण्यात आलेले होते.

बेचेल कंपनीने इंडियन रिफायनरीजला पाठवलेल्या २४।८।६३ च्या पत्रात कबूल केले, की त्यांनी पाठवलेल्या करारात अनेक उणीवा आहेत, दोष आहेत. पण ते कोणामुळे आहेत ते मात्र सांगता येत नाही. हा तर दुसऱ्याच्या तोंडाचा वास घेण्याचाच प्रकार. ही जबाबदारी कंत्राटदाराचीच असते. तरीही त्या पत्राच्या शेवटी निर्लज्जपणे त्या कंपनीने खर्च वाढणार आहे असे सूचित करून ठेवले !

ह्या प्रकल्पाचा आराखडा तयार करायला बेचेल–स्नाम कंपनीला २ महिने लागले. पण पेट्रोल व रसायन, संरक्षण, अर्थमंत्रालय, आय. ओ. सी., आय. आर. एल. आणि भारतसरकारचे प्रशा-

सन मंत्रालय अशा सर्वांनी फक्त ३ आठवड्यात ह्या आराखड्याची तपासणी केली आणि मंजूर करून टाकला—दोषांसकट.

पेट्रोलियम व रसायनखात्याचे त्यावेळचे मंत्री श्री. आनंदराव चव्हाण आपल्या अहवालात म्हणतात, 'ह्या प्रकल्प नेमका कसा आहे, कसा होणार आहे ह्याची क्षमता किती राहणार आहे, तेच कळत नाही. कंत्राटदारांनाही काम अपूर्ण व दोषास्पद केल्याबद्दल दोषी धरता येणार नाही. इतक्या गोंधळात सरकारला टाकण्यात आले आहे. ह्याला जबाबदार अधिकारी गुन्हेगार आहेत.'

काम रेंगाळत होते. फाईली इकडून तिकडे जात होत्या. शेरे लिहिले जात होते. कारभार मात्र मजेत चालला होता.

मधेच टूम निघते, की कलकत्ता ते बरौनी अशी एक लाईन न टाकता दोन टाकाव्यात. खर्च वाढतो असे दिसल्यावर पुन्हा एकच टाकण्याचा निर्णय. त्यातूनच एकदा एका दिशेने शुद्ध व नंतर दुसऱ्या दिशेने अशुद्ध तेल पाठवण्याचा निर्णय. मग लक्षात येते, की अशुद्ध तेल एकदा नेल्यावर मागून शुद्ध तेल नेले तर शुद्ध तेलाचा दर्जा खराब होईल. पुन्हा तो निर्णय रद्द. घोळ चालूच.

१९६३ मधे बेचेलकडून मूळ आराखड्यात सुधारणा येतात. १३ कोटी रुपये आणखी पाहिजेत. ५।७।६३ च्या आय ओ. सी. च्या डायरेक्टर बोर्डाच्या बैठकीत त्या सुधारणा मांडल्या जातात केवळ तोंडी. पी. आर. नायकांचा कारभार. त्या बैठकीला अजेंडाही नाही. आणि बोर्ड वाटाघाटीचे सर्व अधिकार नायकांना देऊन टाकते. मग नायक अर्थखात्याचे सचीव श्री. दामले यांच्याशी फोनवरून व गप्पांतून बोलतात. आय. ओ. सी. चा निर्णय झाला म्हणून सांगतात. दामले तो मान्य करतात. मग तो निर्णय सरकारचा होऊन जातो. कारण दामले म्हणजे सरकारचे प्रतिनिधी, प्रशासन मंत्रालयाचे सचिव. त्यांचा निर्णय म्हणजेच सरकारचा.

खर्चाच्या तपासणी, विश्लेषणासाठी नेमलेल्या निगोशियेटिंग कमिटीपुढे ही १३ कोटी रुपयांची बाब जाणे आवश्यक होते. तशी विचारणाही लोकसभेच्या त्या समितीकडून झाली. त्यावर दामले यांनी कळवले, की निगोशियेटिंग कमिटीपुढे जाण्याची आवश्यकताच काय? आमच्या कारभारात नाक खुपसले जाऊ नये. कारण सरकारचा एकूण प्रकल्पखर्चाचा निर्णय झालेला आहे असे दामले आपल्या २५।७।६३ च्या पत्रात म्हणतात. पण प्रत्यक्षात ८।५।६३ पर्यंत स्नाम कंपनीने सरकारला अहवाल दिलेलाही नव्हता!

तरी पैसे मंजूर झाले. वाटले गेले. सुधारित आराखडा विनाकारण बनवण्यात आला त्यामुळे त्यांनी दाखवलेल्या खर्चाव्यतिरिक्त आणखी ६ ते ७ करोड रुपये सरकारला खर्च करावे लागले.

ह्या पाईपलाईन प्रकल्पावर नेमके किती पैसे खर्च झाले त्याचा अंदाज अजूनही लागलेला नाही. लागणार तरी

कसा ? खर्चाचे प्रकार तरी काय ?

बेचेलचे एक अधिकारी दिल्लीतला २७ दिवसांचा हॉटेलचा खर्च दाखवतात रु. ७००९, तर दुसरे १०,१९९ रु. आणखी एकाने आपल्या कुटुंबियांसह सर्वांचा भटकण्या-फिरण्याचा एक महिन्याचा खर्च दाखवला ९०४५ रुपये. कसा ? कशासाठी ? वगैरे विचारणा नाही. खर्च मंजूर ! पाईप लाईन होणार हिंदुस्थानात. वॉशिंग्टन किंवा जिनेव्हाशी काय संबंध ? पण ओसरके नावाच्या एका सद्गृहस्थाने वॉशिंग्टन ते जिनेव्हा असा विमान खर्च रु. २४०३ मागितला आणि त्याला तो दिला गेला.

इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर कमलजित सिंग उपचार करून घेण्यासाठी ५००० डॉलर्स घेऊन न्यूयॉर्कला गेले. उपचार करून परत आल्यावर आणखी १ लाख ५० हजार रुपयांचे बिल आय. ओ. सी. पुढे ठेवले. त्यांनाही सर्व पैसे मिळाले. ह्याला आक्षेप घेणाऱ्या भारत सरकारच्या एका अंडर सेक्रेटरीला शारीरिक दुखापत करण्याचा प्रयत्न झाला !

खर्च कोण, कसा करते याला काही ताळमेळ नाही, धरबंद नाही. सार्वजनिक उपक्रम समिती (केंद्रीय सरकार) आपल्या ६६ व्या अहवालात नमूद करते, की हल्दीया बरौनी प्रकल्पात झालेल्या आर्थिक घडामोडीबद्दल पूर्ण ६ वर्षे लोकसभेला अंधारात ठेवण्यात आले आहे. सरकारचे ह्या प्रकल्पात आर्थिक वा प्रशासन कोणत्याही बाबीत नियंत्रण असलेले दिसत नाही.

या अहवालाला अर्थातच केराची टोपली हीच योग्य जागा मिळाली !

आणि का नये मिळू ? केराची टोपली आणि मोटारचे गॅरेज ह्या तर कागदपत्र ठेवण्याच्याच जागा आहेत. कारण श्री. नायक यांनी मिलानला जाऊन केलेल्या महत्त्वाच्या वाटाघाटींचे कागदपत्र एका अधिकाऱ्याला नायकांच्या मोटर गॅरेजमधूनच शोधून काढावे लागले. फाईलींचे अनेक कागदपत्र गहाळ असणे, फाईलींवर क्रमांक नसणे, पत्रावर जावक क्रमांक व तारीख नसणे हे तर आय. ओ. सी, आय. आर. एल. च्या कारभाराचे प्रमुख लक्षण ! मंत्रालयातल्या, बोर्डाच्या बैठकांची मिनिट्सच न ठेवणे, त्यावर तारखा नसणे, मिनिट्स असलीच तर ती दिशाभूल करणारी आणि पक्षपाती अशीच असणे हीसुद्धा त्यांच्या कारभाराची आणखी खास वैशिष्टये. तरीही काम मात्र यूद्धपातळीवरूनच चालले आहे !

ह्यापेक्षा वेगळे तरी काय होणार ? श्री. दामले, श्री. नायक आदि असंख्य आय. सी. एस. अधिकारीच सर्व ठिकाणी सूत्रे हलवतात. ज्यावेळी देशात इंग्रजांना चले जावचा निर्वाणीचा इशारा देण्यात आला होता, सुभाषचंद्र बोसांसारखे बुद्धिमान कर्तबगार लोक आपल्या आय. सी. एस.वर लाथ मारून इंग्राजांशी दंड थोपटून उभे होते, त्यावेळीच वा त्या आधी इंग्रजांची इमाने इतबारे सेवा करू मागत होते असे हे लोक ! त्यावेळीही देशापेक्षा त्यांना पैसा जास्त वाटत होता; प्रतिष्ठेची

भूक त्यांना लागली होती. नेटिव्हांपेक्षा इंग्रज जवळचे वाटत होते. हे आहेत आय. सी. एस. अधिकारी; त्यावेळचेच. आजही त्यांना पैसा, प्रतिष्ठा हवी वाटल्यास नवल काय? त्यावेळीही त्यांना देशाची मातब्बरी नव्हती, मग आता असण्याचे कारण काय ?

देशाची फिकीर वाटते वेस्टर्न कोर्टात तळमळणाऱ्या त्या के. एस. जोशीला. म्हणून तो कच्छ आक्रमणाच्या वेळीही सावधगिरी बाळगतो. हल्दीया बरौनी पाईप लाईन आसनसोलच्या कोळशाच्या खाणीतून जाणार, त्या खाणीत निर्माण होणाऱ्या अत्यंत ज्वलनक्षम वायूमुळे तेल वाहून नेणाऱ्या पाईप लाईनला धोका होणार म्हणून आपल्या वरच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनाला सर्व गोष्टी आणून देतो. तरीही पाईप लाईन असनसोलवरूनच नेण्याचा निर्णय होतो. हा जोशी, तो निर्णय बदलला जावा, देशाची ही नाजुक रक्तवाहिनी वाचावी म्हणून अधिकाऱ्यांशी भांडतो, धडपडत राहतो. त्याच्या पदरी निराशाच येते. ह्या गरीब देशाला पैशाची उधळपट्टी परवडणार नाही ह्याची त्याला जाणीव आहे. म्हणून पाईप लाईन असनसोलच्या बाजूने हल्दीयाला न्या; रूद्राणीवरून नेऊ नका, त्यातून तुमचा १ करोड रुपयांचा खर्च वाचेल असे तो निक्षून सांगतो. रुद्राणीला वळसा घालून हल्दीयाला लाईन नेण्याचा द्राविडी प्राणायाम कसा चुकीचा व अनाठायी आहे हे लहान मुलगासुद्धा सांगू शकेल. पण परिणाम काय होतो ? पाईप लाईन धोक्याच्या राणीगंज कोळसा खाणीच्या प्रदेशातून आणि रूद्राणीला वळसा घालूनच जाते.

जोशी हा माणूस सामान्य माणसाचा प्रतिनिधी. त्याची हालतही सामान्य माणसासारखीच होते. त्याची नोकरीतून मुक्तता होते. त्याला अशाश्वततेच्या, मृत्यूच्या गर्तेत फेकून देण्याचे प्रयत्न होतात. त्याच्या कुटुंबाला देशोधडीला लावण्याचे प्रयत्न होतात. केवळ त्याची ह्या देशावर निष्ठा आहे म्हणून, सामान्य माणसाप्रमाणेच.

देशाच्या संरक्षणाशी, जनतेच्या जीविताशी खेळ खेळणारे, पैशाच्या चवीला चटावलेले लोक मात्र आपापल्या जागेवर मजेत राहताहेत, हवा पालटीसाठी परदेशवाऱ्या करताहेत, मस्तीत आणि गुर्मीत जीवन जगत राहताहेत.

□ □ □

---


# माणूस

यापुढील अंक

# छोटा दिवाळी अंक

## सांस्कृतिक मुंबई

# अभिवादन साहित्यसम्राटांना

विनय धुमाळे

अहो, ती समोरची शांतारामाची चाळ आहे ना, अगदी तेथेच, बसल्या जागेवरून बोट दाखवून साहित्य संघाचे अमोणकर मला सांगत होते, 'अहो काय सांगू कितीही फतरूड भाषण असेना १९४०, ४२ च्या सुमाराला, त्या एवढ्या छोट्या चाळीत जरी भाषण असले तरी लोक अक्षरशः हजारांच्या संख्येने जमायचे आणि तीन तीन तास तन्मयतेने भाषण ऐकायचे. छपरावर सुद्धा लोक बसायचे. आजकालच्या मुलांना काय! एवढी चांगली आम्ही न. चिं. केळकर व्याख्यानमाला आयोजित केली तर त्याला हॉल भरण्याएवढीही माणसे येऊ नयेत. आणि काय हो तुमचे ते युवक युवक म्हणतात त्यांना काय झालंय यायला? अक्षरशः ज्ञानामृत वाहतंय इथे आणि या तरुणमुलांपैकी एकालाही त्यात रस असू नये. त्यांना काय आता आम्ही घरी जाऊन भाषणे ऐकवू. आणि दुसरी ही तुमची वृत्तपत्रे आणि साप्ताहिके. कुठल्या चांगल्या गोष्टींना प्रसिद्धी द्यावयाची नाही 'हे बाकी त्यांना चांगले समजते.' एकंदरीत अमोणकर बरेच बिघडले होते. सहाजिक आहे. त्यामुळे युवक वर्गातर्फे आणि साप्ताहिकातर्फेच मी भाषण ऐकायला आलो होतो म्हटल्यावर मात्र ते बरेच शांत झाले. पण मला कळेना की कीव कोणाची करावी? फतरूड भाषणे तीन तीन तास ऐकणाऱ्यांची की असल्या व्याख्यानमालेकडे दुर्लक्ष करणाऱ्यांची?


साहित्य सम्राटांना अभिवादन करण्यास्तव यावेळी मुंबईतल्या तीन ख्यातनाम संस्था एकत्रित आल्या होत्या. (हे ही काय कमी झाले?) मुंबई मराठी

साहित्य संघ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय व लोकमान्य सेवा संघ-पार्ले. या तीन संस्थांनी मिळून गिरगाव, दादर व पार्ले अशा तीन ठिकाणी न. चिं. केळकर व्याख्यानमाला आयोजित केली होती. त्यातले व्याख्याते होते सर्वश्री पां. वा. गाडगीळ, श्री. शं नवरे, त्र्यं. वि. पर्वते आणि प्रा. व. दि. कुलकर्णी. ते अनुक्रमे केळकर व तत्कालीन राजकारण, वृत्तपत्रकार केळकर, केळकर : वृत्तसंपादन व केळकरांचा साहित्य विचार या विषयांवर बोलले. प्रत्येक वक्त्यानी अगदी कसून तयारी केली असल्याने सगळीच व्याख्याने अत्यंत माहितीपूर्ण व उद्‌बोधक झाली. गाडगीळांनी टिळकांच्या वेळी केळकरांचे राजकारणात स्थान काय होते व त्याला गांधीयुगात कसे ग्रहण लागले याची सुरेख चर्चा केली. व त्यामुळे शेवटी शेवटी गांधींबाबत केळकरांचा दृष्टिकोन कसा वस्तुस्थितीस धरून नव्हता याचेही परखड विवेचन केले.

वृत्तपत्रकार केळकर व केळकर वृत्तसंपादन या दोन विषयांत पण वक्त्यांनी बरीच गोडी आणली. आजकालचे बरेचसे संपादक कसे केवळ संकलक असतात आणि संपादनाची जी काही वैशिष्ट्ये असतात ती केळकरांच्यात कशी प्रामुख्याने दिसत होती. आलेला मजकूर ते संपादक या नात्याने कसे 'प्रोसेस' करायचे यावर सुरेख विवेचन झाले. त्याचवेळी १८९६ मध्ये साताऱ्याच्या दुष्काळाची बातमीपत्रे किती कौशल्यांनी पाठवली व सरकारला

या अंकापासून
(अ)नियमितपणे
सुरू होत आहे.

श्यामरावांची
दैनंदिनी



अडचणीत टाकणारी माहिती कशी मिळवली ही माहिती अत्यंत रंजक होती व वृत्तपत्रकारकीर्दीत एकदाही सरकारच्या कचाटयात न सापडता (एक छोटासा अपवाद सोडता) लोकजागृतीचे कार्य किती समर्थ-पणे केले याची माहिती दिली. त्या संबंधातच बोलताना श्री. वा. रा. ढवळयांनी सांगितले, की केळकरांचा संपादक म्हणून बराच विचार झाला. पण स्वत: केळकरांनी एके ठिकाणी संपादकाची व्याख्या दुसऱ्याच्या बायका शृंगारणारा अशी केली होती. दुसऱ्यांच्या लेखावरती प्रक्रिया करण्यासंबंधीचे त्यांचे वरील विधान त्यांच्या तीक्ष्ण विनोदबुद्धीचीच साक्ष देते.

व. दीं. नी केळकरांचा साहित्य विचार यावर भाषण केले व प्रत्यक्ष जरी प्रथम प्रथम त्यांनी ललित साहित्यात ॲक्टिव्ह भाग घेतला नाही तरी अग्रलेखातून वारंवार निरनिराळ्या पुस्तकांवर लिहून अथवा अनेक पुस्तकांना प्रस्तावना देऊन त्यांनी याही क्षेत्रात आपला ठसा उमटवला होताहे सांगितल. १९२१च्या बडोद्याच्या साहित्य संमेलनात साहित्याची व्याख्या सविकल्प समाधी अशी करून मोठ्या मोठ्या पंडितांनाही कसा धक्का दिला व ती व्याख्या अजूनही किती महत्त्वाची आहे याचे विवेचन केले.






एकंदरीत ही चारही भाषणे अत्यंत माहितीपूर्ण अशी होती. वक्त्यांची तयारी पाहिली आणि साहित्यसम्राटांना त्यांचे अभिवादन किती मनापासून होते याची खात्री पटली. त्यामुळे अशा भाषणाला एकही तरुण दिसला नसल्यास आयोजकरांना खेद वाटला असणे साहजिक आहे. ◻

## इथे होता तरुण वर्ग

हा सगळा तरुण वर्ग होता तरी कुठे ? साधं उत्तर आहे. फोक डान्सच्या गडबडीत. षण्मुखानंद हॉलमधे दिनांक २८ ला आंतर महाविद्यालयीन फोक डान्स स्पर्धा होती. आयोजक होते ज्युनिअर चेंबर्स. खरं सांगायचे तर ही संस्था आता बरीच मूळ धरू लागली आहे आणि त्यांची ही स्पर्धा पण मूळात अत्यंत लोकप्रिय होऊ लागली आहे. षण्मुखानंदसारखा हॉल पण खच्चून भरावा हीच त्या कार्यक्रमाच्या यशाची पावती होय. बाहेर तर जणू फॅशन आणि सेंट परेड चालली होती. मनगटा-पर्यंत येणाऱ्या ब्लाऊजपासून ते जवळ जवळ टॉप लेस–मार काही बघायला मिळत होतं. (गर्दीचे हेही एक कारण असावे).

या स्पर्धेत अनेक कॉलेजांनी भाग घेतला होता व मुंबईच्या के. सी.







कॉलेजला भांगडा नृत्याबाबत प्रथम पारितोषिक मिळाले. सारीच नृत्ये फार चांगली झाली. व्यवस्थापन अत्यंत व्यवस्थित होते. पण...मला वाटतं इथं लिहायलाच हवं. ही ज्युनीअर चेंबर्स ही उद्योगपतींनी मिळून स्थापन केलेली संस्था आहे. त्यामुळे या संस्थेला पैशाचा तोटा नाही. पण कितीही पैसा मिळाला तरी माणसाला सोशल मान्यता मिळावीच असं वाटतं. त्यामुळे या संस्थेत काम करणारी मंडळी बरीच आहेत आणि खरोखर उत्साही आहेत. पैसा भरपूर, संघटना सुरेख, अशा स्थितीत त्यांनी केवळ फोक डान्सेससारख्या कार्यक्रमावर समाधान मानावं याचा विषाद वाटतो. ज्युनिअर चेंबर्सची शक्ती बघता त्यांनी फक्त एवढेच करणे म्हणजे एखाद्या भल्या मोठ्या क्रेनने साधी बादली उचलण्यासारखे आहे. आजची वेळही अशी आहे की प्रत्येकाला सामाजिक दृष्टी ही हवीच. आज ज्यांच्याकडे थोडेबहुत आहे आणि जे दुसऱ्यांना काही देण्याच्या परिस्थितीत आहेत, त्यांनी केवळ असले कार्यक्रम भरवून त्याच्या यशात मश्गूल होणे हे विचित्र वाटते. आज मुंबईमध्ये खरोखर एवढी दुःखी अंगे आहेत, दुःखी मने आहेत. कीं ज्युनिअर चेंबर्ससारख्या मातबर संस्थांनी त्यांना मदत केली तर अनेक जीव फुलतील कित्येक संसार मार्गाला लागतील. हे सर्व का ? तर ज्युनिअर चेंबरला हे करण्याची ताकद आहे



३१ ऑगस्ट : गोकुळ अष्टमी.



१ सप्टेंबर

म्हणून. त्यांच्यापाशी संघटना आहे. परवाच मी उमरखाडीच्या चिल्ड्रेन्स होम मध्ये गेलो होतो. तेथे एकाच खोलीत गुन्हेगार मुले, दुर्लक्षित मुले, अनाथ मुले दिसली. खरं तर त्यांना वेगवेगळचा खोलीत ठेवायची आत्यंतिक जरूर आहे. पण परत प्रश्न येतो पैशाचा. जागेचा. झोपडपट्टयात कॉलेजची काही मुले आजकाल रात्री वगैरे जाऊन साक्षरता मोहिमेचा दीप पेटवतात. स्लम्सच्या स्लम्स् एका दिवसात साफ करतात व समाजाचा एक भाग म्हणून त्यांना रहायला शिकवतात. केवळ त्या पतिताला (सगळेच त्यातले पतित असतात असं नव्हे) त्यांच्या मुलांना संधी मिळत नाही म्हणून स्वत: धडपडतात. सिडनहॅम कॉलेजमधून दुपारी तास संपल्यावर मुले-मुली, फुट, प्रोटिन्स वाटायला झोपडपट्टीत धावतात. इतकंच काय डॉ. राण्यांसारखा (कीर्ती कॉलेजचे प्राध्यापक) एक मनुष्य अनेक वारल्यांच्या घरी स्वत:च्या आणि युवकांच्या श्रमाने पाणी खेळवतो व पिके दसपट काढून देतो. पाठी संस्था तशी मोठी नाही की अफाट मनुष्यबळ नाही. पण याही स्थितीत जे काही स्वत: करण्यासारखे आहे. ते हे लोक करतात या पार्श्वभूमीवर जेसीजचे कार्यक्रम निव्वळ चमकुगिरीचे वाटतात. सुरेख साडचात व अफलातून सुटात, षण्मुखानंदच्या दारात गर्दीत उभी राहण्याची हे लोक हौस भागवून घेतात. त्यांनी आयोजित केलेला प्रोग्रॅम रंजक असला तरी हे दुसऱ्यांना करता येण्यासारखे आहे. त्यांची शक्ती मोठी आहे. यावर ते नक्की काहीतरी सामाजिक कार्य केल्याचा पुरावा आणून दाखवतील. कुठल्यातरी झोपडपट्टीत दूध वाटण्याच्या वेळचे जेसीजचे फोटो दाखवतील. पण त्यात आत्मा नसेल. त्या लोकांना परिस्थितीचा अंदाजच आलेला नाही. त्या दिवशी काही विशेष घडले अशातला भाग नाही. पण तेथे जमलेल्या सगळ्या लोकांचे विचार इतके मर्यादित होते की खरोखरच ते बघून वाईट वाटले. त्यांचं वर्तुळ इतकं लहान होतं की कुठल्याही निरोगी माणसाला त्यात कसंसंच वाटलं असतं. फाजील नम्रता, टिपिकल मॅनर्स आणि डोळ्यांवरची झापडे बघून खरोखर वाईट वाटले. त्या दिवशी मुंबईतल्या टिपिकल हायक्लास लोकांची विचारसरणी त्या दिवशी दिसली. खरोखर हे लोक अजूनही तसेच रहाणार असतील तर भविष्य फारच भयाण आहे.

षण्मुखानंदमधला त्या दिवशीचा तो टिपिकल जमाव, ती हाय सोसायटी (केवळ पैश्याच्या पाठबळावर) पाहून थोडेसे हादरल्यासारखे झाले. या लोकांनी आपली कार्यक्षेत्रे बदललीच पाहिजेत. त्यामुळे या कृत्रिम लोकांच्या गराडचातून जेव्हा हॉलमधे मुलांच्या घोळक्यात आलो, त्या उत्स्फूर्त शिट्टचा ऐकल्या, वाणांचा खच पाहिला तेव्हा खरोखर त्या उत्स्फूर्ततेने सुखावलो. माझे हे लिखाण जेसीपैकी कोणी - वाचणारही नाही. पण आपल्याला काय वाटते ते आपण खुल्ला लिहितो. आणि मग भालचंद्र

नेमाड्यांची आठवण येते आणि या टिपिकल सोसायटीकडे बघून म्हणावसं वाटतं खरोखर थोर लोक आहेत ते. ◻

# संप, मोर्चा– एक सुरेख परिसंवाद

अनेक संप होतात आणि मिटतात. संपकाळात मुंबईची जनता निमूटपणे त्रास सहन करते. दोघांचीही फिर्याद ऐकते व ऐनवेळी निर्णय द्यायची वेळ आली की जादुगाराने थाळी फिरवल्यावर काही लोक मागच्या मागे सटकतात त्याप्रमाणे हळूच सटकते व सरकार व कामगार दोघांनाही वाटते की जनता आपल्या बाजूची आहे.

परवाचा संप हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण. बाजूला घाण पडली आहे, कचऱ्यावरती माशा घोंघावताहेत, तीन तीन मैल चालत जावं लागतंय तरी नवी सून जशी सासरी दमदाटी सहन करते त्याप्रमाणे नववधूच्या उत्साहाने मुंबईकरांनी हे सारे सहन केले.

पण अशानी काही प्रश्न सुटत नसतात. प्रत्येक घटनेच्या कारणांचा आपण शोध घेतलाच पाहिजे. (मी एवढे मारे लिहितोय पण माझ्या शेजारचा मनुष्य म्हणत असेल, साला टाइम आहे कोणाला इथे. ९-३५ गेली. परत ९-४२ पर्यंत गाडी नाही. बसा शोधत कारणं तुम्हीच.) त्या दृष्टीनेच ३० तारखेला के. सी. कॉलेज हॉलमध्ये एक सुरेख परिसंवाद झाला. संप, युनियन व इतर अनेक कामगार विषयक प्रश्नांना तो स्पर्शून गेला. फोरम ऑफ फ्री एन्टरप्राईज या संस्थेने तो आयोजित केला होता. वक्ते होते सर्वश्री एस. डी. पुणेकर, श्री. मुन्शी (अर्थतज्ज्ञ) श्री. कर्णिक (बेनेट कोलमनचे पर्सोनल ऑफिसर) आणि संचलन केले श्री. मिनू श्रॉफ यांनी. या परिसंवादात संपाचा व युनियनचा सर्व बाजूने विचार करण्यात आला. सर्वप्रथम श्री. पुणेकर बोलले. पुणेकरांनी आपल्या भाषणात अत्यंत मार्मिकपणे आपल्या इथल्या कामगार संघटनांची मर्मस्थळे शोधली. आर्थिक दृष्टचा कामगार संघटना आतापर्यंत अत्यंत दुर्बल असल्याकारणाने त्यांना साहजिकच आपले अस्तित्व जाणवून देण्याकरता कशी तारेवरची कसरत करावी लागते याची माहिती दिली. व आपले अस्तित्व टिकवण्याकरता संप मोर्चे यांचा अवलंब कसा करावा लागला याची माहिती दिली. पुणेकरांनी आपल्या भाषणात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. त्यांनी सांगितले की आतापर्यंत आपल्याकडे युनियन ही केवळ आर्थिक फायदा करून देणारी संघटना म्हणूनच ओळखली गेली आहे. कामगारांचा सर्वांगीण विकास आणि युनियन यांचा तसं म्हणायला गेलं तर संबंधच आला नाही. युनियन म्हणजे बोनस मिळवून देणारी, अधिक पैसे मिळवून देणारी संघटना, अशाच दृष्टिकोनातून कामगारांनी युनियनकडे बघितले. त्यामुळे पैश्याव्यतिरिक्त युनियन आणि कामगारांचा

तसा काही निकटचा संबंध राहिला नाही. त्यामुळे एखाद्या युनियनने काम-गारांच्या हिताचे सांगितले व त्यात थोडाफार पैशांचा तोटा होत असला तर कामगार सरळ युनियन बदली करायलाही मागे पुढे बघत नाहीत असे त्यांनी सांगितले. अमेरिका वगैरे पुढारलेल्या देशात युनियन्स जशा राज-कारणात वा समाजकारणात प्रत्यक्ष भाग घेतात तशा आपल्या इथल्या युनियन्सना भाग घेणे शक्य होत नाही.

बेनेट कोलमनच्या कर्णिकांनी सर्व साधारण संपाच्या आधीच्या पायऱ्या सांगितल्या व संप ही कशी शेवटची पायरी व शस्त्र आहे हे सांगितले. त्यांनी सांगितले, संप कामगारांच्या दृष्टीने कितीही जरी योग्य असला तरी सर्व समाजाला त्यापासून किती त्रास होतो याचा विचार केला पाहिजे आणि संपा-वर जाताना इतर बाबींबरोबर समाजा-चाही विचार केलाच पाहिजे. (इथे संप-वाले असं म्हणण्याची शक्यता जरूर आहे, की आम्ही त्रास सहन करत असताना इतर लोक आम्हाला कितीशी सहानुभूती दाखवतात?) कर्णिकांनी हेही सूचित केले, की उच्चपदस्थ व्यक्ती काही वेळा भरात काही आश्वासने देऊन जातात, परंतु ती पुरी करेपर्यंत इतर व्यक्तींची किती तारांबळ उडते हेही त्यांनी सांगितले व संप हे नेहमीच अखेरचे शस्त्र म्हणूनच वापरले पाहिजे असे त्यांचे मत दिसले.

त्यानंतर प्रख्यात अर्थतज्ज्ञ श्री. मुन्शी भाषण करायला उठले. त्यांना या संपाचा बराच त्रास झाला असावा कारण सुरुवातीलाच त्यांनी असा काही आवाज चढवला, की विचारता सोय नाही. त्यांनी प्रथमतःच संपावर जाणे हा कामगारांचा मूलभूत हक्क आहे हे मान्य केले. पण त्यांनी जर समाजाच्या हक्कांना बाधा येत असेल तर त्या वेळी त्यांच्या हक्काचाही विचार केला पाहिजे हेही ठणकावून सांगितले. त्यांनी सांगितले, की आजकाल सर्वत्र संपत्तीचे, अधिकाराचे विकेंद्रीकरण चालू असता कामगार क्षेत्रात मात्र मोठी मोठी लेबर मॅग्नेट्स स्थापन होत आहेत व त्याही एकप्रकारे सत्तेचे केंद्र होऊ पाहत आहेत. कंपनी क्षेत्रातली मोना-पोली जशी सरकार मोडून काढत आहे त्याचप्रमाणे कामगार क्षेत्रातली मोना-पोली पण मोडून काढली पाहिजे असे त्यांचे मत दिसले.

यावर मिळकत गोठवण्याचा उपाय परिणामकारक ठरेल असे त्यांचे मत दिसले.

सर्वात शेवटी श्री. मिनू श्रॉफ यांनी समालोचन केले. लोकांनी याबाबत जास्तीत जास्त संघटीत झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले व या काळात मोटारवाल्यांनी पण लोकांना मदत केल्यास चांगले असे सुचवले. एवढं सगळे होत असताना लोक मात्र कुठली तरी लोकल कॅन्सल झाल्याच्या गप्पा मारत होते. त्यांचे भाषणाकडे लक्षच नव्हते. एकूण काय मुंबईचे लोक तसे औरच.

□ □ □

# आलेपाक

मुंबईच्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. चंद्रचूड यांची सर्वोच्च न्यायालयाचे एक न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. मुंबईचा निरोप घेताना केलेल्या भाषणात त्यांनी न्यायाधीशाला धारण कराव्या लागणाऱ्या पोशाखाच्या ओझ्याबद्दल तक्रार केली.

एकूण श्री. चंद्रचूड आणि सोमैय्या कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची तक्रार काही वेगळी नाही. पण एक न्यायाधीश आणि दुसरे मात्र आरोपी ! ◻

सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक श्री. चिं. त्र्यं. खानोलकर यांना होमी भाभा यांच्या नावे चालू असलेल्या अभ्यासवृत्तींपैकी महिना रु. १५०० ची एक अभ्यासवृत्ती देण्यात आली आहे.

कालाय तस्मै नमः। ◻

श्री. पु. ल. देशपांडे नुकतेच चार महिन्यांच्या युरोप व अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले; सोबत सौ. सुनीताबाई देशपांडे आहेत.

सौ. सुनीताबाई देशपांडे नुकत्याच चार महिन्यांच्या युरोप व अमेरिकेच्या दौऱ्यावर गेल्या; सोबत श्री. पु. ल. देशपांडेदेखील आहेत. ◻

'सामान्य माणूस हीच आजच्या युगाची असामान्य विभूती आहे.'

आमच्याकडून काही काम करून घ्यायचे असले म्हणजे सगळेजण आम्हाला हेच सांगतात. ◻

मुंबईला आमदार-निवासात ६०२ क्रमांकाच्या खोलीत कोणीतरी (भलत्या वेळी) एक बाई आणली म्हणून विधानसभेत वादावादी झाली.

कोणी म्हणतात ६०२ हा खोलीचा नव्हे तर बाईंचा क्रमांक होता. असेल. आपल्याला काय करायचंय ? ◻

लोकसभेत वाघ आणि सिंह यांच्या संरक्षणाबाबत चर्चा चालू असता राज्यमंत्री शेरसिंह यांनी मध्येच उठून 'मी पूर्ण सुरक्षित आहे' असे सांगितले.

लोकसभेतील चर्चा वन्य वाघसिंहांच्या संरक्षणाबाबत होती; पाळीव 'शेरसिंहां'बद्दल नव्हे. ◻

बोरीवलीला महिलांची, महिलांसाठी महिलांनी चालवलेली एक बँक काढण्याचे ठरले आहे. या बँकेचे नाव इंदिरा सहकारी बँक लिमिटेड' असे निश्चित करण्यात आले आहे.

या बँकेत फोनवरून पैसे काढण्याची खास सोय करण्यात येणार आहे, असे कळते. ◻

सर्व क्षेत्रातील कलाकारांना रेल्वे

प्रवासाच्या सर्व सवलती लौकरच पुन्हा सुरू केल्या जाणार आहेत.

त्यापेक्षा रेल्वे कर्मचाऱ्यांना कलावंत होण्याची सवलत दिली असती तर महाराष्ट्राला किती छोटे छोटे गडकरी लाभले असते ! ◻

कालिना येथील विद्यापीठ-परिसराच्या भूमीत मुंबई विद्यापीठाचे विद्यमान कुल-गुरू डॉ. त्र्यं. कृ. टोपे यांनी वृक्षारोपण केले.

हा वृक्ष अशा जातीचा आहे की तो चांगला वाढीला लागण्यासाठी पाण्या-सारखा पैसा खर्च करावा लागतो. ◻

मेट्रो गोल्डविन मेयर या विश्व-विख्यात चित्रनिर्माण आणि वितरण संस्थेने भारतातील आपले बिऱ्हाडवाजले आवरायचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या चित्रपटांच्या सुरुवातीला दिसणारी – ऐकू येणारी ती परिचित सिंह-डरकाळी आता नाहीशी होणार.

म्हणजे करमणुकीसाठी डरकाळी फोडण्याची सगळी मक्तेदारी आता पुण्याच्या 'केसरी'कडे आली म्हणायची ! ◻

'मी कमर्शिअल चित्रपट काढणारा मनुष्य आहे व त्याची मला लाज वाटण्याचे कारण नाही' बासू भट्टाचार्य.

त्याची लाज आम्हालाच हो ! ◻

'हे बंध रेशमांचे' या रणजित देसाई-लिखित नाटकाच्या 'केसरी'तील परी-क्षणात म्हटले आहे, 'यातल्या व्यक्ति-रेखा सुखद आहेत, पण खऱ्या नाहीत'

आमच्या विजय तेंडुलकरांचे नेमके उलटे : त्यांच्या नाटकातल्या व्यक्ति-रेखा अगदी खऱ्या, पण...(हे पुढचं अगदी बोललंच पाहिजे का हो ?) ◻

कलकत्त्याहून आलेली एक बातमी : जगप्रसिद्ध बंगाली वाघांची सध्याची संख्या फक्त चाळीस असल्याचे वन-विभागाच्या एका प्रवक्त्याने सांगितले.

म्हणजे नक्षलवादी धरून हां. ◻

'काळाबाजारवाल्या किंवा साठेबाज व्यापाऱ्यांच्या दुकानासमोर जनतेने निदर्शने करणे यात काहीच वावगे नाही; मात्र ही निदर्शने, मोर्चे शांतपणे पार पडले पाहिजेत' इति श्री. धारिया.

बरोबरच आहे. धारियासाहेबांच्या नियोजनाखाली काळाबाजारबाजी आणि साठेबाजी जर शांतपणे पार पडतात तर ती गोष्ट निदर्शने आणि मोर्च्यांना का जमू नये ? ◻

५ सप्टेंबरच्या शिक्षकदिनावर महा-राष्ट्रातले शिक्षक बहिष्कार टाकणार आहेत.

ही वार्षिक गोष्ट आता इतकी पक्की झाली आहे, की मी म्हणतो, ५ सप्टेंबर हा बहिष्कार-दिन म्हणूनच का नाही साजरा करायचा ?

**–अनंतराव**

# सेमिनार

भा. ग. जोशी

**जनता जनता म्हणतात ती काही ना काही निमित्त शोधून उत्सव करीत होती आणि विचारवंत....**

गोखले इन्स्टिटयूट–दुपारी ३ सारख्या रुक्ष वेळीसुद्धा येथे एक मोहक शांतता असते. एकीकडे पुरातन फर्ग्युसन कॉलेज आणि ओबडधोबड हनुमान टेकडी तर मागच्या बाजूला कॉमर्स कॉलेज यामध्ये बसलेली, वृक्षांच्या संगतीत रमलेली ही इन्स्टिटयूट. गोखले इन्स्टिटयूटऐवजी 'गोखले उद्यान' असे नाव द्यायचा मोह व्हावा इतके रम्य व हिरवेगार रूप असलेली. प्रवेशद्वारातून आत शिरताच ना. गोखल्यांचा सुबक संगमरवरी अर्धपुतळा स्वागत करतो. अत्यंत काळजीपूर्वक वाढवलेली व जोपासलेली रंगीबेरंगी फुलझाडे आणि स्वच्छ, नीटनेटके रस्ते–मात्र ही स्वच्छता येथे बाग नसल्याची जाणीव करून देते, तर गंभीर दगडी इमारती 'गोखले इन्स्टियूट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स' असे भरगच्च भारदस्त नाव सार्थ करतात. एखाद्या हौशी आणि आकर्षक प्रौढेसारखी ही प्रतिष्ठित संस्था.

१५ ऑगस्टला सेक्युलॅरिझम्वर एक परिसंवाद येथे आयोजित केला होता. इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लिम सत्यशोधक मंडळ अशी दोन वेगळ्या टोकांची नावं धारण करणाऱ्या संस्थांनी यजमानपण स्वीकारलेले.

आत गेलो तर फक्त वक्त्यांच्यासाठीच कार्यक्रम आहे, की काय अशी शंका यावी इतका शुकशुकाट. हॉलमध्ये वाटाघाटींसाठी मांडतात तशी मांडलेली चकचकीत टेबलं. अॅश ट्रेज् वगैरे. एकूण वातावरण असं, की आता कुणीतरी एखादा संशोधक उठून आपला प्रबंध वाचतोय की काय, अशी धास्ती वाटावी. ३ चा कार्यक्रम ३–२० ला सुरू झाला. हळूहळू माणसं जमू लागली. अनेक खुर्च्या नव्याने मांडल्या जातात. पण कित्येकजणांना दाटीवाटीने उभे राहावे लागते. वातावरण खूपच अबोल. नाहीतर इतरत्र वक्त्यांच्याआधी श्रोत्यांमधेच परिसंवाद सुरू होतो. पण येथे सर्वजण मुकाट बसलेले.

हमीद दलवाई स्वागत करतात. 'अशा अवेळी या परिसंवादाला इतकी गर्दी जमेल, अशी मोकळेपणाने सांगायचं, तर कल्पना नव्हती.' (म्हणजे ? हे पुणं आहे याची तरी कल्पना होती ना ?) ना. रूपवते उशीरा येणार असल्याबद्दलचा फोन आलेला असतो. त्यामुळे एसेम् जोशी ऐनवेळी उद्घाटन करतात. त्यामुळे वक्तृत्वस्पर्धेचा विषय ऐनवेळी

बदलल्यावर वेळ मारून नेण्यासाठी बोलावे तसे ते बोलले. भाषणाचा सूर साधारण असा—ह्या आपल्या प्रचंड देशात आपल्याला सेक्युलॅरिझम् राबवायचा आहे. त्यामुळे त्याचे नेमके स्वरूप काय आहे ते ठरवले गेले पाहिजे. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद म्हणजे काय याची चर्चा झाली पाहिजे—ही सर्व तत्त्वे संघर्षातून, चळवळीतून निर्माण होतात—आतापर्यंत चर्चा फक्त पंडितांपुरत्याच मर्यादित होत्या. आता त्या सामान्य जनतेपर्यंत पोहोचत आहेत ही चांगली गोष्ट आहे. (मी सर्वसामान्य जनता शोधण्याचा अयशस्वी प्रयत्न केला !) बांगला देशामुळे नवीन परिस्थिती निर्माण झाली आहे—इ. इ. बोलताना अधूनमधून इंग्रजी शब्द पेरण्याची खोड. 'एखादी कमिटी नेमा, ते १५ वर्षे घेतील बवा रिपोर्ट प्रोडयूस करायला.' किंवा 'सेक्युलॅरिझम्चा कन्सेप्ट ठरवला गेला पाहिजे.'

मग प्रा. शहा सिगारेट विझवत उठले. प्रथमच इंग्लिशमध्ये बोलायचे की मराठीत यावर वाद—शेवटी मराठीतून बोलायचे ठरते. मराठी मातृभाषा नसल्याने सुरुवातीलाच विनंती करतात. ('माझी मातृभाषा मराठी नसल्याने आपण चुकांकडे लक्ष न देता, दुर्लक्ष करा !') भाषणाचा गोषवारा असा : 'सेक्युलॅरिझम्चा विचार तीन पातळींवर करता येईल—१ : व्यक्ती आणि शासन, २ : व्यक्ती व समाज, ३ : व्यक्तीचे वैयक्तिक जीवन. या तीन पातळींवर, परस्परविरोधी नसलेला, पण वेगळा अर्थ प्राप्त होतो. ख्रिश्चन धर्मातच हे सेक्युलॅरिझम्चे तत्त्व सांगून ठेवलेले असल्यामुळे, पश्चिमेकडे ते सहज रुजले. पण हिंदुधर्म तसे मार्गदर्शन करत नाही आणि इस्लाम तर अधिकच कडवा, त्यामुळे आपल्याकडे त्याला विरोध होत आहे. कोणताही निर्णय हा धर्मनिरपेक्ष असावा. आवडत नसेल तर गोमांस न खाणे वेगळे पण धर्मात सांगितले आहे म्हणून ते निषिद्ध मानणे चूक ठरेल. पण आपल्या उक्ती आणि कृतीमध्ये फार फरक आहे. आपल्या घटनेत प्रत्येकाला आपापल्या धर्माप्रमाणे वागण्यास स्वातंत्र्य आहे पण ते सामाजिक परिवर्तन आणि प्रगतीच्या आड येता कामा नये. तसेच अल्पसंख्यांकांना स्वतंत्र शिक्षणसंस्था चालवण्याची मुभा आहे. पण याचा अर्थ त्यांना विशेष स्वातंत्र्य आहे असा नाही. दुर्दैवाने केरळमधील शिक्षणसंस्था व अलिगड मुस्लिम विद्यापीठ याबाबत स्वतःला सोयीस्कर पण सेक्युलॅरिझम्ला घातक असे अर्थ लावीत आहे ..समान नागरी कायद्याची मागणी मुस्लिमांकडून यावी असे ना. हरिभाऊ गोखले म्हणाले, पण मुस्लिम स्त्रिया बोलू शकत नाहीत. गुलामांकडून प्रथम आवाज उठू शकत नाही. पण हेही एका अर्थाने चांगलेच आहे. मुस्लिम स्त्रिया जेव्हा झगडून स्वातंत्र्य मिळवतील तेव्हा ते खऱ्या अर्थाने उपभोगता येईल...सर्व प्रकारच्या धर्मांध सत्ताविरुद्ध आता एकदा सरळ सरळ लढा होऊ दे.

प्रा. शहा आठवून आठवून बोलत

पृष्ठ ५३ वर



# उदयराज मुनशी

**ब. मो. पुरंदरे**

रघुनाथपंत आणि त्र्यंबकपंत हे शिवाजी महाराजांचे दोघे वकील ओरंगजेबाच्या तुरुंगात अडकले होते. त्या दोघांना सोडवून आणण्यासाठी महाराजांच्या डोक्यात सतत विचार चालू होता. या दोघांना सोडवण्यासाठी काय करावं? कोणतं राजकारण खेळावं? खलबतखान्यात महाराज आपल्या जिवलगांच्या कोंडाळ्यात बसून सल्लामसलत करीत होते.

औरंगजेब आग्र्यात अस्वस्थ होता. शिवाजीराजाला आपण खोटी आश्वासनं देऊन इथं आग्र्यात आणलं, त्याचा अवमान केला. साधा पाहुणचारही सभ्यतेनं केला नाही. त्याला चिडवलं. त्याचा अभिमान डिवचला. कारण खात्री वाटत होती, की हा आता इथंच आपल्या हातून खलास होणार आहे! पण झालं भलतंच! शिवाजी पसार झाला. तो अपमानांनी जळफळणारा, संतापलेला

आपला वैरी दख्खनच्या पहाडी मुलखात गेला की, पुन्हा चवताळून उठणार. पुन्हा हे भयंकर दुखणं आपल्याला हैराण करणार. नक्कीच! दुप्पट आवेशाने हे मराठे आपल्यावर छापे घालणार. काय करावं? कोणाला पाठवावं? कोण पुरा पडेल यांना? औरंगजेब चिंतेत पडला होता.

एवढ्यात त्याला अर्जबेगीने वर्दी दिली, की दख्खनमधून शिवाजी भोसल्याकडून अर्जाची एक थैली आली आहे. शिवाजीची थैली? अत्यंत उत्सुकतेने औरंगजेबाने ती थैली आणवली आणि अर्जबेगीस ती वाचून दाखविण्याची त्याने आज्ञा केली. महाराजांकडून आलेलं पत्र अर्जबेगी वाचू लागला. शब्दाशब्दागणिक औरंगजेबाच्या आश्चर्याचे धक्केच बसत गेले. चिडलेल्या, अपमानावलेल्या, संतापलेल्या महाराजांनी औरंगजेबाला अत्यंत नम्र व गोड भाषेत लिहिलं होतं.

'...आपली परवानगी न घेताच मी आग्र्याहून निघून आलो याचे मला वाईट वाटते. मी कृपावंत बादशहांचा नम्र सेवकच आहे. पुरंदरच्या तहाची कलमे मी कसोशीने पाळीन..'

हा चिडलेला मराठा सूडाने पेटून उठेल अशी बादशाहाची कल्पना होती. पण प्रत्यक्षात मात्र हा इतका लीन झालेला पाहून औरंगजेबाला कमालीचं हायसं वाटलं. पण या लीनतेत वरंच राजकारण साठवलेलं होतं. महाराजांनी असं ठरवलं होतं, की काही काळ औरंगजेबावर हत्यार उपसायचंच नाही. चंद्ररावाची जावळी जिंकल्यापासून सतत लढाया चालूच आहेत. आपली मूठभर माणसं सतत बारा वर्षं लढाया करीत आहेत. उसंत कशी ती नाहीच. आता जरा उसंत घ्यावी. आहेत ते गडकोट बळकट बनवावेत. फौजा वाढवाव्यात. आरमार मोठं करावं. दारुगोळा मुबलक भरून ठेवावा. धान्यांनी कणग्या तुडुंब भराव्यात. काडीवैरणीच्या गंजी रचाव्यात, खजिन्यात रास लावावी, हत्यारपात्यारं धारा लावून जय्यत ठेवावीत आणि मग एक दिवशी शिंग फुंकावं. मग पुरंदरच्या तहात औरंगजेबाला दिलेले तेवीस किल्ले परत घ्यावेत. नव्हे, दोनशे तीस किल्ले घ्यावेत!

असा विचार महाराजांनी केला. याच राजकारणाने एके दिवशी आपली दोन माणसं शाही तुरुंगातून खास सुटतील, केवळ दोन वकिलांना डांबून ठेवून औरंगजेब आपल्याशी यावेळी तरी भांडण मांडणार नाही. ते त्याला फार महागात पडेल. असा महाराजांचा होरा होता. तो अगदी बिनचूक होता. अशीच पत्रामागून पत्रं दिल्लीला पाठविण्यास महाराजांनी सुरुवात केली. शाही कैदेत पडलेल्या रघुनाथपंत व त्र्यंबकपंत वकिलांना पुरेपूर खात्री होती, की आपल्या सुटकेसाठी आपला राजा निश्चित प्रयत्न करणार.

याच वेळी दख्खनच्या शाही छावणीत एक भयंकर रामायण घडत होतं. औरंगजेबाचे सरदार मिर्झा राजे जयसिंह यांना आग्रा प्रकरणाचा भयंकर धक्का बसला होता. अतिशय दूरदर्शी

पणाने व उदात्त हेतूने मिर्झा राजांनी शि वा जी म हा रा जां ना आ ग्र्या ला औरंगजेबाच्या भेटीस पाठवलं. केवळ मिर्झा राजांच्या अत्याग्रहामुळे महाराज आग्र्याला गेले. पण काही एक हिताचं राजकारण साधण्याऐवजी औरंगजेबाने महाराजांचे पोरकटपणे अवमान केले. नंतर त्यांना कैद केलं. घरी आलेल्या पाहुण्याला त्याने असं वागवलं.त्यांना ठार मारण्याचे डाव रचले. अखेर औरंगजेबच फसला. महाराज अगदी बेमालूम रीतीने पसार झाले. पण या सर्व आपल्या फजितीचा राग येऊन औरंगजेबाने मिर्झा राजांच्या घराण्यावर सूड उगवायला सुरुवात केली. त्याने मिर्झा राजांचा थोरला मुलगा रामसिंह याला शाही दरबारातून काढून टाकलं. मिर्झा राजांवरही त्यांची इतराजी झाली. औरंगजेबाचा असा आरोप होता, की शिवाजीला हे बापलेक आतून सामील होते म्हणूनच तो आग्र्यातून पळून जाऊ शकला.

या सर्वच प्रकारामुळे मिर्झा राजे एकदम थकले. तसं काही त्यांचं वय यावेळी फार नव्हतं. ते होते फक्त अठ्ठावन्न वर्षांचे. मिर्झा राजांनी वयाच्या नवव्या वर्षी जहांगीर बादशाहाचे पदरी सरदारी करण्यास प्रारंभ केला. प्रत्यक्ष रणांगणात ते उतरले वयाच्या सतराव्या वर्षी. राजकारणात आणि रणांगणात त्यांना कधीही अपयश आलं नाही. ते सर्वत्र सदैव यशच मिळवीत गेले. अगदी अजिक्य ठरलेल्या शिवाजीराजांचाही त्यांनी पराभव केला. पण आता आयुष्याच्या संध्याकाळी त्यांच्या वाट्याला सर्वत्र अपयशच येत होतं. विजापूरकर आदिलशहाच्या फौजेशी वर्षभर झुंजूनही त्यांना पराभव पत्करावा लागला होता. त्यांच्या मुत्सद्दी डावपेचांचं औरंगजेबाने पार खोबरं उडवलं होतं. धन्याची एवढी सेवा करून अखेर पदरी काय तर, अपयश, अपकीर्ती, अपमान! मिर्झा राजे खिन्न झाले होते. ते दक्षिणेतून दिल्लीकडे जायला निघाले होते. दिल्लीला गेल्यावर आपल्यापुढं काय वाढून ठेवलेलं असणार, या चिंतेने ते अस्वस्थ होते. ते फतहाबादहून औरंगाबादला आले. त्यांचं शरीर थकलं होतं. सारा आनंद, साऱ्या आशा मावळल्या होत्या. दिसत होता फक्त अंधार! त्यांच्याबरोबर त्यांचा धाकटा मुलगा कीरतसिंह होता. मिर्झा राजांचं आपल्या मुलावर अपार प्रेम होतं. पण ते प्रत्येक गोष्ट करायचे ते एकाच माणसाच्या सल्ल्याने. त्या माणसावर त्यांचा कमालीचा विश्वास होता. त्या माणसाचं नाव होतं, उदयराज मुनशी. मिर्झा राजांचा तो चिटणीस होता.

उदयराज अतिशय बुद्धिमान होता. राजकीय डावपेचात तर विलक्षण तरबेज. मिर्झा राजांची सारी राजकारणं उदयराजच्या डोक्यात प्रथम शिजत आणि ती पक्की झाली की, मिर्झा राजांच्या नावाने अमलात येत. शिवाजी महाराजांना आग्र्याला पाठविण्याचं राजकारण उदयराजनेच प्रथम योजलं. त्याची बौद्धिक योग्यता अशी होती म्हणूनच तो मिर्झा राजांच्या हृदयातला

फाया होऊन बसला होता. उदयराजशिवाय मिर्झा राजांचं पान हलत नसे. हा उदयराज बुद्धिमान होता, पण शूर अजिबात नव्हता.

औरंगाबादेत जयसिंगपुऱ्यातील आपल्या वाड्यात मिर्झा राजांचा मुक्काम पडला. मिर्झा राजे आधी झालेल्या पराभवांनी आणि पुढे काय होणार या चिंतेने खंगत होते. काय केलं असता औरंगजेबाचा आपल्यावर पुन्हा विश्वास बसेल याचा ते विचार करीत होते. त्यांना शिवाजी महाराजांबद्दल आदर तर खासच वाटत होता. पण औरंगजेबाची मर्जीही खूष करायची होती. त्यांना एका गोष्टीचं त्यातल्या त्यात समाधान वाटत होतं, की महाराज औरंगजेबाच्या फासातून सुखरूप सुटले. 'राजपुताचा शब्द' म्हणून वचन दिलं होतं. त्या वचनातून ते पार पडले होते. बस्स ! तेवढंच समाधान होतं.

आपली निष्ठा व्यक्त करण्यासाठी मिर्झा राजांनी औरंगजेबाकडे एक पत्र पाठवलं. हे पत्र प्रत्यक्षतः मात्र त्यांनी लिहिलं होतं, मुख्य वजीर जाफरबेग याच्या नावाने. मिर्झा राजांनी लिहिलं होतं,

'...तो शिवाजी भोसला अशा प्रकारे वागला व पळाला ही मोठी वाईट गोष्ट घडली. मी त्या शिवाजीला पुन्हा पकडतो व बादशाहांच्या पायाशी पाठवतो. तो माझ्या तावडीत सहज सापडेल. आमच्या घराण्यातील मुलगी देऊन त्याच्याशी लग्नसंबंध करण्याचे आमिष मी त्याला दाखवतो. आमच्या घराण्यासारख्या अत्यंत श्रेष्ठ घराण्यातील मुलगी आपल्याला मिळत आहे, हे समजताच तो अत्यंत आनंदित होईल. वास्तविक या शिवाजीचं घराणं इतकं खालच्या दर्जाचं आहे की, आम्ही त्याला जवळसुद्धा करणार नाही. म्हणूनच तो या आमिषाला भुलेल व लग्नासाठी आमच्या घरी येईल. तसा तो येताच मी त्याला एकदम कैद करतो व बंदोबस्ताने हुजूरच्या पुढं दाखल करतो... '

हे पत्र लिहिण्यात मिर्झा राजांचा हेतू फक्त निष्ठा व्यक्त करण्याचा होता. असे सहजासहजी राजपुतांशी लग्नसंबंध जोडायला शिवाजीमहाराज काही भाबडे नव्हते. हे जुळून येणं केवळ अशक्य आहे हे मिर्झा राजांनाही समजत होते. ही केवळ बोलाचीच कढी होती. हे पत्रही बहुधा मिर्झा राजांना उदयराजनेच पकवून तयार करून दिले असावे.

अर्थात या पत्राला औरंगजेबाने आणि वजीर जाफरबेगने काहीही महत्त्व दिले नाही. प्रत्यक्षात लग्नाची अशी बोलणीविलणी मिर्झा राजांनी महाराजांशी केलीही नाहीत. सारेच काही शिक्यावर राहिलं.

मिर्झा राजे पुढच्या प्रवासाला निघाले. मजल दर मजल करीत ते बुऱ्हानपूरला आले. आषाढाचा वद्य पक्ष होता. पाऊस पडत होता. प्रवासाची दगदग थोडीफार झाली होती. मुक्काम पडला होता. चार-पाच दिवस ओलांडले आणि आषाढाची अवस उगवली. मिर्झा राजांना आत-बाहेर काळोखच दिसत

होता. तरी पण तसे ते काही झोपून नव्हते. फार आजारी नव्हते. थकले होते, इतकंच.

पण आषाढी अवसेला मिर्झा राजांची प्रकृती एकदम बिघडली. त्यांच्या जिवाची अतिशय उलघाल होऊ लागली. त्यांची शुद्ध हरपली. श्वास मंदावत गेला. मिर्झा राजे वारले! कीरतसिह जवळच होता. पितृनिधनाचा हा आघात मोठ्या विचित्र परिस्थितीत त्याच्यावर झाला. साऱ्या छावणीत ही वार्ता पसरली. साऱ्या बुऱ्हानपुरावर दुःखाची कळा पसरली. सर्वांना धक्काच बसला. ते इतक्या तडकाफडकी जातील असं वाटलं नव्हतं. मिर्झा राजांची उत्तरक्रिया यथासांग पार पडली.

पण फार फार बरं झालं एका परीने. मिर्झा राजे दिल्लीत पोहोचायच्या आधीच मार्गावर मरण पावले. त्या खुनशी बादशाहाने त्यांचे या वयात आणखी काय काय धिंडवडे काढले असते कोण जाणे. मिर्झा राजांनी हयात-भर शाही तख्ताची चाकरी केली. शामू-गढच्या लढाईत मिर्झा राजांमुळेच औरंगजेबाला दारा शुकोहविरुद्ध जय मिळाला व दिल्लीची गादी मिळाली. पण हे सारे उपकार स्मरण्याइतकी औरंगजेबाची बुद्धी तल्लख नव्हती आणि दानत मोठी नव्हती. तो काय करील याचा नेम नव्हता.

चार दिवस गेले. दुःखीकष्टी कीरत-सिह आपल्या तंबूत बसला होता. तो उदास होता. येवढ्यात त्याच्या कोणा एका विश्वासू बातमीदाराने तंबूत प्रवेश केला. त्याने कीरतला कुर्निसात केला आणि जवळ जाऊन कीरतच्या कानात काही तरी सांगितले. ते ऐकताच कीरतचा चेहरा एकदम पालटला. त्याचे डोळे संतापाने विस्फारले गेले. ओठ चावले गेले. शिरा फुगल्या. तो ताडकन् उठला. मुठी आवळून तो ओरडला,

'माझ्या वडिलांचा खून झाला! त्यांना विष घालून ठार मारलं! या हरामखोर उदयराज मुनशीने खून केला माझ्या वडिलांचा! दगाबाज! आत्ताच्या आत्ता गर्दन छाटून टाकतो या उदयराजची! नमकहराम!'

संतापलेल्या कीरतने तावडतोब तलवारच उपसली. कीरतभवती अनेक राजपूत तरुण, या त्याच्या आरडा-ओरड्यामुळं जमा झाले. सर्वांना एकच गोष्ट समजली. उदयने मिर्झा राजांचा विष घालून खून केला! उदयला छाटलंच पाहिजे! कीरतसिंह तंबूतून बाहेर पडला तो धावतच. उदयराजला ठार करण्यासाठी! त्याच्याबरोबर राजपूत शिपायांचा घोळका. सूड! सूड! मिर्झा राजांच्या खुनाचा सूड!

उदयराज आपल्या तंबूत नव्हता. तो काही कामासाठी बुऱ्हानपूर शहरात गेला होता. कीरतला बातमी समजली ती अशी, की बादशाह औरंगजेबाच्या गुप्त हुकुमावरून उदयराजने अवसेच्या दिवशी मिर्झा राजांना विष घातलं! कीरत वेध घेत निघाला उदयराजचा. कीरत शहराकडे धावत सुटला. तो आणि त्याचे सौंगडी संतप्त होऊन, नग्न तलवारी उपसून ओरडत धावत होते.

उदयराज शहरात गेला होता. त्याला या येत असलेल्या कराल पाठलागाची कल्पना नव्हती. त्याला त्याच्या कोणा जवळच्या माणसाने ही खबर दिली. कीरत आपल्याला ठार मारण्यासाठी सुटला आहे हे समजताच उदयराजची घाबरगुंडी उडाली. जीव घेऊन तो धावत सुटला. आडव्या तिडव्या गल्लीबोळांतून तो धावत होता. कुठून आपल्यावर झडप पडेल याचा अंदाज नसल्याने तो घाबरून दिसेल त्या रस्त्याने धावत होता.

उदयराज धावता धावता बुऱ्हानपूरच्या सुभेदाराचा वाडा गाठायची धडपड करीत होता. तो भयंकर भेदरला होता. घामाने डवडबला होता. त्याचा थरकाप उडाला होता. कुठून तरी भयंकर आरोळ्या त्याला ऐकू येत होत्या. मागेपुढे पाहत तो पळत होता. एवढ्यात तो सुभेदाराच्या वाड्याजवळ आला. पण त्याच वेळी मागच्या बाजूने कीरत आणि त्याचे राजपूत तलवारी उगारीत ओरडत आपल्या रोखाने दौडत येत आहेत असं उदयला दिसलं. त्याने सारं बळ पायात एकवटलं आणि सुभेदाराचा वाडा गाठला. कसाबसा तो वाड्यात शिरला आणि मोठ्याने ओरडत आत धावला,

'सुभेदारसाहेब, मला वाचवा! मला वाचवा! राजकुमार कीरतसिंह मला ठार मारायला येताहेत!'

सुभेदारवाड्यात एकच कल्लोळ उसळला. सुभेदार धावत आला. त्याने एकदम आपल्या हशमांना हुकूम सोडला,

'दरवाजा बंद करो! बंद करो!'

उदयने धावत धावत जाऊन सुभेदाराच्या पायांना मिठीच मारली.

'मला वाचवा! वाचवा!'

भीतीने उदयराजचे ओठ आणि सारं अंग थरथरत होतं. घामाने तो चिंब भिजला होता. तो अतिशय दमला होता. आता तो बचावला होता. सुभेदाराची ढाल त्याच्या रक्षणाला होती. सुभेदारवाड्याचा दरवाजा बंद झालेला होता.

सुभेदारवाड्याच्या बाहेर कीरतसिंह आपल्या लोकांसह येऊन पोहोचला. त्यांचा आवेश भयंकर विक्राळ होता. खरोखरच जर त्यांच्या तडाख्यात यावेळी उदयराज सापडला असता तर त्याच्या देहाच्या चिंधड्या उडाल्या असत्या. उदयराज वाड्यात शिरला आहे हे कीरतने पाहिलं होतं. पण वाड्याचा दरवाजा बंद झालेला होता. समजा दरवाजा उघडा असता तर, कीरतसिंह वाड्यात घुसला असता का? होय, घुसलाही असता. कीरत इतका संतापला होता, की या उदयराजला ठार मारल्याशिवाय तलवार म्यान करायला त्याचं मन तयार नव्हतं. वाड्यातच काय, पण कुठं सप्तपाताळात जरी हा उदय लपला तरी त्याला ठार करायचंच असा त्याचा उग्र निश्चय झाला होता. तो आपल्या सैनिकांनिशी तसाच दरवाजासमोर उभा राहिला.

आत उदयराजची हकीकत सुभेदाराने ऐकून घेतली. प्रत्यक्ष मिर्झा राजांचा खून केल्याचा आळ उदयवर

घेतला जात होता. आरोप गंभीर होता. तो सुभेदाराला विनवीत होता, की मला कीरतसिंहाच्या तडाख्यातून वाचवा. पण त्याला किती काळ सुभेदार वाचवू शकणार होता ? केव्हा ना केव्हा तरी उदयराजला वाड्याबाहेर जावंच लागणार होतं ना ! समजा, त्याने उदयला आपल्या सैन्याचंच संरक्षण देऊन पाठविलं अन् त्या सैन्यावरच संतापलेल्या कीरतने आपल्या सैन्यानिशी हल्ला चढवला तर ? सुभेदारी फौजेपेक्षा कीरतची फौज नक्कीच जादा होती. म्हणजे युद्धाचा प्रसंग ! हे युद्ध एका सामान्य अन् काहीही हितसंबंध नसलेल्या उदयराजसाठी खेळायला आणि आपली माणसं बळी द्यायला सुभेदार कसा तयार होईल ? समजा हेही युद्ध केलं, अन् त्यांतही कीरतकडून पराभवच झाला आणि अखेर उदयराज मारला जायचा तो मारला गेलाच तर कुठं राहिली अब्रू ? समजा, या लढ्यात कीरत माघारी हटला, तरी या एका कारकुनासाठी सतत फौज कुठून संरक्षणाला राहील ? कुठं ना कुठं, कधी ना कधी हा उदयराज कीरतसिंहाच्या तलवारीखाली सांपडणारच. उदयराजचं हे मरण सुभेदारच काय पण यमराजही टाळू शकत नव्हता. कीरतसिंह सूडाला पेटला होता. वाड्याबाहेर तो दांतओठ खात उभा होता. आत उदयराज सुभेदाराच्या विनवण्या करीत होता. आता ? होणार तरी काय ? कीरतच्या भवती त्याच्या सैन्याची संख्या वाढत होती. हे नसतंच झेंगट सुभेदाराच्या अंगावर येऊन पडलं होतं. काय करावं? काहीही केलं तरी उदयराजचं मरण चुकत नव्हतं. आज नाही, तरी उद्या; उद्या नाही तरी परवा उदयराजचा मुडदा पडणार हे खासच ! विधिलिखित !

अर्धा तास गेला ! एक तास गेला ! दीड तास गेला !

बाहेर सुभेदारवाड्याला जयपुरी राजपुतांचा गराडा पडला. वाड्यांत आता सुभेदारालाही घाम फुटला होता. जर समजा कठोर मनाने या उदयराजला वाड्याबाहेर काढून लावावं अन् डोळे घट्ट मिटून घ्यावेत, तरी उद्या कदाचित् औरंगजेब बादशहा प्रत्यक्ष आपल्याला जाब विचारतील, हीही भीती सुभेदारापुढं होतीच. शिवाय अशा रीतीने उदयराज मारला गेला तर सुभेदारीच्या प्रतिष्ठेला काळिमा ! एक प्रकारे सुभेदार कीरतसिंहाला घाबरला असा याचा अर्थ होणार ! काय करावं? उदयराज तर आयुष्याचे उरलेले क्षण मोजायला लागला होता. भयंकर भयभीत ! सुभेदार कमालीचा गंभीर ! चिंताक्रांत !

आणि सुभेदार एकदम हंसला ! अगदी निर्धास्त, मनमोकळा हंसला ! उदयराज त्याच्याकडे बघतच राहिला. काय झाले हंसायला ? सुभेदार उदयराजला म्हणाला,

"उदयराज, तू बघतो आहेस. तुझा मृत्यू समोर उभा आहे. तुला वाचविण्याची ताकद आत्ता तरी कोणातही नाही. तू वाचू शकत नाहीस. तुला

वाचवू शकेल फक्त खुदा! एक गोष्ट करशील तर कीरतसिंहाची हिम्मत उरणार नाही तुझ्याकडे वाकड्या नजरेने बघण्याची. करशील? आहे तयारी?'

'कोणती गोष्ट?'

'धर्मांतर! तू आत्ता या क्षणी, या जागी, या वाड्यात मुसलमान हो! तुझ्या अंगाला हात लावायची हिम्मत कुणालाही होणार नाही. मग तुझ्या पाठीशी प्रत्यक्ष शहेनशाह आलमगीर बादशहांचं अवघं दळवादळ उभं राहील. नव्हे, त्याचीही जरूर उरणार नाही! बोल! जगायचं आहे?'

क्षणभर उदयराज सुन्न झाला. बाहेर कीरतसिंहाचे लोक ओरडत होते. तो ओरडा ऐकू येत होता.

'बोल! आहे तयारी? दुसरा रस्ता नाही. सर्व रस्ते मृत्यूने रोखले आहेत!' उदयराज उद्‌गारला,

'आहे! माझी तयारी आहे!'

'आत्ताच!'

'जी हां.'

तावडतोब त्या वाड्यातच उदयराजच्या धर्मांतराची तयारी सुरू झाली झटपट! धार्मिक विधींना वाड्यावरच्या धर्मज्ञ काजीने प्रारंभ केला. वेळ फार नव्हता. कारण उदयराजला जगायची घाई होती. विधी सुरू झाले.

सुभेदारसाहेबांनी निर्धारित आवाजात हुकूम दिला,

'दरवाजा उघडा!'

दरवाजा उघडला गेला. कीरतसिंहलाही क्षणभर आश्चर्य वाटलं. दरवाजावरचे पहारेकरी हशम पुढं आले. त्यांनी कीरतसिंहाला उदयराजच्या धर्मांतराची बातमी सांगितली.

वाड्यात उदयराजला आता सिंहाचं बळ आलं होतं. तो अगदी निर्भय बनला होता.

बाहेर कीरतसिंहाची तलवार अलगद म्यानात गेली होती. वडिलांबद्दलचं त्याचं प्रेम, अभिमान आता 'म्यान' झाला होता. तो संताप, सूडाचा आवेश आपोआपच थंड झाला होता. कीरत आपल्या छावणीकडे संथपणे चालू लागला होता. त्याच्या मागोमाग त्याचे सैनिक. अगदी निमूटपणे.

लौकरच कीरतसिंहाची पावले दिल्लीकडे पडू लागली. औरंगजेबाच्या दर्शनासाठी, त्याच्या सेवेसाठी, औरंगजेबानेच आपल्या वडिलांचा खून करवला ही किरकोळ गोष्ट कीरतसिंहाच्या आता स्मरणातही नव्हती. □


# माणूस यापुढील अंक
# छोटा दिवाळी अंक

पुस्तके

मराठी रसिकतेचा अंत पाहणारा संग्रह

# रुप्याची झालर

केशव मेश्राम

पारंपारिक काव्यकल्पनेला तळामुळापासून घुसळून काढणारी एकदम नव्या धर्तीची कविता जशी मराठीत वैपुल्याने लिहिली जात आहे त्याचप्रमाणे १९३० पर्यंतच शोभून दिसेल अशीही कविता निर्माण होताना दिसते आहे. ह्या निर्मितीमागील मनाचा मागोवा घेणे ही एक वेगळीच प्रक्रिया ठरावी. ह्या कविता लिहिणाऱ्या मनाचा विकाम स्वातंत्र्यपूर्वकाळापाशीच थांबला असावा. वाचन आणि व्यासंगही त्याच कालखंडाच्या आगेमागे अडकले असावे. कारण भाबडेपणा, कवितेविषयीचा उदंड उत्साह आणि यमकबद्ध रचना केली की झाली कविता, असे समजण्याची वृत्ती ह्या सगळयांचा आढळ अशोक देव यांच्या 'रुप्याची झालर' ह्या निवडक कवितांच्या संग्रहात होतो.

वि. द. घाटे आणि देवदत्त ना. टिळक यांना कवी दत्त आणि रेव्ह. नारायण वामन टिळक या जन्मदात्यांपासूनच कवितेचा वारसा मिळाला. अर्थात पहिल्याच पिढीत आलेला कवितेचा हा ओघ फारसा बलवान नाही. आणि त्यांच्या मुलामुलींनीही व नातवंडांनीही ही पितृपरंपरा निष्ठेने पुढे चालविलेली दिसते. कविवर्य नारायण वामन टिळक यांचे नातू व देवदत्त नारायण टिळक यांचे पुत्र श्री. अशोक देवदत्त टिळक यांच्या संग्रहातील प्रस्तुत कवितांचा परामर्श घेताना तर क्षीण व हिणकस काव्यपरंपरेचा प्रकर्षाने प्रत्यय येतो.

'रुप्याची झालर' म्हणजे आशावाद हीच रुप्याची झालर (Silver Lining) कवीने गृहित धरली आहे. या संग्रहात २६ कवितांचा, त्याही निवडक, समावेश केला आहे, अशी ग्वाही – संपादिका व प्रकाशिका सौ. मायावती टिळक यांनी दिली आहे. पण हेच जर संपादन आणि निवडीनंतरच्या कवितांचे स्वरूप असेल तर हंसावे की रडावे ? असेच म्हणावे लागेल. अत्यंत फडतूस व कोरड्या शब्दबनवेगिरीला 'कविता' हे शीर्षक डकवण्यात आले आहे. 'प्रीतीचा सम्राट' ही एक दीर्घ कविता आहे. आठव्या एडवर्डसच्या आयुष्यातील एका

संस्मरणीय प्रसंगावर या कवितेची रचना केली आहे. धीरोदात्त आणि प्रेमळ अंतःकरणाच्या अशा राजाला राजगादीपासून वंचित करणाऱ्या ब्रिटन देशाच्या भवितव्याबद्दल कवी म्हणतात,

'नवल न वैभव यशही तूझे
अस्तंगत झाले
प्रीतिकरांच्या सम्राटाला
त्वा अवमानीले!'

सबंध कवितेभर असाच प्रतिभाविष्कार आहे. इतपतच.

'बॉस' ही तथाकथित विनोदी कविताही अत्यंत सामान्य आहे. आबालवृद्धांना परिचित असलेल्या विसंगतीतून विनोद निर्माण करण्याचा अपेशी प्रयत्न आहे. 'रावसाहेब' ही कविता फक्त कवी र. ल. जोशी यांच्यावर लिहिली हेच तिचे वेगळेपण म्हणूनच तिचा निर्देश करावयाचा.

वाढदिवस, मोठा घास धाकुटचा वदनी, गालफुगीची साथ, कोडगा, अवतरली गंगा, ताई ग ऽ, पाय पाळण्यातले, सदाफुली वगैरे कविता अगदीच सामान्य व नगण्य आहेत.

'प्रणयी टोमॅटो अथवा प्रेमाची कोशिम्बीर' ही अशोक देवांची पहिलीच कविता. 'थोडा खुलासा देतो. हे जे अखेरचे टीपांचे पान आहे त्यात ह्या कवितेवर 'आचार्य अत्रे यांनी हिचे कौतुक करून मग ती नवयुगात प्रसिद्ध केली होती.' अशी नोंद आहे. पण तरीही या कवितेतील आचरट सरपटपणा डोळ्याआड करता येत नाही. 'मंगलाष्टकांची' ही निवडक कवितेच्या पुस्तकात निवड करणाऱ्या संपादिकेस आणि कवीस काय म्हणावे तेच कळत नाही. कदाचित कवीला आपल्या वृत्तरचनेबद्दल इतका आत्मविश्वास असावा, की त्याबद्दलच रसिकांकडून टाळ्या मिळवाव्यात, असे ठरवून ही निवड केली असावी.

ह्या सगळ्या संग्रहात खुळचटपणाचा कळस शोभेल असे आणखी एक ठिकाण आहे. पृष्ठ २० वरील एक कविता अशी–

मे–
ह्या–
रि–
आ–
द–
डे–

काही कळले? अहो हा अभंग आहे. आरंभच असा–

'मे-ह्या-रि-आ-द-डे' 'मे-ह्या-रि-आ-द-डे'
गर्जन चौकडे आज चाले!' तरी नाही कळत? मग टीपा पहा– 'Many happy return of the Day' अशा शीर्षकाबद्दल व कवितेबद्दल वाईट तरी किती लिहिणार?

'पंडितजींचा गुलाब' या कवितेतील एक आविष्करण चांगले साधले आहे. ते गद्यप्राय असूनही काव्यमय आहे.

'पंडितजी गेले.
त्यांच्या हृदयावरचा तो टवटवीत गुलाब हळू हळू भारताच्या हृदयावर अधिष्ठित झाला आणि आज तो आमचा

पंतप्रधान आहे."

'रावसाहेब' आणि 'पंडितजींचा गुलाब' याच काय त्या संग्रहातील कविता. बाकी शब्दांची अतार्किक, कोरडी, प्रतिभाशून्य फेकाफेक.

त्यातच मेघमेदुर, नरकाय, चौकडे, त्रिभोनी इत्यादी शब्दांनी गर्दी करून आधीच निरस असलेली रुप्याची झालर टोचेल अशी केली आहे. मराठी रसिकतेचा अंत पाहायचा असेल तरच यापुढे असे लिहिले जाईल. हरे राम ! ☐

**रुप्याची झालर.** अशोक देव.
प्रकाशक : सौ. मायावती टिळक. नाशिक
किंमत ३ रुपये.

---


प्रसिद्ध झाले

**एका पराभवाची कहाणी**

लेखक :
ब्रिगेडियर जे. पी. दळवी

अनुवाद :
अनंत भावे


---

# मी नेताजींना बघितलंय् !

चालू लेखमाला

**जबानी पहिली : भाग चवथा**

लेखक : नारायण सान्याल

अनुवाद : अशोक शहाणे

काही इलाजच नव्हता दुसरा. दिवस फटफटायला आता फक्त तासभराचा अवकाश होता. अन् सुरुवातीलाच आम्हाला जावं लागणार होतं उत्तरेला तोंड करून. म्हणजे शत्रूच्या सैन्याला सामोरं.आम्ही आत्ताच निघालो तर नेमकं सूर्य उगवतानाच रंगून-पेगू रस्त्याच्या त्या भयंकर नाक्यावर पोचणार. ह्या नाक्यावर शत्रूचे रणगाडे अन् सज्ज गाड्या वीज चमकावी तशा आमच्यासमोर उभ्या ठाकण्याची भीती होती. रस्त्याला दुतर्फा क्षितिजापर्यंत पसरलेली शेतं. म्हणजे मोकळ्या मैदानात आमच्या गाड्यांचा तांडा बघून शत्रूच्या वैमानिकांच्या जिभेला पाणी सुटण्याजोगी परिस्थिती !

दुसरा दिवस. तारीख चोवीस एप्रिल. ह्या एवढ्याशा ट्रक्समधे काही आम्हाला सगळ्यांना जागा मिळत नाही हे एव्हांना स्वच्छ झालं होतं.

'जानबाज' तुकडीचे सहाशे सैनिक मेजर पी. एस. रातुडींच्या मागोमाग मार्च करत निघून गेले. ते बँकॉकला जाणार होते. सबंध अंतर पायी जाणार होते. मौलमीनला गाडी मिळाली तर मिळेलही कदाचित्.

बाकीचं जवळपास पाच हजार सैन्य रंगूनमधेच राह्यलं. मेजर जनरल ए. डी. लोकनाथन्‌पण त्यांच्याबरोबर मागं राह्यले. ब्रिटिश सैन्य रंगूनमधे यायची वाट बघत त्यांनी बसायचं असं ठरलं. अन् तोपर्यंत रंगूनच्या रहिवाशांच्या जिवाचं अन् मालमत्तेचं रक्षण करण्याची जिम्मेदारी त्यांच्यावर टाकली. रंगूनमधे तेव्हा काय अन् नंतर काय काहीच धड नव्हतं. ब्रह्मी दरोडेखोरांची टोळकी मुलकी भारतीय नागरिकांच्यावर डाके घालत होती. लूटमार करत होती. बायकांची इज्जत घेत होती. हे सगळं भयंकर मोठ्या प्रमाणावर चाललं होतं. म्हणूनच नेताजींनी ह्या सैनिकांना रंगूनमधेच ठेवायचा निर्णय घेतला. हे काही महिने रंगूनमधे मोठ्या माशानं छोट्या माशाला गिळावं असा प्रकार चालला होता. त्या भयंकर काळात मेजर-जनरल लोकनाथन् अन् कर्नल जीवनसिंग ह्यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद सेनेनं जी कामगिरी बजावली, तिच्या आठवणी

शांतिप्रिय ब्रह्मी नागरिक विसरणं निव्वळ अशक्य आहे.

आमचा निघायचा मुहूर्त चोवीस तास लांबणीवर पडला म्हणून सगळेच नाराज झाले होते. पण आता आज परत मागं वळून पहाताना मात्र मला वाटतंय, की हे झालं ते एका दृष्टीनं बरंच झालं. कारण हा एक दिवस मिळाला म्हणून नेताजींना दोन संदेश तयार करायला फुरसत मिळाली. पहिला संदेश होता ब्रह्मदेशात स्थायिक झालेल्या भारतीय नागरिकांना अन् मुलकी ब्रह्मी मित्रांना उद्देशून. दुसरा होता रंगूनमध्ये मागं राहणाऱ्या सैनिकांना उद्देशून. हे दोन्ही संदेश तुम्ही कदाचित् वाचले असतील आणखी एखाद्या पुस्तकात. पण आमच्या ह्या ऐतिहासिक प्रस्थानाची गोष्ट सांगायला लागायच्या आधी हे दोन्ही संदेश परत एकदा तुमच्या कानावर घालतो. नेताजींचे हे दोन संदेश म्हंजे आमच्या कठीण यात्रेची पार्श्वभूमी आहे.

ब्रह्मदेशात राहणाऱ्या माझ्या भारतीय आणि ब्रह्मी मित्रांकरता :

बंधुभगिनींनो ! वेदनांनी कातर झालेल्या अंतःकरणानं मी आज ब्रह्मदेश सोडून जातोय. स्वातंत्र्याच्या संग्रामाच्या पहिल्या पर्वात आपला पराभव झालाय. पण हे तर निव्वळ पहिलं पर्व आहे. आणखी कितीतरी लढाया अजून शिल्लक आहेत. ह्या पहिल्या पर्वात आपण फक्त लढाईच हरलो आहोत, आपण हिम्मत हरलेलो नाही.

ह्या ब्रह्मदेशात आलेल्या भारतीयांनो ! मातृभूमीबद्दलचं आपलं कर्तव्य तुम्ही इतक्या नीटपणानं पार पाडलंय्त की सारं जग आज थक्क होऊन गेलंय. मोकळ्या हातानं न् मोकळ्या मनानं तुम्ही पैसे, माणसं, चीजवस्तु यांचा पुरवठा करत गेलात. समग्र युद्धाच्या प्रयत्नाचा पहिलाच उजळ दृष्टांत तुम्ही दिलात. पण प्रतिकूलतेच्या प्रचंड अडचणीमुळं तुमचे ते प्रयत्न सफळ झाले नाहीत. पहिल्यांदाच आपला पराभव झाला.

तुमच्या आत्माहुतीचा हा महान दृष्टांत—विशेषत: आमची केंद्रीय कचेरी ब्रह्मदेशात हलवल्यापासूनची तुमची भूमिका आयुष्याच्या अखेरीपर्यंत माझ्या स्मृतिपटावर सुवर्णाक्षरांनी लिहिलेली राहील.

हे मनोबल कुणीच पायदळी तुडवू शकणार नाही ह्याबद्दल मला तिळमात्र शंका नाही. भारताच्या स्वातंत्र्याखातर माझं तुम्हांला कळकळीचं आवाहन आहे, की असंच दृढ मनोबल तुम्ही कायम ठेवा. मी म्हणेन, गर्वानं मान ताठ ठेवून तुम्ही थोडी वाट पहा. थोडी वाट पहा त्या मंगल क्षणाची – जेव्हा स्वातंत्र्यसंग्रामाची संधी परत एकदा तुमच्या दाराशी आलेली असेल.

भारताच्या शेवटच्या स्वातंत्र्य-संग्रामाचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा ब्रह्मदेशात राहणाऱ्या भारतीयांची भूमिका त्यात सुवर्णाक्षरांनी लिहिली जाईल.

मी ब्रह्मदेश सोडून जातोय ते काही स्वेच्छेनं नव्हे. तुमच्या शेजारी गाडून

घऊन उभं रहावं असंच मला वाटत होतं. तुमच्याबरोबर तुमच्यासारखं पराभवाचं हलाहल आकंठ प्यावं अशी माझी इच्छा होती. पण माझ्या मंत्री-मंडळींच्या नि वरिष्ठ लष्करी सल्लागारांच्या विनंतीला मान देऊन भारताचा स्वातंत्र्यसंग्राम नव्या जोमानं चालवण्याकरता म्हणूनच मी आज ब्रह्मदेशातनं जातोय्. जन्मल्यापास्नं मी आशावादीच आहे. भारतमातेच्या मुक्तीचा दिवस जवळ येऊन ठेपलेला आहे असा माझा दृढ विश्वास आहे. अन् ह्या विश्वासाचा पाया रेसभरदेखील ढळलेला नाही. माझी तुम्हांला अशी प्रार्थना आहे, की तुम्हीपण हा विश्वास हृदयात बाळगा.

मी नेहमीच म्हणत आलोय् : सकाळ न होणारी अशी रात्रच नाही. रात्रीच्या अखेरच्या प्रहरातल्या घनदाट अंधारातनं आज आपण वाटचाल करतोय. तेव्हा विश्वास बाळगा, की सूर्योदयाचा क्षण आपल्यासमोरच आहे. भारतवर्ष स्वतंत्र होणारच !

माझ्या ह्या निरोपाच्या उपसंहारात परत एकदा ब्रह्मदेशच्या सरकारबद्दल अन् इथं राहणाऱ्या नागरिकांच्याबद्दल मनापास्नं कृतज्ञता व्यक्त केल्यावाचून मला राहवत नाही. ह्या लढाईतला त्यांचा हिस्सा मी नम्रपणानं न् श्रद्धेनं नमूद करतोय्. एक दिवस नक्कीच असा उजाडेल की जेव्हा स्वतंत्र भारत ह्या कृतज्ञतेचं ऋण पुरेपूर फेडेल.

इन्किलाब झिंदाबाद !
आझाद हिंद झिंदाबाद !
जयहिंद !

२४–४–४५ सुभाषचंद्र बोस

शिवाय आझाद हिंद सेनेचे जे सैनिक रंगूनमधेच राहणार होते अन् ज्यांना शरणागतीचा आदेश देणं नेताजींना भागच पडलं होतं, त्यांनापण उद्देशून त्याचदिवशी एक संदेश तयार केला. त्याचा अक्षरश: अनुवादपण इथं देते :

आझाद हिंद सेनेच्या निर्भय अधिकाऱ्यांनो नि सैनिकांनो !

अत्यंत वेदनेनं भरलेल्या हृदयानिशी मी ब्रह्मदेशाचा निरोप घेतोय. निरोप घेतोय ह्या भूमीचा जिथं एकोणीसशेचव्वेचाळीस सालच्या फेब्रुवारीपास्नं तुम्ही अगणित लढायांचा इतिहास मोठ्या शौर्यानं रचलात आणि आजदेखील रचताय.

इंफाळ नि ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या ह्या पहिल्या पर्वात आपली हार झालीय. पण हे निव्वळ पहिलं पर्व आहे. ह्या स्वातंत्र्यसंग्रामाचे आणखी कितीतरी अध्याय आपल्याला अजून रचायचेयत.

आयुष्यभर मी आशावादीच आहे. म्हणून कोणत्याच परिस्थितीत अखेरचा पराजय मी कबूल करणार नाही.

इंफाळच्या सखल जमिनीवर, आराकानच्या जंगल–डोंगरात, ब्रह्मदेशच्या तेलाच्या खाणींच्या इलाख्यात अन् इतरही अनेक रणांगणावरली मृत्यूवरही विजय मिळवणारी तुमची शौर्यगाथा आपल्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासात चिरंतन उजळत राहील.

कॉम्रेड्स ! ह्या पहाटेच्या माहेंद्रक्षणी मी तुमच्यासमोर एक हुकूमनामा

ठेवून जातोय. हा माझा अखेरचा आदेश आहे. लष्करी संकट जेव्हा येईल तेव्हा निधडया छातीनं त्या संकटाला सामोरे जा पण तुमच्या हातातला तिरंगी झेंडा मात्र उंचच राहू द्या. वीराप्रमाणं उघडया छातीवर पराजयाच्या विजेचा लोळ घ्या. लष्करी इज्जत नि वीराचा मान मातीत लोळण घेत नाही ह्याची खबरदारी बाळगा. उद्याच्या भारत-वर्षातली माणस तुमच्या ह्या महान् आत्मत्यागाची फलश्रुती म्हणून जन्म घेणारायत. ते जन्मणारायत गुलाम म्हणून नाही, स्वतंत्र नागरिक म्हणून ते जन्मणारायत. तुमची आठवण त्यांच्या मनात कृतज्ञतेनं राहू दे. दुनियेला त्यांना सांगता येऊ दे, की आमच्या वाडवडिलांनी मणिपूर, आसाम न् ब्रह्मदेशाच्या रणांगणावर मार खाल्ला पण त्यांनी मनोधैर्य सोडलं नाही,तात्पुरता विपर्याय नाकबूल करून अंतिम यशाचा न् गौरवाचा राजरस्ता त्यांनी बांधला.

भारताच्या स्वातंत्र्याबद्दलचा माझा अदम्य अढळ विश्वास तिळभरही डळमळीत झालेला नाही. भारताचा राष्ट्रध्वज, भारताचा मान अन् इतिहासानंही कबुली दिलेली भारताच्या सैनिकांची इज्जत मी आज शंभर टक्के भरोशानं तुमच्याच हवाली करून जातोय. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचे तुम्ही अग्रदूत आहात. हा मान, ही इज्जत राखण्याकरता तुम्ही आपलं सर्वस्व ओवाळून टाकायला मागंपुढं पहाणार नाही त्याबद्दल माझ्या मनात काडीमात्र शंका नाही. तशीच वेळ आली तर आपला जीव वेचूनदेखील ही इज्जत तुम्ही राखा. म्हंजे इतर ठिकाणी लढाईत गुंतलेल्या साथीदारांना तुमच्या ह्या उदाहरणावरनं कायम संजीवनी मिळत राहील.

मनात येईल तसं वागायची जर मला मुभा असती तर ह्या संकटाच्या काळात मी तुमच्याबरोबरच राह्यलो असतो. तुमच्याबरोबर एकाच रांगेत बसून पराजयाच्या ह्या कडवट फळाची चव घेतली असती. पण मंत्रीमंडळींच्या नि वरिष्ठ लष्करी सल्लागारांच्या सल्ल्याप्रमाणं भारताचा मुक्तिसंग्राम चालवायचं व्रत घेऊन मला आजच ब्रह्मदेश सोडून जावं लागतंय. पूर्व-आशियातल्या नि स्वदेशातच राहणाऱ्या भारतीयांना मी मनोमन ओळखतो. अन् म्हणूनच मी म्हणतो, तुम्ही खात्री बाळगा--तुमचे हे शारीरिक न् मानसिक कष्ट, हा आत्मत्याग —ह्यातलं काहीसुद्धा व्यर्थ जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत ते ही लढाई चालूच ठेवतील.

आता माझ्या स्वत:बद्दल दोन शब्द. एकोणीसशेत्रेचाळीसच्या एकवीस ऑक्टोबरला मी जी प्रतिज्ञा केली होती, तिचं मी अक्षरश: पालन करीन ! माझे स्वदेशवासी अडतीस कोटी भारतीयांच्या मुक्तीकरता आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत मी लढतच राहीन !

सरतेशेवटी तुम्हाला माझी एक कळकळीची विनंती आहे. तुम्हीही माझ्यासारखे आशावादी व्हा. माझ्यासारखीच श्रद्धा ठेवा. जिला सकाळ नाही अशी रात्र नसतेच. गडद अंधा-

राच्या पलीकडेच पहाटेचा प्रकाश असतो. खात्री बाळगा—भारतवर्ष स्वतंत्र होणारच, अन् तोही अगदी लौकरच !

देव तुमचं भलं करो !

क्रांती चिरायु होवो !

आझाद हिंद अमर रहे !

जयहिंद !

२४ एप्रिल १९४५ सुभाषचंद्र बोस
सरसेनापती,
आझाद हिंद सेना.

हे दोन ऐतिहासिक दस्तावेज नेताजींनी त्या दिवशी तयार केले.

आणखीही बरीच कामं त्यांनी झपाट्यासरशी उरकली. आमच्या राणीवाहिनीच्या तुकडीची काटछाट करून ती लहान केली. ब्रह्मदेशातल्याच ज्या मुली आमच्या वाहिनीत होत्या, त्यांना दिवसाउजेडीच उपनगरात धाडून दिलं. नाहीतरी लढाईच्या ह्या अशा परिस्थितीत त्यांना उगाउगा मलायात घेऊन जाण्यात काही अर्थच नव्हता. शिवाय जपान्यांनी दिलेल्या बारा ट्रक्स-पैकी आमच्या वाट्याला आले होते अवघे तीन ट्रक. त्यामुळं जागेची भल-तीच तंगी. धाडून दिलेल्या ह्या मुली तूर्त उपनगरातच राहणार होत्या. मग मोका बघून त्यांनी आपापल्या घरी परतायचं होतं. ज्यांची घरं जवळपासच होती, त्याना तर सरळच घरी पाठवून दिलं. म्हंजे ज्या मुली मलायातच आझाद हिंद सेनेत भरती झाल्या होत्या, त्यांनाच तेवढं तूर्त बरोबर घ्यायचं ठरलं. अशा आम्ही सत्तावन्नजणी होतो.

दिवसभर रंगूनच्या हमरस्त्यावरनं जपानी सैनिक टोळक्या-टोळक्यांनी जाताना दिसत होते. ट्रकमधनं किंवा पायीदेखील.

सबंध शहरात इथंतिथं आगी दिसत होत्या. म्हंजे सगळे कागदपत्र जपानी लोक जाळून टाकत होते.

आमच्या गाड्यांच्यावरदेखील चिक्कार पालापाचोळा पसरून टाकला होता. म्हंजे वरनं विमानातनं सहज नजरेला पडायला नको.

संध्याकाळ झाल्यावर आणखी जरा वेळानं आम्ही निघालोच. सहा मोटारी न् बारा ट्रक्स. पैकी तिनात आम्ही. माझ्याबरोबर अम्माजी, भाबीजी न् नमिताताई. लेफ्टनंट थीबर्स पुढच्या ट्रकमधे होत्या. आम्ही तासाभराचा रस्ता पार झालो असू एवढ्यात बाँब-र्सची घरघर ऐकू आली. ताबडतोब सबंध तांडा झाडांच्या सावलीत थांबला. झटदिशी आम्ही ट्रकमधनं खाली उड्या मारल्या. अन् रस्त्याच्या कडेच्या झुड-पात लपून राह्यलो.

ही निव्वळ सुरुवात होती. नंतर दर अर्ध्या तासानं हा लपंडाव आम्हांला खेळावा लागला. त्यामुळं अक्षरशः कासवाच्या गतीनं आमचा प्रवास चालला होता. रंगून-पेगू रोडवरनं थेट शत्रूच्या सैन्याकडे तोंड करून उत्तरेला.

अचानक समोरनं एकामागोमाग एक प्रचंड स्फोटाचा आवाज कानावर आला. अन् तरी डोक्यावर शत्रूचं विमान नाही की काही नाही. म्हंजे हा काही

बाँबचा आवाज नव्हता. आमच्या गाड्यांचा तांडा परत जागच्याजागी स्तब्ध झाला. काय आहे काय ते काही समजत नव्हतं.

इतक्यात समोरच्या गाडीतनं मेजर-जनरल कियानी खाली उतरले. ते दुसऱ्या गाडीपाशी आले. आमचे सर-सेनापती दुसऱ्या गाडीतच होते. आणखीही कुणी कुणी दुसऱ्या गाडीकडे गेले. अंधारात कुणी ओळखू आलं नाही.

कोणतीही लष्करी कारवाई असली की नेताजी नेहमीच शिस्तीनं तिची आखणी करायचे. सगळं काही नीटस व्हायला पाहिजे असायचं त्यांना. म्हणून ह्या पण मोहिमेची सगळी सूत्रं त्यांनी आधीच मेजर-जनरल कियानींच्या हाती दिलेली होती. म्हंजे त्या मोहिमेची सगळी जिम्मेदारी आता त्यांच्यावर होती. नेताजीदेखील त्यांच्या आज्ञेत. उठणं-बसणं सगळं जमन कियानींच्या हुकमानं व्हायचं.

तर जनरल कियानींनी आमचा तांडा थांबवून धरला. फटफटीवरनं एक लहानशी पार्टी पॅट्रोल-पार्टी म्हणून पुढं रवाना झाली. म्हंजे काय आहे ते बघून यायला. स्फोट कुठं होतायत्, काय म्हणून होतायत् वगैरे. कारण वरती शत्रूची विमानं नाहीत अन् तरी स्फोट होतायत तर ब्रिटिशांच्या तोफा न् रणगाडे इथपर्यंत आले असायची पण शक्यता आहेच की ! अन् तसं असलं तर मग आम्हाला एक पाऊलदेखील पुढं जाता येणार नव्हतं.

अम्माजी माझ्याकडे झुकल्या. म्हणाल्या—आपण ब्रिटिश लाइनच्या जवळ येऊन पोचलोय का ग ?

मी काही बोलायच्या आतच भाबीजीनं दबल्या आवाजात धमकावलं —बोलू नका आत्ता ! अन् इतकं कुतू-हल काही बरं नाही !

अम्माजींचं तोंडदेखील मला दिसत नव्हतं. पण त्या आणखीन काहीच बोलल्या नाहीत.

फटफटीवरनं चार जवान थेट उत्तरेला निघून गेलेयत. आम्ही आपले निमूट बसलोय मिनटं मोजत.

चांदण्यानं न्हाऊन गेलेली रात्र. रस्त्यावर दुतर्फा मोठाली झाडं. अंधारात झाडं काही ओळखू येत नाहीयत्. वारा एकदम पडलेला. स्तब्ध पहारेकऱ्यां-सारखी झाडं उभी. जराशा अंतरावर काजवे लुकलुकतायत. गावबीव काही दिसत नाहीय् कुठंच. आम्ही इतकी मंडळी आपली गप्प बसून आहोत. आस-पास दबा धरून असेल एखादवेळेस ब्रह्मी दरोडेखोरांची एखादी टोळी. किंवा ब्रिटिश गनिमांची एखादी तुकडी. कळा-यला काही मार्ग नाही.

अर्ध्या तासाच्या आतच पॅट्रोल-पार्टीचे चार जवान परत आले. नाही, शत्रूचं सैन्यबिन्य नाही. समोरच पेगू शहर. जपानी लोकच सगळं जाळून टाकतायत्. म्हंजे सगळी युद्धसामग्री—जी काही आता बरोबर नेता येण्याजोगी नाही—बाँबनं उडवून देतायत. थोडक्यात आमची वाटचाल परत सुरू झाली.

क्षितिजापर्यंत पसरलेल्या दुतर्फा शेतांच्या मधनं जाणाऱ्या डांबरी रस्त्या-वरनं आमचा तांडा पुढं सरकायला लागला. एखाद्या सरपटत्या सापासारखा. लख्ख चांदणं पडलंय एव्हांना. पण आजची रात्र इतकी चांदणी नसती, अमावास्येची गडद अंधारी रात्र असती, तर आम्ही उलट खूष झालो असतो.

हे युद्धा ! तुला आता रामराम ! माणसाच्या मनातल्या किती कोमल भावनांचा नाश करून टाकलास तू ! हे चांदणंदेखील कोडासारखं वाटतंय् आज ! एवढा सृष्टीला जीवन देणारा उजळ सूर्यप्रकाश—त्याची आम्हाला भीती वाटायला लागलीय् आता ! पौर्णिमेच्या वाटोळ्या चंद्राची किळस वाटय्ते ! आम्ही जणू इतिहासाच्याही आधीच्या काळातली रानवट जनावरं ! अंधाऱ्या गुहेइतकं आरामशीर दुसरं काहीच नाही असं वाटतंय् आम्हाला !

गाडी डुलत-डुलत चाललीय. रस्त्या-वर अधनंमधनं खड्डे पडलेले. आमच्या गाड्यांचे हेडलाइट्स लावलेले नाहीत. अर्धवट उजेडात समोरचा रस्ता काही धड दिसत नाहीय्. परतपरत चाकं धपदिशी खड्ड्यात जातायत.

उजव्या हाताला शेताच्या पलीकडून तोफांचे गोळे फुटल्याचे आवाज येतायत. रायफलचे आवाज. मशीनगनचा अखंड आवाज. जीवन न् मरण जणू इथं येऊन मिसळून गेलेयत एकाच पातळीवर. आता ह्या क्षणी आम्ही जिवंत आहोत हे जसं खरं आहे, तसं पुढच्या क्षणी जिवंतच राहू असा काहीसुद्धा हवाला नाही.

थोडक्याच वेळात आम्ही पेगूला येऊन पोचलो. पेगूमधे आगीचा उत्सव चाललेला. सबंध शहर भडभडा जळत होतं. ब्रिटिश सैन्य इथं आलं तरी त्याच्या हाती काहीसुद्धा लागायला नको.

त्या प्रज्वलित शहराला डाव्या हाताला ठेवून आम्ही आणखीनच उत्तरेला चाललोय्. कोणजाणे कदाचित साक्षात मृत्यूच्या मुखात ! लहानपणी पाठ करायला लागली होती, 'चार्ज ऑफ द लाइट ब्रिगेड' कविता. सिंगा-पूरच्या त्या निवांत कॉन्व्हेंट स्कूलमध्ये असताना मला स्वप्नात तरी कधी वाटलं होतं का, की हा विचित्र अनुभव एक दिवस आपल्यालादेखील येईल म्हणून ? उजव्या हाताला तोफा, डाव्या हाताला तोफा. सारख्या आग ओकता-यत. अन् लाइट ब्रिगेडचे आम्ही सैनिक नाकासमोर धावतोय् समोर आ वासून राहलेल्या मृत्यूच्या तोंडात जाण्या-करता !

मधनंमधनं रस्त्याच्या अगदी कडेला होऊन थांबावं लागतंय् आम्हाला. साय-रन वाजवत भरारा धावत जपानी कॉन्व्हॉय आम्हाला मागं टाकून पुढं जातायत. आम्ही माघार घेतोय्. ते रणांगणाकडे चाललेयत. जखमी सैनि-कांना आणायला. लढाईचं सामान हल-वायला. म्हणून त्यांना आधी वाट. आज अशा विचित्र वाटेला लागलोयत आम्ही, की त्यांचं न् आमचं तोंड एकाच

स्वतःला आधुनिक म्हणवून घेणाऱ्या
प्रत्येकाने संग्रही ठेवावीत
अशी नवी प्रकाशने

# सिग्मंड फ्रॉईड : प्रा. ल. ब. हरोलीकर

मनोविश्लेषणशास्त्राचा पाया घालणाऱ्या
वैज्ञानिकाच्या जीवन-कार्याचा
रोमहर्षक परिचय (किंमत सतरा रुपये)

# टेलिव्हिजनचे अंतरंग : प्रकाश दोशी

महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या
एका क्रांतिकारक यंत्र-यंत्रणेचा
थोडक्यांत परंतु शास्त्रशुद्ध परिचय
(किंमत फक्त सहा रुपये)

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजया नगर कॉलनी, पुणे ३०

बाजूला. पुढं जायचं असू दे की मागं जायचं असू दे—रंगूनहून पहिल्यांदा जायला हवं उत्तरेला तोंड करूनच !

पेगूपास्नं आणखी काही मैल उत्तरेला आल्यावर ते ठिकाण लागलं. तो तिवाठा. एक रस्ता आम्ही ज्या वाटेनं आलो तो. दुसरा रस्ता गेलेला सरळ शत्रूच्या सैन्याच्या दिशेनं. अन् तिसरा रस्ता आम्ही आत्ता ज्या वाटेनं जाणार होतो तो. मौलमीनकडे, बँकॉककडे जाणारा—असा तिवाठा.

तिवाठा ओलांडल्यावर आम्ही सगळ्यांनीच सुटकेचा निःश्वास टाकला. चला, सुटलो. आता काही दरेक क्षणाला आपण युद्धक्षेत्राकडे जात नाही आहोत. उलटीकडे जातोय.आता ट्रकच्या चाकाचा प्रत्येक फेरा शत्रूच्या सैन्यातलं न् आमच्यातलं अंतर वाढवत राहणाराय् !

इथंच एक गोष्ट पण सांगून टाकते, की काही कारणानं आमची निघायची वेळ जर आणखी बारा तासांनी लांबली असती तर हा तिवाठा आम्हाला काही केल्या ओलांडता आला नसता. इथंच नेताजींना मरण आलं असतं किंवा अटक झाली असती ! कारण नेमकं दुसऱ्या दिवशी दुपारी ब्रिटिशांनी पेगू शहरावर कब्जा केला. अन् हा सगळाच रस्ता त्यांच्या ताब्यात आला.

आम्ही 'वा' शहराच्या जवळपास येऊन पोचलो तेव्हा पूर्वेच्या आकाशात तांबडं फुटायला लागलं होतं. पहाट होत होती. पुरतं उजडायच्या आत कदाचित् आम्हाला वामधे पाऊल टाकता पण यायचं नाही कदाचित. कारण शहरात पाऊल टाकायचं तर पहिल्यांदा नदी पार करायला हवी. नदीचं नावपण 'वा'च. पण त्या सुंदर अंधाराला विखरवून टाकून घामाळलेल्या पहाटेचा उजेड इतक्या झपाट्यानं पसरला, की शहरात जायचा बेत आम्हाला सोडून द्यावा लागला. अन् शहराच्या वायव्येला पाचेक मैलांवर असलेल्या एका लहानशा गावाचा आसरा घेणं आम्हाला भाग पडलं. आमच्यापैकी काही जणांना डोकं टेकायला झोपड्या तरी मिळाल्या. गाव-कऱ्यांनी आधीच सोडून दिलेल्या. बाकीच्यांनी झाडाखाली मुक्काम ठोकला.

मी, भाबीजी अन् रबेया आम्ही तिघींनी तीन दगड आणून एका मोठ्या रबराच्या झाडाखाली चुलाण केलं. मोठ्या डेकचीत चहाकरता आधण ठेवलं. काही मुलींनी काटक्या अन् पाला-पाचोळा गोळा केला. आज म्हंजे आमचं वनभोजनच होतं. काही मुली सैंपाकाच्या तयारीला लागल्या. डेकची अन् हंडे आमच्या बरोबर होतेच. बाकी तीनेक दिवस भागवता येईल इतकं अन्नधान्य होतं. गैरसोय होती ती फक्त पाण्याची. पण जवानांनी ती आघाडी सांभाळली. डोंगरातल्या कुठल्यातरी झऱ्याचं पाणी ते घेऊन आले बादल्या भरभरून. म्हंजे किमान चहा व्हायला आता काहीच अडचण नव्हती. दुधाचे डबे आहेत. ते सगळ्यांच्या चहाला पुरण्याइतके नाहीत. पण नसेनात का. आम्ही तर कोराच चहा प्यायचो. चिमूटभर मीठ टाकून. चहा नाही, ओछा. हे जपानी लोकांच्या कडनं शिकलो. नाव पण त्यांचंच.

तर चांगली नीट चहाची व्यवस्था होत होती, एवढ्यात जनरल कियानींनी हरकत घेतली. त्यांचा एडीकाँग आला. म्हणाला–तुमच्या चुलीमुळं धूर होतोय्.

भाबीजी चुलीसमोर बसून लालीलाल झालेल्या. आधीच दिसायला सुंदर, त्यात लालीलाल झालेल्या. वर बघून म्हणाल्या—अजबच आहे ! अहो चुलीत लाकडं घातल्यावर धूर होणारच की नाही ?

भाबीजींच्या लालभडक चेहऱ्याकडे बघून एडीसी हसला. त्यानं वर आकाशाकडे बोट केलं. म्हणाला—सैतानाला कळेल ना भाबीजी !

काय पंचाइत आहे बघा ! दगडाची चूल मांडून काटक्या जाळून सैंपाक करायचा अन् अट काय तर धूर होता कामा नये ! पण इलाज काय होता म्हणा. जास्ती धूर व्हायला लागला, की आम्ही विझवून टाकतोय् चुलाण. शत्रूच्या विमानाला धूर दिसायला नको अन् आम्ही इथं आहोत ते कळायला नको.

अशी तासेकभर कसरत केल्यावर पहिल्या राउंडचा चहा झाला एकदाचा तयार. पहिल्या राउंडचा म्हंजे दुधाचा. नेताजी अन् त्यांच्या मुख्य-मुख्य सहकाऱ्यांच्याकरता. इथं शिवाय एक हातचलाखी करायला हवी. दुसऱ्या राउंडचा चहा बिगर दुधाचा आहे हे पहिल्या राउंडवाल्यांना कळता कामाचं नाही. नाहीतर बोलणी खायला लागणार हे पक्कं !

जराशा अंतरावर एका झाडाखाली रग टाकून नेताजी दाढी करतायत. जमन कियानी अन् भोसलेजी गवतावर एक नकाशा उलगडून काहीतरी चर्चा करतायत. अय्यरसाहेब झाडंबिडं मागं टाकून रस्त्याकडे पाय मोकळे करतायत. मगमधे चहा ओतून मी ते घेऊन त्यांच्याकडे जात होते––एवढ्यात आधी काही कल्पना नाही काही नाही––आकाश फाडून आल्यासारखी तीन ब्रिटिश फायटर विमानं. !

अय्यरसाहेबच दिसले असतील बहुतेक त्यांना. कारण बाकी आम्ही सगळेच घनदाट झाडांनी झाकलेले होतो. आकाशाकडे एकच कटाक्ष टाकून अय्यरसाहेब समोर पळायला लागले श्वास रोखून. समोरच्या बाजूला एक कडब्याची गंज होती. अय्यरसाहेब गंजीत अदृश्य झाले. मशीनगनच्या गोळ्यांनी मोकळ्या माळावरल्या धुळीत रेघ ओढली. अय्यरसाहेबांच्यापास्नं तीनेक हात अंतरावर ! माझ्या हातातल्या मगमधनं थोडासा चहा हिंदकळला. नेताजी निर्विकारपणानं दाढी करत होते !

विमानांनी आकाशात दोनतीन चकरा मारल्या. दरम्यान अम्माजींनी पाणी ओतून चूल थंड केली होती. अय्यरसाहेब श्वास रोखून पडून होते कडब्याच्या गंजीत. तिन्ही विमानं दिसेनाशी झाली. मग गवताच्या गंजीतनं अय्यरसाहेब काळजीपूर्वक बाहेर आले.

ते बघून कर्नल चतर्जी मला म्हणाले, '—आरती, चहाचा मग आधी अय्यरभाईला दे. श्वास रोखून गंजीत पडून रहावं लागल्यामुळं विचारा धाप टाकतोय्. '

अय्यरसाहेबांचं कपड्यांच्याकडे फार लक्ष असायचं. प्राणापेक्षा पँटची क्रीजच त्यांना जास्त प्रिय. कपड्यांना चिकट-लेली कुसळं काढून टाकण्यात ते गुंग होते. लगेच म्हणाले--नाही नाही, मला कशाला ! आधी नेताजींना देऊ दे.

नेताजींनी रेझर खाली ठेवला. मग घण्याकरता हात पुढं केला, न् म्हणाले —मला माहीत होतं. गुळाच्या ढेपे-वरनं येणारा मुंगळा घरी पोचला, की त्याला काही खावंसं वाटत नाही.

जो तो एकमेकाच्या तोंडाकडे पहा-यला लागला. तेवढ्यात सगळ्यांच्याच मतलब लक्षात आला. खो खो हसत सुटले सगळेच.

अय्यरसाहेबपण हसत-हसत म्हणाले, --अशी भूक लागल्याय् सर ! खरंच गुरासारखा कडबा चघळावासा वाटतोय्.

मी कसंतरी हसू दाबून त्या बेकार चहाचा मग नेताजींच्या समोर धरला. मग चहाचा पहिला घोट घेऊन नेताजी म्हणाले--आरती, तूपण ख्रिश्चनच आहेस ना ?

'तूपण' न् 'ख्रिश्चन' वगैरे माझ्या काही ध्यानात येईना. पण हो म्हणून मान हलवली मी. मग कर्नल चतर्जींच्या-कडे बघून नेताजी म्हणाले--आरतीला बघितलं, की नेहमी मला भारतीची आठवण होते. रंगूनच्या मिस भारती जोसेफची. कर्नल चतर्जी, माहीत आहे का ही मुलगी तुम्हाला ?

कर्नल चतर्जींनी मान हलवली.— नाही बुवा. रंगूनची मिस भारती जोसेफ ? कुठं बघितली होती का ?

चहाचा आणखी एक घोट घेऊन नमितातार्डला नेताजींनी विचारलं— तुला ओळख पटतेय का नमिता ?

नमितातार्डपण आश्चर्यचकित झालेली. रंगूनची मिस भारती जोसेफ म्हणून कुणीच माहीत नाही आमच्या-पैकी कुणालाच.

इतक्यात सरस्वतीबाई गढवाल म्हणाल्या—मी ओळखते तिला नेताजी ! 'पथरे दाबी'ची भारती जोसेफ !

ओ : !—कर्नल चतर्जींच्या तोंडून उद्गार बाहेर पडला.

टॉवेलनं तोंड पुसता-पुसता नेताजी म्हणाले--नमिता ! एक बिगर बंगाली बाईनं हरवलं की तुला !

नमितातार्डनं दचकून एकदा अम्माजींच्याकडे पाहृयलं. मग खालच्या आवाजात ती म्हणाली—मला वाटलं खरोखरीचीच कुणी भारती जोसेफ !

--म्हंजे ? तुला काय म्हणायचंय् ? 'पथरे दाबी'चे नाव तूपण ऐकलंय्स ? नमितातार्डनं काहीच उत्तर दिलं नाही. सरळ नेताजींच्याकडे पहात राहिली ती.

म्हंजे 'पथरे दाबी' हे कुठलंतरी पुस्तक दिसतंय, असं मी मनातल्या-मनात म्हणत होते. पण काय-कसलं पुस्तक ते मला अजिबातच ठाऊक नव्हतं. पण 'पथरे दाबी'चं नाव तूपण ऐकलंय्स ?' हा नेताजींचा प्रश्न नमितातार्डच्या वर्मी लागल्यासारखा

दिसला. म्हंजे एखाद्या धार्मिक ख्रिश्चन माणसाला विचारावं ना—की बाय-बलचं नाव तूपण ऐकलंय्स ?—तसं.

चहा संपत आला होता. नेताजींनी मग खाली ठेवला. एक सिगरेट पेटवली. काडी हलवून-हलवून विझवून टाकली. अन् नमितातार्इलाच म्हणाले—वाचलंय्स तू 'पथरे दाबी ?'

नमिता सेनगुप्ताच्या डोळ्याच्या पापण्या पण लवत नव्हत्या. जणू प्रचंड अपमान झाला होता तिचा. जणू आता ती सूड घेणार होती ह्या अपमानाचा. काहीच कळत नसल्यामुळं मी तर भलतीच घाबरून गेले. आता नमितातार्इ रागाच्या भरात काही भलतंच बोलते का काय ? पण नमितातार्इ गंभीरपणानं म्हणाली, 'नुस्तं वाचलंय् एवढंच नाही. मला पाठ आहे पुस्तक. ऐकायचंय् ?'

अन् मग कुणाच्या परवानगीची वाट न बघता धडाधडा पाठ म्हणत गेली बंगाली भाषेतला काहीतरी उतारा. आम्हाला काहीच कळत नव्हतं. पण मी पाह्यलं—हलके हलके नेताजींचे डोळे बंद झाले. जणू ते ध्यानस्थ बसले होते. उजव्या हातात एक जळती सिगरेट. तिच्यावर बरीच राख जमलेली. ती आता केव्हांपण पँटवर गळून पडेल. पण नेताजी गप्प. स्तब्ध. नमितातार्इचा उतारा चालूच आहे. कविता नाही, गद्य. ती काय म्हणतेय् कोण जाणे. पण तिच्या एकूण अविर्भावावरनं वाटतंय्, की हा काही कुठला उतारा वगैरे नाही. ध्यानात बुडून गेलेल्या ह्या पत्थरासारख्या कठिण श्रोत्याकरता तयार केलेलं मानपत्रच ती वाचतेय्.

थोडा वेळ सबंध वातावरणच अद्‌भुत बनलं. मोकळ्या निर्जन मैदानावरल्या रवराच्या झाडांच्या सावलीत लपून बसलेले काही सैनिक. आसपास सगळं स्तब्ध. निःशब्द. डोक्यावरच्या निळ्या अकाशात दूर कुठंतरी घिरट्या घालतायत शत्रूची विमानं बहिरी ससाण्यांसारखी तीक्ष्ण नजरेनं. अन् अशा परिस्थितीत आपल्याला कळत नसलेल्या भाषेत काहीतरी मंत्रपाठ करतेय् नमितातार्इ, आसवांनी दाटल्या आवाजात !

उतारा संपला. कर्नल चतर्जी जरासे सेंटिमेंटल. चष्मा काढून तळहात उलटा धरून त्यांनी डोळे पुसून घेतले. बाजूला बघितलं तर अम्माजी पण पदरानं डोळे पुसत होत्या.

अन् उभ्या आयुष्यात पाह्यलं—नेताजी शरमिंदे झाले होते ! हो ! ह्या उताऱ्यातला एकही शब्द जरी मला कळला नव्हता तरी एवढं मात्र पक्कं, की नेताजींचा गोरापान चेहरा इतका लाल झाला होता तो काही निव्वळ आवेगानं नाही. त्यांत आणखी एक भावना होती.

उतारा म्हणून संपला. पण हवेत त्याचं गुंजन मात्र तसंच राह्यलं. आमच्यापैकी बहुतेक जणांना काही समजलं नव्हतं. पण ज्या थोडक्या काही जणांना समजत होतं त्यांची भावना निःशब्दपणानं जणू आमच्यापण मनात शिरली. मग नेताजींनीच पहिल्यांदा हालचाल केली. जरासे चळबुळले म्हणाले—किंचितशी चूक झाली तुझी. मूळ पुस्तकात आहे—'पोहून तुला पद्मा

ओलांडावी लागते.'

कुणी काहीच बोललं नाही. नमिता, अम्माजी, कर्नल चतर्जी – सगळे गप्पच राह्यले. पण त्यांच्या चेहऱ्यावरनं मात्र मला असं वाटलं, की चूक नेताजींचीच आहे, नमितताईची नाही. नमितताई बरोबरच म्हणाली होती.

रहस्य होतं तरी काय ?

आता सगळंच साफ आहे. नमिताताईनं नंतर त्या उताऱ्याचं भाषांतर ऐकवलं होतं ते असं —

> तू काही आमच्यासारखा साधासरळ माणूस नाहीस. तू देशाकरता आपलं सगळं काही दिलंय्स. म्हणून तर देशाची होडी तुला घेऊन चालू शकत नाही. पखालीत बसून तुला काबूल नदी पार करावी लागते. म्हणून तर देशाचे राजरस्ते तुला बंद आहेत. भयंकर डोंगर तुडवत तुला चालावं लागतं. आता विसरून गेलेल्या कुण्या भूतकाळात तुझ्याच करता पहिला साखळदंड बनवण्यात आला होता. तुरुंग तर निव्वळ तुझ्याचकरता पहिल्यांदा बांधला गेला. हाच तर तुझा गौरव आहे. तुझी अवहेलना करण्याची कुणाची हिंमत आहे ? हे असंख्य पहारेकरी, हे प्रचंड सैन्य– हे सगळं तुझ्याचकरता आहे की! दुःखाचं दुःसह ओझं तू वाहू शकतोस म्हणून तर ईश्वरानं इतका मोठा बोजा तुझ्याच खांद्यावर टाकलाय ! मुक्तिपथाच्या अग्रदूता, पराधीन देशाच्या हे राजद्रोह्या ! तुला शतकोटी प्रणाम !

जेवणखाण आटपायला तीन वाजले. काल रात्रभर झोप झाली नव्हती. आज पण होणार नव्हती. नेताजींनी तासेकभर झोप घेतली. आम्ही पण.

चार वाजायच्या सुमारास झोपेतनं उठून बघितलं तर नेताजी एका नकाशावर नजर रोखून कसला तरी विचार करताय्त. जरा वेळानं त्यांनी एका स्टाफ ऑफिसरला बोलावलं. हुकूम केला : मोटारसायकल घेऊन आत्ताच्या आत्ता पायी पायी येणाऱ्या तुकडीकडे जा. मेजर रातुडींच्या नेतृत्वाखाली ते आमच्या मागोमाग पायी पायी येत होते. त्यांना कळवायला पाह्यजे. रंगून-पेगू रस्ता टाळायला. त्याच्याऐवजी रेल्वेच्या रुळालगतनं यायला. कारण शत्रूच्या सैन्याचा वेग न् त्यात असलेली वेगवेगळी युनिट्स बघून नेताजींना शंका वाटत होती, की आमच्या ह्या पायदळानं तो तिवाठा ओलांडायच्या आधीच शत्रूचे रणगाडे तिथं पोचलेले असतील.

नंतर कळलं, की हा हुकूम जर नेताजींनी पाठवला नसता तर आमच्या ह्या सहाशे सैनिकांचं मरण अगदी अटळ होतं. आदेश मिळाल्याबरोबर मेजर रातुडींनी रस्ता सोडून पायवाट पकडली होती. त्यांनी रंगून-पेगू सडक सोडल्यावर काही मिनिटांच्या आतच ब्रिटिश रणगाडे तिथं पोचले होते.

ह्या सगळ्या गोष्टी डोक्यात आल्या

की आठवतं––आमचे नेताजी डेहरा-डूनला, सँडहर्स्टमध्ये किंवा जगातल्या आणखी कुठल्या लष्करी शिक्षण देणाऱ्या संस्थेत शिकले-बिकलेले नव्हते. आश्चर्यानं थक्क व्हायला होतं का नाही ? निष्णात सेनापतींच्याही डोक्यात आले नाहीत असे निर्णय त्यांनी रणांगणात कसे काय घेतले असतील ? ही काय ईश्वरानं दिलेल्या सहाव्या इंद्रियाची देणगी ? का विरळचा प्रतिभेचं लक्षण ?

संध्याकाळी सहाच्या सुमाराला आम्ही नव्या जोमानं प्रवासाला सुरुवात केली. नेताजी लगबगीनं इकडनं तिकडं जातायत. तिकडनं इकडं जातायत. कोणती गाडी पुढं, कोणती मागं––सगळं बघतायत. ही सगळी कामं खरं म्हंजे दक्ष सेनापतींच्यावर सोपवून दिलेली आहेत. ते सगळेच कर्तबगार अधिकारी आहेत. शिस्तीवर नेताजींचा गाढा विश्वास आहे. ते स्वतः पण जनरल कयानींच्या आदेशाबरहुकूम ऊठबस करतायत. पण हा पडला आपल्या अनुयायांच्या सुरक्षिततेचा प्रश्न. तेव्हा प्रत्येकच गोष्ट स्वतःच्या डोळ्यांनी बघितल्याशिवाय त्यांना चैनच पडत नव्हतं.

अचानक खूप जोरात पावसाची सर आली. आम्ही सगळेच पार भिजून गेलो. नेताजीपण. जपान्यांच्या शेकडो लॉऱ्या 'वा'कडे धावत होत्या. ब्रिटिश रणगाड्यांशी सामना पडायच्या आतच सित्तांग नदी ओलांडायचीय् त्यांना. चिखलात गाड्यांची चाकं वारंवार रुतून बसतायत. चाकांच्या खाली लाकडाच्या फळ्या घालून चिखलानं भरलेले मोठ्ठाले खड्डे पार करावे लागतायत.

वाटेत एक लहानसा ओढा लागला. आम्ही तिथं पोचलो तर दिसलं – समोरची नेताजींची गाडी बुडून जातेय्.

आम्ही घाबरून किंचाळलोच.

पण नेताजी त्या गाडीत नव्हतेच. ते काठावर उभे होते अन् गाडी चालवणाऱ्यांना सूचना देत होते. थोड्या वेळानं नेताजींची गाडी साखळी बांधून बाहेर ओढून काढली. मग आमचा प्रवास परत सुरू झाला. 'वा'च्या दिशेनं.

दरम्यान शेकडो जपानी लॉऱ्यांनी रस्त्यावर चक्र व्यूहच रचल्यासारखं करून टाकलं होतं. आम्ही आपले कासवाच्या गतीनं चाललो होतो.

कर्नल कियानींनी आदेश दिला अन् आमच्या गाड्या पक्की सडक सोडून कच्च्या रस्त्यावर उतरल्या. माळ पार करून तिरकं जात-जात नदीच्या काठाशी यायला हवंय् आम्हांला. पण किंचित् आधीच पाऊस होऊन गेलेला. रस्ता चिखलानं भरलेला न् भयंकर घसरडा. गाडीचं स्टिअरिंग नीट रहात नव्हतं. आमच्या गाड्या दारुड्यासारख्या झोकांड्या देत होत्या. लेफ्टनंट थीवर्सनी आमच्या गाड्या थांबवल्या. अन् आम्हा मुलींना खाली उतरायला सांगितलं. ड्रायव्हर रिकामीच गाडी घेऊन जाऊ दे नदीच्या काठाशी, आम्ही चालत-चालत येतो.

पण चिखल गुडघ्यापर्यंत पाय बुडेल

इतका. अशा चिखलात चालायचं तरी कसं? एव्हाना चांगलाच अंधारपण झाला होता. शुक्लपक्षाचा चंद्र मावळून गेला होता. चार-पाच हातावरचा माणूसपण ओळखू येत नव्हता. समोरच्या मुलीच्या पावलांच्या आवाजावर लक्ष ठेवून चाचपडत-चाचपडत आम्ही कुठं चाललो होतो कोण जाणे! मी चांगली तीनदा घसरून पडले. सवंध अंग चिखलानं भरलं. भरू दे म्हणा. आता पहिल्यांदा म्हंजे उठून उभं राह्यला पाहिजय्. नाहीतर मागची मुलगी सरळ अंगावर पाय द्यायची.

अखेर शेवटी वा नदीच्या पश्चिम तीराला आम्ही येऊन पोचलो तेव्हा रात्रीचे अडीच वाजले होते.

पण ही हजारो माणसं न् ह्या शेकडो लॉऱ्या कशा काय पलीकडे जायच्या? नदीला घाट आता एकच होता. अन् वार्जपण एकच होता. नदी ओलांडायची काय व्यवस्था आहे ते नेताजींनी चटकन् पाहून घेतलं. पलीकडे जाण्याकरता रांग लावून उभ्या असलेल्या गाड्यांच्या आकड्याचा अंदाज घेतला. मनातल्या-मनात काहीतरी हिशेब केला वाटतं. अन् म्हणाले– लॉऱ्या इकडेच राहू देत. आपल्याला पोहून पलीकडे जावं लागेल.

दिवस फटफटला की नदीचा हा घाट म्हंजे शत्रूच्या विमानांना आयतंच टार्गेट मिळेल. तेव्हा रात्र असतानाच आम्हांला पलीकडे जायचं होतं.

मेजर-जनरल भोसले म्हणाले—आपण एक पोहून पलीकडे जाऊ, पण मुली?

—नदीला पाणी किती आहे?

तत्काळ एक जवान नदीत उतरला. दहा मिनटांनी परत येऊन म्हणाला—जास्तीत-जास्त खोली सहा एक फूट असेल. बाकी मग पाणी कंबरेइतकं किंवा गळ्याइतकं येईल.

लेफ्टनंट थीबर्सकडे वळून नेताजींनी विचारलं—सगळ्या राण्यांना पोहायला येतं का?

—बिल्कुल!

—तर मग पोहूनच पार होऊ देत त्यांना. पहाट व्हायच्या आत सगळ्यांना इथनं हलवायला हवं. गाड्या पलीकडे येऊ देत नाहीतर न येऊ देत! कर्नल मालिक न् मेजर स्वामी, राणीवाहिनीला सुरक्षित तिकडं न्यायची काय ती तजवीज करा. मुली पलीकडे पोचल्या की मग आपण जाऊ या.

नेमकं ह्याच क्षणी अंधारातनं जपानी जनरल इसोडा नेताजींच्याकडे आले. सॅल्यूट करून म्हणाले—एक लहानशी होडी मिळवल्याय्. तुम्ही प्लीज होडीतनं जा.

नेताजी चांगलेच वैतागले.—उगा काहीतरी बोलू नका. मुलींना पलीकडे जायचंय् अजून. दिसतंय ना?

जनरल इसोडा बिचारे बाजूला झाले.

लेफ्टनंट थीबर्सनी आम्हाला फॉल-इन करायला लावलं. आदेश दिला नदीतनं मार्च करत जायचा. प्रत्येकीच्या हातात रायफल. वेळ पडली तर रायफल हातात ठेवूनच पोहावं लागणार होतं.

मेजर स्वामी अन् कर्नल मालिक नदीत उतरले. सर्वात जास्ती खोली

असलेल्या भागाच्या अलीकडे एकजण, पलीकडे एकजण. ह्या दोन उंचनींच अधिकाऱ्यांनी धोक्याचा भाग ओलांडून जायला तेवढी आम्हाला मदत केली. बाकी नदी आम्ही डोक्यावर रायफल धरून काटली.

नेताजी तीरावर उभे आहेत. सिगरेट ओढत. फारच सिगरेटी ओढतायत ते. इतक्या सिगरेटी ओढणं काही तब्येतीला बरं नाही असं सांगितलय्‌देखील म्हणे त्यांच्या खासगी डॉक्टरांनी. म्हंजे कर्नल राजू अन्‌ मेजर मेनन. पण नेताजींचं हे असंच चाललंय्‌. काय जरूर आहे बरं इतक्या सिगरेटी फुंकायची ? निव्वळ तब्येत खराब करून घ्यायचं काम !

नमितताई माझ्या पुढं होती. नेताजींच्या शेजारनं जात असताना एकदम नेताजी म्हणाले—नमिता, तू पण चुकलीस अन्‌ मीपण चुकलो बघ ! खरं म्हंजे नदी काबूलही नाही अन्‌ पदमाही नाही—नदी आहे ‘ वा ’ !

नमितताई थबकून उभी राह्यली.

नेताजी हसत हसत म्हणाले, देशाची होडी तुला वाहून नेऊ शकत नाही. म्हणूनच तर तुला पोहून ‘ वा ’ पार करावी लागते !

जणू प्रचंड सूड घेतल्यासारखे नेताजी खो खो हंसायला लागले.

एव्हांना आम्ही सगळ्याजणी पलीकडच्या तीराला लागलो होतो. काहीजणींना जळवांचा त्रास झाला. पण ते काही विशेष नाही.

पहाट होत आल्याय्‌. पूर्वेचं आभाळ कुष्ठरोग्यासारखं पांढरं व्हायला लागलं होतं. शत्रूच्या विमानाच्या भीतीनं शुक्राची चांदणी थरथर करत होती. नेताजींच्याबद्दल आम्हाला फारच काळजी लागून राह्यली होती. अजूनपण ते नदीच्या पलीकडच्या तीरावरच होते. ब्रिटिश विमानं कोणत्याही क्षणी येतील अशी परिस्थिती होती. एव्हाना चोहीकडे फरफटलं होतं. शत्रूची विमानं आली तर नदीकाठच्या ह्या इतक्या लॉऱ्या नक्कीच त्यांच्या नजरेला पडणार. ह्याच भीतीनं नेताजींनी आम्हाला अंधारातच नदी ओलांडायला लावली होती. पण मग ते स्वतः अजून काय म्हणून तिकडेच राह्यलेय्‌त ?

ओल्याच कपड्यांनी आम्ही सगळ्याजणी इकडे बसून होतो. एकेक करत ट्रक इकडल्या तीराला आणणं चाललं होतं. आमच्या पंधरा ट्रक्सपैकी आत्तापर्यंत किती ट्रक्स इकडे आणून झाले होते कुणास ठाऊक. इतक्यात मागनं कुणीतरी माझ्या खांद्यावर हात ठेवला. मी दचकून मागं पाह्यलं तर अम्माजी !

—काय हो ?

—जरा काम आहे. इकडं ये.

सगळ्यांच्यापास्नं काही पावलं बाजूला आलो आम्ही दोघी. अम्माजींनी माझा हात आपल्या हातात घेतला. माझ्या हातावरनं आपला सुरकुतलेला हात फिरवता फिरवता खालच्या आवाजात त्या म्हणाल्या—आरती, माझी एक मुलगी होती. जगली वाचली असती तर तुझ्याच वयाची असती ! तर माझ्या एका प्रश्नाचं उत्तर देशील तू ?

मी गांगरून गेले. म्हंजे काय प्रश्न

विचारायचाय ह्यांना ?

—माझ्याविरुद्ध कुणी काही सांगितलंय का ?

खोटं बोलले असते तरी प्रकरण मिटलं असतं. पण का कोण जाणे त्या प्रौढ स्त्रीला त्या मृत्यूसारख्या थंडगार रात्री धादांत खोटं काही सांगणं मला जमलं नाही. अम्माजी विश्वासघात करण्याची शक्यता आहे हे मला मुळीच पटत नव्हतं. पण लष्करी हुकूम तरी मी अमान्य कसा काय करू ?

एवढ्यात त्याच आपण— होऊन म्हणाल्या—राहू दे आरती ! आलं माझ्या लक्षात ? पण आरती, तुझा स्वतःचा विश्वास बसला ह्याच्यावर ? मी—फिफ्थ कॉलमिस्ट ? मी क्विझलिंग ?

एकदम रडूच कोसळलं मला. अम्माजी माझ्या आईच्या वयाच्या. काय उत्तर देणार मी त्यांना ? इतक्यात ह्या पेचातनं मला वाचवणारी एक घटना घडली न् मी सुटले. पलीकडच्या तीरावर अचानक आग भडकून उठली. आम्ही दोघींनींही चमकून तिकडे बघितलं. काय आहे ? तेवढ्यात लेफ्टनंट थीवर्सनं मला बोलावलं. म्हणाल्या—आरती, एवढी आग कसली लागल्याय् ते विचारून ये कर्नल चतर्जींना.

ओल्याकच्च कपड्यांनीच मी धावत सुटले. थोडं अंतर जाते तेवढ्यात नाझिर अहमद भेटला. मग आणखी लांब जावंच लागलं नाही. नाझिरला विचारलं—काय झालं रे ? आग कशीकाय लागली ?

नाझिर पलीकडच्या तीराकडे तोंड करून होता. तिथनं नजरपण न फिरवता म्हणाला—लागलेली नाही, आग लावलेली आहे.

—का ते ?

—पहाट व्हायला आलीय. बाकीच्या गाड्या काही आता पार करता यायच्या नाहीत. त्या तिथंच पडून राहणार. म्हंजे शत्रूला आयत्या मिळणार. म्हणून पेट्रोल टाकून जाळून टाकल्या !

—आपल्या पंधरा गाड्यांतल्या किती गाड्या पार झाल्या ?

—सहा !

—नेताजींची गाडी ?

—ती आली.

—अन् नेताजी कुठायत ?

नाझिरनं काहीच उत्तर दिलं नाही. त्यानं पलीकडच्या तीराकडे बोट केलं. पलीकडे ओळीनं गाड्या जळत होत्या. लाखो रुपयांची राखरांगोळी होत होती. त्या जळणाऱ्या गाड्यांच्यासमोर नेताजी उभे होते. पायात काळे टॉपबूट, डोक्यावर टोपी न् हातात सिगरेट. त्यांचा चष्मा इतक्या लांबूनसुद्धा चकाकत होता.

सगळे नदीपार झाल्यावर शवटच्या होडीतनं नेताजी ह्या तीरावर आले. शेवटची होडी कसली—दिवसाची पहिलीच होडी ती ! कारण एव्हांना पहाट होऊन गेली होती.

चांगलं फटफटलं होतं. म्हंजे आता आणखी उशीर करून भागणार नव्हतं.

आम्हाला डबल मार्च करायचा हुकूम झाला. धावत पळतच आम्ही नदीतीरापासनं काही मैलांचं अंतर काटलं. वा शहर अजून लागायचंच होतं. तिथं पोचायच्या आतच शत्रूची विमानं गाठतील कदाचित्.

नाइलाजानं एका लहानशा गावात शिरलो. हेही सगळ्यांनी सोडलेलं गाव होतं. नाव अपिया.

गावात एक जुनाट देऊळ होतं. त्याचाच आम्ही आसरा घेतला. धापा टाकत आम्ही देवळाच्या पायऱ्यांवर टेकतो न् टेकतो एवढ्यात विमानांचा आवाज ऐकू आला.

लहानशा देवळात आम्ही सगळे कसले मावतोय् ! तेवढ्यात नेताजीपण आले. कर्नल चतर्जी म्हणाले—तुम्ही आत जा सर.

नेताजी म्हणाले––नको ! हा बेगम महाल आहे ! पोरींना जरा आरामशीर बसू दे इथं. चल आपण त्या झाडाखाली बसू या. ये.

आंब्याच्या झाडाखाली एक खाट होती. तिच्यावर रगपण न अंथरता नेताजी आडवे झाले. अन् आश्चर्य म्हंजे लगेचच त्यांना झोप पण लागली. विमानांचा हल्ला चालूच होता. मशीनगनच्या गोळ्या लागोपाठ सुटत होत्या.

साधारण अर्ध्या तासानं गोळ्या बंद झाल्या. मन मानेल तशा गोळ्या चालवून ब्रिटिश विमानं पश्चिमेच्या आकाशात दिसेनाशी झाली.

दमणुकीनं अगदी मोडायला आलंय अंग—पण इलाज नाही. आज माझी सैंपाकाची पाळी. पाळीपाळीनं सैंपाकाची ड्यूटी करत होतो आम्ही मुली. देवळाच्या जवळच एका रिकाम्या पडलेल्या गोठ्यात सैंपाकाची व्यवस्था केली होती. आम्ही दहाएकजणी तिकडे गुंतून होतो.

प्रचंड भांडी अन् कढया कानातनं बांबू घालून उतराव्या लागत होत्या. अशा उतरवता याव्यात म्हणूनच तर त्यांना लोखंडी कान लावलेले होते. अर्थात भांडी चुलीवर चढवणं–उतरवणं असली भारी कामं करायला जवान होतेच. तेच पुढं यायचे. म्हणायचे––वह हमारे उपर छोड दीजिये दिदी !

मग राह्यलं डाळ-तांदूळ धुऊन घेणं. ते आमचं काम. अन् नशिबानं कधी भाजी मिळाली—म्हंजे क्वार्टरमास्तरनं कुठनं मिळवली—तर मग ती निवडायची, शिजवायची. अन् जेवण वाढायचं.

वाढप संपूर्णपणे मुलींच्याकडेच. इथं मात्र आम्ही जवानांना काही थारा द्यायचो नाही. ते चिडायचे. म्हणायचे– बाया हुषार आहेत रे बाबा. आपणच सैंपाक केलाय असं वाटावं म्हणून वाढायला दुसऱ्याला देत नाहीत !

दोनेकपर्यंत सैंपाक झाला. जेवणखाण उरकायला आणखी एक तास. मग सैंपाक केलेल्या मुलींना दोनेक तास झोपायची फुरसत. कारण रात्र पडली की परत चालायला लागलं पाह्यजे. आज डाळ–भाताबरोबर आणखी मटण पण होतं. सगळे खुषीत होते. सगळं आवरून मी देवळात आले तर साडेतीन वाजत होते.

समोरच सेकंड नायक लछमी सैगल भेटली. म्हणाली––आरतीताई, पत्र आहे तुझं.

[ क्रमशः ]

## सेमिनार

पृष्ठ २३ वरून

होते. मराठी अगदी अग्रलेखात असावे तसे. (आ. अत्र्यांचा अपवाद वगळून) 'करावयास, लढावयास' असे उच्चारसुद्धा भिन्न. सनस्था, सनस्क्रिनी असे.

**प्रा. दाभोळकरांचा हादरा**

मग शांत व निर्विकार चेहऱ्याने प्रा. दाभोळकर बोलायला उभे राहतात. प्रथमच अस्पृश्यता आणि सेक्युलेरिझम् यांचा काहीही संबंध नसल्याचे सांगून सर्वांना हादरवतात– 'इतकी वर्षे अत्याचार सोसूनसुद्धा दलित समाज स्वतःला अजून हिंदू म्हणवून घेतो हा एक सामाजिक चमत्कार आहे. पण ही स्थिती फार काळ टिकणार नाही. संघ-जनसंघासारख्या हिंदुत्ववाद्यांनी संघटनेसाठी व समाजवाद्यांनी आर्थिक कार्यक्रम म्हणून या वर्गाकडे लक्ष दिले पाहिजे. पण हे झाले नाहीतर मग हे लोक बौद्ध धर्म टाकून, हिंदू धर्माच्या जवळपाससुद्धा नसणारा एखादा धर्म स्वीकारतील. त्याचे परिणाम गंभीर होतील.'

अत्यंत मोजक्या वेळात मुद्देसूद बोलून प्रा. दाभोळकर खाली बसले. मध्येच जाता जाता समाजवाद्यांना त्यांनी टोला हाणला. 'समाजवाद्यांची समाजवादावरील निष्ठा वादातीत आहे, तशीच त्यांची निष्क्रियतासुद्धा वादातीत आहे.'

सर्वजण वाट पहात असतात दलवाईंच्या भाषणाची. बोलताना सारखी समजावल्यागत मान हलवत बोलतात. भाषणात नवीन काही नव्हतं. 'इस्लाम धर्मातच अन्याय शिकवला आहे. इस्लामची मूलभूत चिकित्सा आजपर्यंत कुणी केली नाही. असा निर्भेळ तत्वे सांगणारा व संशोधन करणारा एक वर्ग मुस्लिम समाजात निर्माण झाला पाहिजे. मुस्लिम समाजाच्या, धर्माकडे पहाण्याच्या मूलभूत दृष्टीतच फरक झाला पाहिजे. वरवर उपाय करून उपयोग होणार नाही. पण हे सर्व करत असताना हिंदू समाजातील धर्म सुधारणेचे प्रवाह मात्र अधिक बळकट झाले पाहिजेत.'

हमीदभाई बरेचसे अस्ताव्यस्त पण आकर्षक बोलतात. बोलणे अतिशय नाकात. त्यांचे नाव माहीत नसलेला एखादा, त्यांना सहज गोखले, लिमये, पेंडसे, परांजपे यांच्या यादीत टाकेल.

मग १५ मि. चहापानाचा प्रोग्रॅम झाला. चहा चक्क फुकट होता. नशीब, हे आधी जाहीर केले नव्हते. सर्वजण परत घामेजलेले चेहरे टिपत हॉलमध्ये घुसतात. कित्येकजण हाताची घडी घालून अजून उभे असतात. पब्लिकची हौस दांडगी हेच खरे!

इंटरवलनंतर महापूजा-फेम बाबा आढाव काही विचार मांडण्यासाठी उठतात. 'आपली घटना फार अस्पष्ट आहे त्यामुळे शासन त्याचा गैरफायदा घेते. इंडियन सेक्युलर सोसायटीने घटना अधिक स्पष्ट करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत.

नंतर प्रा. सरदार थोडेसे सोपे, मजे-

-दार, (सेमिनारला न शोभेसे) बोलून गेले–‘ जसा समाज तशी त्याची घटना असणार. हा समाजच भोंगळ व परस्पर विरोधांनी भरलेला असल्याने घटना-सुद्धा तशीच आहे.

निव्वळ सत्य सांगणारे व त्यासाठी प्रसंगी छळ सोसणारे आगरकरांसारखे लोक हवेतच. परंतु हे काम निर-निराळ्या पातळीवर केले जावे. राज-कारणी लोक फार मोठा वाटा उचलू शकतील पण दुर्दैवाने तेच लोक समाजा-तील अंधश्रद्धांचा गैरफायदा घेत आहेत. एसेम् उपस्थित असल्याने समाजवाद्यांना कानपिचक्या देण्याची संधी सरकारसुद्धा दवडत नाहीत. ‘ सत्ता मिळण्याची सुत-राम् शक्यता नसतानासुद्धा समाजवादी नको त्या लोकांशी हातमिळवणी का करताहेत ? त्यांनी निदान ध्येयनिष्ठा तरी पक्की ठेवावी !’

प्रा. दि. के. बेडेकर दुःखाने वा संता-पाने जसा एखादा हळूहळू बोलतो तसे बोलले. असे वाटले आता एकदम स्फोट होणार. ‘या चळवळीसाठी राजकार-ण्यांची मदत मागू नका. त्याने चळवळीचे नुकसानच होईल...मुख्य प्रश्न हा दारि-द्र्याचा, जीवनमरणाचा आहे...प्रस्था-पिताविरुद्ध जेव्हा मुख्य, मूलगामी लढा सुरू होईल तेव्हा ही घटना अस्पष्ट आहे का नाही वगैरे प्रश्न येणार नाही. प्रत्यक्ष लढ्यातून आत्मबळ आल्यानंतर समाज आपोआप सेक्युलर होत जाईल... खरा संघर्ष आर्थिक आहे.’ चर्चा शेवटी मार्क्सवादापर्यंत पोहोचवून बेडेकरांनी आपण मार्क्सवादी असल्याचे पटवून दिले. भाषण संपल्यावर शांतपणे चक्क विडी ओढणारा हा विचारवंत पाहून गंमत वाटली. सर्वांच्या भाषणाला मान हलवून Response देणारे ते बहुधा एकटेच असावेत. (इतरांनी कुणी मान हलवली असल्यास, या विधानाने गैर-समज करून घेऊ नये ! )

मग उठले ‘ माणूस ’चे माजगावकर. त्यांचे नाव आधी जाहीर केले नव्हते. लोक कंटाळल्याच्या खुणा हळूहळू दिसू लागल्या होत्या. कुजबुज सुरू होते. पण सेमिनार, गोखले इन्स्टिटयूट इत्यादी नावांचा दबदबा, आणि व्याख्यानांची पारंपारिक हौस यामुळे तीन ते सात असे तब्बल ४ तास ‘ ऑडियन्स ’ हजर होते. माजगावकरांचे बरेचसे बोलणे नीट ऐकूच आलं नाही. – ‘ ठराविक चौक-टीत जे कार्य करीत आहेत त्यांचे स्वागत केले पाहिजे. पण जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे मूलभूत तत्त्वज्ञान स्वीकारण्याची वा निर्माण करण्याची वेळ येईल तेव्हा हे कार्य व सेक्युलॅरिझम् उपयोगी पडणार नाही ’

काँग्रेसचे कुणी विठ्ठलराव जगताप टाळ्या घेणारे भाषण हाणून गेले... माणूस अत्यंत मोकळा आणि अवळ-पघळ. वेडीवाकडी घातलेली खादी टोपी, नेहरू शर्ट वगैरे काँग्रेसच्या सर्व खुणा वागवणारा – १०।१५ मिनिटे मनसोक्त बोलून कंटाळवाणे वातावरण बदलवून गेला. अर्थात् मुद्देसूद वगैरे बोलणे त्यांना एकदम अमान्य असल्याचे दिसून आले. जसे सुचेल तसे, मित्रांच्या घोळक्यात बोलावे तसे बोलले. त्यांना

फक्त एवढेच म्हणायचे होते की हा भौतिकवादाचा विचार आपल्या अंधश्रद्ध समाजात लवकर पोहोचवण्यासाठी इंडियन सेक्युलर सोसायटीसारख्या संस्थांनी उत्कृष्ट प्रचारक निर्माण करावेत – पण हे एवढेच सांगताना त्यांनी इतके फाटे फोडले की विचारू नका. मधेच इंदिराजींचे गुणगान करून आपली निष्ठाही त्यांना जाहीर करून टाकली – (इंदिराजींनी २५ वर्षांपुरता देश वाचवला) पण एकूण मामला अत्यंत दिलखुलास आणि प्रामाणिक वाटला.

शेवटी प्रा. रा. म. बापटांची पाळी होती. नेमके काय म्हणायचे आहे हे कळणे अत्यंत मुष्कील. स्वतःलाच न समजल्यागत, मोठमोठी वाक्ये ते बोलले. अन्वय लावता लावता वैताग यायचा. 'प्रा.' असल्याची खात्री पटवणारं, अत्यंत अगम्य असे त्यांचे बोलणे होते. मला जे काही कळले ते असे 'समाजवादी व सेक्युलॅरिझम्‌वादी भारतात चुकीच्या मार्गाने आले...' 'समाजवादी लोक सेक्युलॅरिझम् बाबतीत व सेक्युलॅरिझम्‌वादी लोक राजकीय व आर्थिक आघाड्यांबाबत उदासीन राहिले. ... या बाबत वेळीच हालचाल केली नाही तर या दोन चळवळी एकमेकांना छेदक ठरण्याचा संभव आहे' – हुश्श् !

नंतर हमीद दलवाई आणि अ. भि. शहांनी काही आक्षेपांना उत्तरे दिली. अ. भि. शहांनी माणूसबळ कमी असल्याचं सांगून सर्वांनी या कामात मदत करण्याचं आवाहन केलं. इतक्यात ना. रूपवते


सिमला करार
का
नवे म्यूनिक ?

छोटा
दिवाळी
अंक

माणूस

किंमत

फक्त
५० पैसे

लगबगीने आले. गळाबंद कोट, भरदार अंगकाठी, प्रसन्न चेहरा. मुख्य म्हणजे डोक्यावर खादीची टोपी नाही ! वसंत-राव नाइकांच्या खालोखाल स्मार्ट ठरावेत. एव्हाना ६। वाजलेले असतात. मधेच कुणीतरी उठून प्रश्न विचारण्याची परवानगी मागतात आणि इतका वेळ भाषण ऐकवल्याचा सूड घेतल्यागत स्वतःच बोलत सुटतात. सर्वांची अस्वस्थता आणि डोक्यातला चिडचिडाट वाढत जातो. इतके सहनशील एसेम्, पण तेसुद्धा अगतिकतेने त्यांना थांबवून प्रश्न काय आहे ते विचारतात. त्या गृहस्थांचा प्रश्न ऐकून संतापाने मी बॉल-पेन चावले ! प्रश्न म्हणजे.. आपलं... हा सेक्युलॅरिझम आहे...तर...म्हणजे अनेक कार्यकर्ते पुढं आले पाहिजेत... बोंबला ! हा काय प्रश्न आला ?

इथं कुणी लेकानं विरोध केलाय कार्यकर्ते पुढे यायला ? १० मिनिटे सर्वांचा अंत पाहणारी निर्बुद्ध बडबड केल्यावर विचारलेला हा मौलिक प्रश्न ऐकून दलवाईंनी हताशपणे आणि असहाय्यपणे मान हलवली.

फक्त तीनच तास उशीरा आलेल्या ना. रूपवत्यांनी परिसंवादाचा समारोप केला. अक्षरशः एकही नवीन विचार नव्हता. 'अस्पृश्यता एका वेगळ्या रूपाने प्रकट होत आहे. ती समाजाच्या रक्तात मुरली आहे. तेथूनच ती निपटून काढायला हवी. सेक्युलॅरिझम म्हणजे सर्व धर्मांबद्दल समान आदर...वगैरे.

बोलताना नकळत खेड्यावरची भाषा डोकावत होती. हे लोक आपल्या खेडवळ भाषेतच का बोलत नाहीत समजत नाही. त्या बोलीला सुद्धा एक 'ऱ्हिदम', एक गोडवा आहे, डौल आहे. पण हे खेड्यातलेच लोक न्यूनगंड म्हणा किंवा आणखी काही कारणमुळे मुद्दाम शहरी भाषेत बोलण्याचा अनावश्यक आणि बऱ्याच वेळा अयशस्वी खटाटोप करतात. जणू काही सेमिनारमध्ये ग्रामीण बोलणं चालणार नाही ! ती भाषा फक्त चावडीवरच बोलली जावी असं आहे काय ?

सर्वजण भराभर पळतात. परत येताना झगमगणाऱ्या पिवळ्या दिव्यांनी आणि किंचाळणाऱ्या लाऊडस्पीकर्सनी सेमिनारची धुंदी उतरवली. मनाची मरगळ घालवली. बहुतेक ठिकाणी 'इष्काची इंगळी' 'डसत' होती. किंवा 'कुणाची तरी उचकी' लागली होती. जनता जनता म्हणतात ती काही ना काही निमित्त शोधून उत्सव करत होती आणि विचारवंत गोखले इन्स्टि-ट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स मध्ये सेक्युलॅरिझमवर 'सेमिनार' भरवत होते.

□ □ □

# प्रतिद्वंद्वी कोण ?

पडदा

देवीदास बागूल

चित्रपटाला सुरुवात झाल्याबरोबर लक्षात आलं की, फिल्म बिघडलेली दिसते ! किंवा डब्यांची अदलाबदल तरी झाली असावी. म्हणजे पॉझिटिव्हच्या ऐवजी निगेटिव्ह रिळं असलेले डबे पाठवले की काय ? पडद्यावर सगळंच उलटसुलट झालंय की ! काळ्याच्या ठिकाणी पांढरं दिसतंय आणि पांढऱ्याच्या ठिकाणी काळं. काय भयानक दिसतंय हे ! थांबवा, थांबवा हा चित्रपट...

पण हे शब्द तोंडातून उमटण्याच्या आतच फिल्म सुरळीतपणे चालू होते. आता कसं जिथल्या तिथं दिसतं. पण मग मघा दाखवलेली फिल्म खरंच चुकीची होती की बरोबर ? चुकीची असेल कशी ? मग काय मुद्दामच तो भाग निगेटिव्ह दाखवला की काय ? म्हणजे नेहमी काळा दिसणारा भाग पांढरा दाखवून काही सुचवायचं होतं ? आणि ज्याला आपण सुरळीत चाललेलं म्हणतो ते भयानकही असू शकेल का ?

हा सत्यजित रे म्हणजे अफलातूनच दिसतोय ! मागे एकदा ह्यानेच जीवनातलं संगीत दाखवण्यासाठी 'पथेर पांचाली' चित्रपट काढला. आता जीवनातली विसंगती दाखवणार की काय ?

निगेटिव्ह संपल्यावर पडद्यावर एक कोवळा तरुण दिसतो. चारचौघांसारखा. पण थोडासा गंभीर जाणवतोय. माळावर उभा राहिल्यासारखा तो दिसत होता. पण आता झटक्यात एका मोठ्या शहरात अवतरल्यासारखं वाटतोय. आणि बसमध्ये बसून शहरातल्या रस्त्यातून धावतोय. हे धावणं संपेपर्यंत दिग्दर्शकमहाशय चित्रपटाची श्रेयनामावली उरकून घेताहेत.

आता तर त्याला मुलाखतीलाच आणून बसवलंय. आपल्या नायकाच्या हातात प्रमाणपत्रांचं भेंडोळंच दिसतंय की ! नायक बेकार म्हणजे शिक्षणबिक्षण संपवलं वाटतं ! असो. नायकमहाराजांचा नंबर लागल्यावर तिघांच्या समितीपुढे जाऊन बसतो. नम्र आणि लाचार दिसण्याऐवजी कसा उदास पण स्वत्व-

शील दिसतोय. म्हणजे नेहमीपेक्षा हे प्रकरण उलटं दिसतंय. काळचाच्या जागी पांढरं असल्यासारखं. निदान उत्तरं तरी चारचौघांसारखी द्या म्हणावं त्याला ! म्हणजे उत्तरं हुशारीची असावीत! पण जगावेगळी नसावीत. पण कसचं काय नि कसचं काय ? मुलाखतीची प्रश्नोत्तरं इंग्रजीत झाल्यानं झाला प्रकार कळला तरी. आपल्या नायकानं गेल्या दशकातली महत्त्वाची घटना म्हणून कोणती सांगावी ? व्हिएतनामी युद्ध. बोंबला. परीक्षक विचारतात की मानव चंद्रावर गेला ती गोष्ट महत्त्वाची नाही वाटतं ? आता तरी सावध होऊन नायकमहाराजांनी सारवासारवी करावी की नाही ? तुझ्या त्या तसल्या प्रांजळ उत्तरानं ते तुला कम्युनिस्ट समजून नोकरी देण्यापासून परावृत्त होतील ना ! पण हे सरळ वागणारे असले तर ना ! इतर लोक जगण्यासाठी द्वंद्व करणार असले तर आपले महाराज प्रतिद्वंद्वी. काळचाच्या जागी पांढरं. दुसरं काय ? फुटा आता इथून.

रस्त्यावर आल्यावर एके ठिकाणी एक मुलगी रस्ता ओलांडून येताना दिसते. तिची वक्ष:स्थळं किती उभारं दिसतात ! वाटतं की ह्या विषयात तरी नायकमहाराज चारचौघांसारखे डोळेभरून पहातील. पण छे ! सांगितलं ना, की हा माणूस प्रतिद्वंद्वी आहे म्हणून ! त्याला वक्ष:स्थळांच्या जागी काम दिसण्याऐवजी दिसतं शरीरविज्ञान आणि शरीरविज्ञानाचा तास...काय सांगत होते बरं सर त्या स्तनांच्या रक्तवाहिन्यांसंबंधी ? म्हणजे हा मेडिकलचा विद्यार्थी होता की काय ? जाऊ द्या. गेली ती मुलगी !

वेळ कसा घालवावा म्हणून तो चित्रपटाला जाऊन बसतो. पण मन रमण्याऐवजी कंटाळा येतो. नायकमहाराज तिथंच खुर्चीत मान टाकतात. कसा निरागस वाटतो त्या वेळी त्याचा चेहरा ! वाटतं की कसं होणार याचं या भल्याबुऱ्यांनी गजबजलेल्या जगात ?

घरी येतो तर कळतं की वहिणीनं ऑफिसात काहीतरी प्रकरण केलंय. हो भडकतो. वाटतं, की चला, सिनेमात गंमत सुरू होणार ! पण कसचं काय नि कसचं काय ? वहिणीवर हात उगारतानाच नायकाला आठवतं ते तिचं लहानपणाचं लडिवाळ रूप. कसं मारायचं हिला ? त्या वेळी झालेली नायकाची अवस्था किती हृदयस्पर्शी आहे ! आणि सुरुवातीला, म्हणजे निगेटिव्ह फिल्मच्या वेळी वाटलेली भयानकता आता कोठल्या कोठे जाऊन त्याऐवजी एक नितळ भावनाशीलता अलगदपणे तरळत राहते की नाही ?

सबंध चित्रपटभर हीच भावनाशीलता शीतल वाऱ्यासारखी झुळझुळत असते. मग तो प्रसंग मित्राने नर्सकडे कामवासना तृप्त करण्यासाठी नेल्याचा असो किंवा एका बंगल्यात दिवे गेल्यामुळे तिथल्या किशोरीने साहाय्यार्थ बोलावण्याचा असो...शेवटी तो जेव्हा शहरापासून दूरवर एका खेड्यात नोकरी-

**पृष्ठ ६२ वर**



# उदय कला केंद्र नाट्यसप्ताह




पुष्पा भावे

महाराष्ट्र राज्यसरकारने नाट्यस्पर्धा सुरू केल्यापासून अनेक 'हौशी' नाट्यसंस्था उदयाला आल्या. त्यातील काही नामशेषही झाल्या. वर्षाला एक नाट्यप्रयोग स्पर्धेत सादर करणे एवढेच यातील बऱ्याच संस्थांचे ध्येय होते. केवळ 'सरकारी' तांत्रिक अर्थाने त्या हौशी होत्या; परंतु त्या संस्थांपैकी फारच थोड्या संस्थांना नाट्यविषयक काही निश्चित निष्ठा, प्रायोगिकतेविषयीचा काही सुस्पष्ट विचार होता. स्पर्धेने उपलब्ध करून दिलेला प्रेक्षकवर्ग ही त्यांच्यालेखी केवळ सोय होती– संधी नव्हती. गेल्या काही वर्षामध्ये तर काही मातब्बर संस्थाही स्पर्धेच्या आडाख्यात बसतील अशी नाटके करू लागल्या आहेत. या संदर्भात 'उदय कला केंद्र' या नाट्यसंस्थेने सादर केलेली नाटके निश्चितपणे वेगळी उठून दिसतात. 'निखारे'पासून 'पाचोळा जळत नाहीए' या नाटकापर्यंत प्रत्येक नाटकात नाट्यरचनेचा वेगळा प्रयत्न आहे आणि तो प्रयत्न जाणून झालेली निर्मिती आहे. मराठी वाचकाला हौशी नाट्यसंस्थांच्या अर्थकारणाविषयी काही वेगळे सांगायला हवे असे नाही. अशा वेळी एका हौशी नाट्यसंस्थेने नाट्यसप्ताह साजरा करावा ही गोष्ट कौतुकास्पद आहे.

१९५२ ते १९७२ ही वीस वर्षे 'उदय कला केंद्र' अस्तित्वात आहे. १९६४ पासून राज्यनाट्यस्पर्धेत नाटके सादर करणाऱ्या या संस्थेला पाच वर्षे रंगभवन केंद्रातून प्रथम येण्याचा मान मिळाला आहे आणि गतवर्षी अंतिम फेरीत तेरा पारितोषिके मिळालेली आहेत. नाट्यनिर्मितीच्या अन्य तांत्रिक बाजूही कला केंद्राच्याच सभासदांनी सांभाळण्याच्या धोरणामुळे श्री. उमरोटकरांसारखा नेपथ्यकारही तयार झालेला दिसतो.

प्रस्तुत नाट्यसप्ताहामध्ये उदय कला केंद्राने 'ग्रॅण्ड रिडक्शन सेल', 'निखारे' 'का? असंच का?', 'चार एकां-

किका', 'पाचोळा जळत नाहीए', 'श्रीमंत पतीची राणी' व 'मी सुनील काव्र्हालो' हा नवा फार्स अशी नाटके सादर केली. वस्तुत: 'महाभारत: अपूर्व पर्व' हे संस्थेचे गाजलेले नाटक या सप्ताहात व्हायला हवे होते. केवळ त्या नाटकाला स्पर्धेत क्रमांक मिळाला नव्हता म्हणून या ऐतिहासिक दर्शनातून ते वगळायला नको होते. (कदाचित ते नाटक सादर न करण्यामागे दुसरेही काही कारण असेल)

श्री. रमेश चौधरी हे या 'उदय कला केंद्राचे दिग्दर्शक. (फ्रान्सचा अपवाद वजा करता) त्यांनी निवडलेल्या नाटकांविषयी सहसा फारसे बरे बोलले जात नाही. श्री. चौधरींना नाटकाची निवड जमत नाही असे अनेकांचे मत वारंवार ऐकू येते. परंतु मला मात्र वाटतं की त्यांनी प्रत्येक नाटक निवडताना वेगळे धाडस केले आहे. स्पर्धेसाठी नाटक करताना प्रायोगिकतेशी तडजोड केलेली नाही. त्यांनी निवडलेल्या नाटकांकडे दृप्टिक्षेप टाकताच एक गोष्ट ध्यानी येते ती ही की त्यातील ब-याच नाटकांचा कल सामाजिक आशयाकडे असूनही ती प्रतिकृतीवादी, सांकेतिक रचनेची नाटके नाहीत.

एखाद्या नाट्यसंस्थेसाठी नाटककाराने वेगळी प्रायोगिक नाटके मुद्दाम लिहून द्यावीत हे त्या संस्थेचे, त्यातील सभासदांचे, त्यांच्या दिग्दर्शकाचे कर्तृत्व फार मोठे आहे. 'ग्रँड रिडक्शन सेल' सारखे मराठीतील स्वीकृत नाटचरचनेविरुद्ध वंड करणारे नाटक श्री. शं. ना. नवरे यांनी 'उदय कला केंद्रा'साठी लिहावे यातच त्या केंद्राचे प्रायोगिकत्व सिद्ध होते. हे नाटक श्री. चौधरींनी ज्या तऱ्हेने सादर केले त्याविषयी मतभेद होतील. ('माणूस'च्या वाचकांना ते स्मरतही असतील) परंतु 'शन्नां'च्या 'पाचोळा' या कथेचे नाटक करण्याची कल्पना श्री. चौधरींना सुचावी हे लक्षणीय वाटते. कारण अजूनही मराठी वातावरणामध्ये चित्रपट वा नाटकाचे कथानक कादंबरीपेक्षा कथेला जवळचे असते हे भान क्वचितच दिसते.

'पाचोळा जळत नाहीए' या नाटकातील अनुभव खरे तर एकट्या सदू सोलापूरकरचा. तो नाट्यासारख्या समूहचित्राच्या माध्यमातून व्यक्त कसा होईल अशी साहजिक शंका मनात येते. परंतु नाटककाराने सदू सोलापूरकर आणि कुंदा यांच्या आयुष्याच्या कधीच भिडू न शकणाऱ्या समांतर रेषांमधून हे नाटक उभे केले आहे. सदूच्या वहिनीच्या करुण व्यक्तिचित्रातून सदूच्या आयुष्याचा विनाश चित्रित केला आहे. मराठी नाटकामध्ये, साहित्यामध्ये प्रेमळ वहिनी आणि खट्याळ दिराची चित्रे अनेकदा रंगवली गेली. किंबहुना त्या चित्रणाचा एक ठरीव सांचाही झालेला आहे. श्री. नवरे यांनी उभी केलेली वहिनी वेगळी आहे — तिचा नाट्यवस्तूशी अधिक निकटचा संबंध आहे. प्रारंभी सदू सोलापूरकरच्या मनात कुंदाविषयीचे प्रेम निर्माण व्हायला वहिनीची थट्टा निमित्त होते, तर पुढे

कुंदासाठी जळणाऱ्या सदूला, आपल्या पतीसाठी झुरणाऱ्या वहिनीचीच सोबत आहे. दुसऱ्यासाठी जळणारी ही दोन मनस्वी प्रेमळ माणसे अंती एकमेकाचा द्वेषही करू लागली आहेत. 'झुरणे' हा नाटचानुभव वहिनीच्या व्यक्तिरेखेमुळे अधिक गहिरा झाला आहे. असा अनुभव सांकेतिक सलग नाटचदर्शनातून व्यक्त करणे शक्य नसल्यामुळे अनेक दृश्यांतून या नाटकात मांडला गेला आहे. वहिनी –सदू, सदू-कुंदा, कुंदाचे आयुष्य, सदूच्या मनोविकृतीमुळे त्याच्या व्यवसायावर होणारे परिणाम, त्याच्या बुद्धीचा ढळलेला तोल (ज्योतिष्याकडे जाणे) आणि निवेदकाचा सदूशी संबंध ही सहा सूत्रे विविध दृश्यात गुंफलेलीआहेत.

अशा नाटकाचा प्रयोग सादर करून त्यातून एकसंध परिणाम घडविणे अत्यंत अवघड होते. परंतु श्री. चौधरी व त्यांचे सहकारी यांनी ते साधले. विशेषत: श्री. रविंद्र दिवेकर व सौ. सुधा पुरोहित यांच्या अभिनयातून नाटकातील शब्दांतर्गत सर्व नाजुक छटाही व्यक्त झाल्या. या नाटकातील विविध दृश्यांसाठी सूचक नेपथ्याचा वापरही श्री. उमरोटकर यांनी अत्यंत कल्पकतेने केला होता. 'पाचोळा जळत नाहीए' या नाटचप्रयोगातील जाणकारी आणि सफाई स्पर्धेतील प्रेक्षकांना अजूनही स्मरत असेल.

या सप्ताहाच्या निमित्ताने जो नवा फार्स सादर केला तो मला बघता आला नाही. परंतु सारखे असे वाटत राहिले की अशा प्रसंगी एखादे नवे आकांक्षी नाटक 'उदय कला केंद्रा'ने सादर करायला हवे होते. ज्या नव्या चार एकांकिका सादर करण्यात आल्या त्यातील फक्त 'जेम्स बॉन्ड–शर्विलक स्टाईल' ही एकांकिका 'उदय कला केंद्रा'ची होती. डॉ. रमेश रांगणेकर या नाटककाराच्या लेखनकौशल्याविषयी काय लिहावे ? आणि आश्चर्यकारक गोष्ट ही की एखाद्या महाविद्यालयीन स्पर्धेतही दिसणार नाही असा हास्यास्पद प्रयोग 'उदयकला केंद्रा'ने नाटचसप्ताहात सादर केला. पाठांतर नाही; हालचालींचे नियोजन नाही; एकूण बऱ्याच वर्षांनी 'भारतीय विद्या भवना'तील पडेल प्रयोगांची गंमत चाखायला मिळाली. 'उदय कला केंद्रा'ने यापेक्षा जबाबदारीने एकांकिकेची निवड व दिग्दर्शन करायला हवे होते. डोंबवलीच्या 'नवीन' या संस्थेने सादर केलेली 'पोस्टमॉर्टेम' ही श्री. दिलीप कोल्हटकरकृत एकांकिका कार्यक्षमतेने सादर केली गेली. बोरीवलीच्या 'अभिनाटच' संस्थेने 'हंगर स्ट्राईक' ही, पु. ल. देशपांडे पद्धतीच्या एकांकिकेचे विडंबनात्मक अनुकरण करणारी एकांकिका सादरकेली. त्यातील ज्या पोरकट विनोदाला व अभिनयाला प्रेक्षक दाद देत होते आणि 'नंदा पातकर स्पर्धे'च्या परिक्षकांनीही दाद दिली आहे ते पाहून हतबुद्ध व्हायला होते. त्या रात्रीच्या कार्यक्रमातील शेवटची एकांकिका 'सामना' श्री. सतीश आळेकर यांची असल्यामुळे तिच्याविषयी विशेष अपेक्षा होत्या. ठाण्याच्या 'मित्र सहयोग'

या संस्थेतर्फे श्री. अशोक साठे यांनी ही एकांकिका जाणीवपूर्वक सादर केली. त्यांनी व श्री. मेहेंदळे यांनी दोन म्हाताऱ्यांच्या भूमिकाही उत्तम वठवल्या. मला तर वाटते श्री. अशोक साठे यांनी आजवर केलेल्या भूमिकांचा विचार करता ही त्यांनी केलेली सर्वोत्कृष्ट भूमिका होय असे म्हणावे लागेल. श्री. साठ्यांप्रमाणेच इतर संस्थांच्या दिग्दर्शकांनी एकांकिकांची निवड व दिग्दर्शन नाट्यविषयीच्या मूलभूत कल्पनांची बूज राखणारे केले असते तर सप्ताहातील हौशी नाट्यसंस्थांच्या सहकार्याची ही कल्पना सफल झाली असती.

या नाट्यसप्ताहाचा विचार करताना डोळ्यांसमोर ठळक उभ्या रहातात रवींद्र दिवेकरांच्या भूमिका, सुधा पुरोहितची भूमिका, 'का ? असंच का ?'-मधील शीला वालावलकर व शशिकांत कारेकर यांच्या भूमिका, श्री. रमेश चौधरींचा 'सुखी' व सुहास म्हात्र्यांची 'सुधा' (श्रीमंत पतीची राणी), श्री. लीलाधर मयेकरांचा संतप्त तरुण, श्री. उमरोटकरांचे नाट्योपयोगी नेपथ्य, 'पाचोळा'तील विविध घटकांची सुजाण विचाररचना आणि असेच काही थोडे कमीजास्त !

या सप्ताहाच्या निमित्ताने काढलेल्या स्मरणिकेत श्री. चौधरी यांनी व्यक्त केलेली तृप्तीची भावना मात्र खटकली. अल्प साधनातून, संघभावनेने धडपडत या नाट्यवेड्या मुलांनी जे साध्य केले, ते कौतुकास्पद असले तरी स्वतुष्टतेच्या भावनेचा स्पर्शही प्रायोगिक संस्थांना होऊ नये असे वाटते. 'उदय कला केंद्रा'ची धडपड अशीच पुढे चालू राहावी, 'शन्नां'नी त्यांच्यासाठी वेगळी आकांक्षी नाटके लिहावीत आणि ती सादर करण्यासाठी अनेक सुजाण दिग्दर्शक, नट, नेपथ्यकार, संगीतकार निर्माण व्हावेत असे कोणाही रसिकाला वाटेल. त्याचसाठी 'उदय कला केंद्र' आणि त्याचे अनेक सभासद यांना मनःपूर्वक शुभेच्छा ! ◻ ◻ ◻

## प्रतिद्वंद्वी : पृष्ठ ५८ वरून


प्रतिद्वंद्वी : पृष्ठ ५८ वरून

साठी जातो तेव्हा त्याला कसे निवांत निवांत वाटते...त्या वेळी ऐकू येणारी पाखरांची किलबिल कशी मनाला जाऊन भिडते... हे संगीत आणि 'पथेर पांचाली'मधले संगीत ह्यांचे काहीच नाते नाही काय ?

सत्यजित चे चित्रपट पाहताना प्रथम बंगाली भाषेचा अडसर फार मोठा वाटतो. वाटते की हा माणूस जर आपला हट्ट सोडत नाही तर आपण तरी कशाला ह्याचे बंगाली सिनेमे पहायला जा ? नाहीतरी आपण धडपड करून गुजराती, कानडी, तामीळ सिनेमे तरी कुठे पहायला जातो ? मग ह्या बंगाली सिनेमाची तरी कशाला पर्वा करायची ? सत्यजितला हिंदी येत नाही म्हणून तो हिंदीत सिनेमा काढत नाही, आपल्याला बंगाली येत नाही म्हणून आपण त्याच्या सिनेमांना जाऊ नये.

पण हेही द्वंद्व टिकत नाही. माझा मित्र तर चक्क म्हणाला की, आता ह्या सिनेमांसाठी तरी बंगाली शिकले पाहिजे !

सत्यजिता, तूच जिंकलास बाबा ! ◻




# राजिनामे !

**१५** ऑगस्ट १९४६ साली भारत ऊर्फ स्पृश्यस्तान निर्माण झाले. स्पृश्य लढले. त्यांचे स्वातंत्र्य त्यांना मिळाले......

स्पृश्यांच्या रौप्यमहोत्सवी आनंदाचा विरस व्हावा ही विनंती......

—अनिल अवचट

—साधना । १५ ऑगस्ट ७२ अंक

एकदा ही अधिकृत, संपादकीय भूमिका घेतल्यावर राजा ढाले यांच्या 'काळा स्वातंत्र्यदिन' या लेखातील अभिव्यक्तीबद्दल संपादकांनी राजिनामे सादर करणे कचखाऊपणाचे लक्षण आहे. दलितांच्या भावना दलितांच्या भाषेत व्यक्त करण्याचा हा थत्ते-अवचट यांचा जाणीवपूर्वक प्रयत्न होता असे सुरुवातीच्या निवेदनावरून दिसते. मग दलित जे बोलतात—लिहितात ते शक्यतो मूळ स्वरूपात लोकांसमोर आलेले चांगले. उगाच संपादकीय संस्कार या नावाखाली काहीतरी चुकीची काटछाट करणे एकतर दलित लेखकावर अन्याय करणारे आहे. शिवाय यामुळे मूळ संपादकीय हेतुला बाध येतो ते वेगळेच.

शिवाय अभिव्यक्तीच्या अयोग्यतेबद्दलदेखील दोन संपादकात मतभेद असावेत असे वाटते. राष्ट्रध्वजाबद्दलचा उल्लेख एस्. एम., थत्ते या दोघांनाच अभद्र,निषेधार्ह वाटतो. अनिल अवचटांना तो केवळ 'बरा' वाटत नाही एवढेच. दुर्गाबाईसंबंधीच्या उल्लेखाबाबत मात्र या तिघांचेही एकमत आहे व ते योग्यच आहे. मग प्रश्न असा उद्‌भवतो, की दुर्गाबाइंचा फक्त अपवाद करून सर्व लेखाचे समर्थन करण्यासाठी निदान अवचटांनी तरी पुढे का सरसावू नये? राजा ढाले यांनी घेतलेला स्वातंत्र्य-विरोधी पवित्रा मुळात अवचटांना मान्य असावा असे एकूण त्यांच्या प्रारंभिक संपादकीय टीपेवरून दिसते. हे खरे असेल तर उगाच अभिव्यक्तीबाबत वादंग माजवण्यात, अर्थाची ओढाताण करण्यात मतलब नाही. ढाले आणि अवचट या उभयतांना स्वातंत्र्यदिन काळाच वाटत असेल तर एकाने ऐनवेळी राजिनामा सरकवून मोकळे व्हायला नको होते.

शिवाय राष्ट्रध्वज किंवा दुर्गाबाई याव्यतिरिक्त ढाले यांच्या लेखात अनेक उल्लेख असे आहेत, की इतरांच्या दृष्टीने तेही अक्षेपार्ह ठरावेत. टिळकांबद्दलचा उल्लेख थत्ते यांनाही खटकला. गीता-हिंदुधर्म यासंबंधीचे उल्लेख आणखी कुणाला खटकतील. वास्तविक थत्ते यांना हाही उल्लेख खटकायला हरकत नव्हती. कारण गांधी—विनोबा—माने-गुरुजी या परंपरेने गीतेला मातृस्थानी मानलेले आहे. इतर कुणाला मराठा

जात, शिवाजीमहाराज यांच्यासंबंधीचे ढाले यांचे लिखाण आक्षेपार्ह वाटू शकते. असे सगळे आक्षेपार्ह ठरू शकणारे भाग काटतछाटत जायचे तर या मूळ लेखाचाच शेवटी निकाल लागतो. संतप्तपणाची धार बोथट होते. न बोथटलेला लेख छापून रौप्यमहोत्सवी आनंदाचा पुरेसा विरस केल्यावर आता संपादक, लेखक या दोघांनीही जोडीने परिणामाला सामोरे जाणेच या क्षेत्रातील मूल्यांना अधिक उजळा देणारे ठरले असते.


शास्त्रीजींच्या रेल्वेमंत्रिपदाच्या राजिनाम्याचे आपल्याकडे भलतेच स्तोम माजवले जाते. मंत्री म्हणून शास्त्रीजींवर वास्तविक जबाबदारी अशी होती, की रेल्वे अपघाताला जबाबदार असणाऱ्यांना कडक शासन होते आहे की नाही ते पाहणे. अपघाताची योग्य कारणमीमांसा हुडकून, त्यावरील उपाययोजनांची अंमलबजावणी करून, उत्तरोत्तर अपघातांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करणे. अपघात हा काही धोरणात्मक पराभव नाही. मग राजिनामा कशासाठी ? बार्शी लाईट रेल्वेवरील एखाद्या नोकरदाराने बावटा न दाखविल्यामुळे झालेल्या अपघाताबद्दल दिल्लीतील मंत्र्याने राजिनामा देण्यात नैतिकता असलीच तर ती फार दूरान्वयाची व प्रतीकात्मक आहे. धोरण म्हणून साधनेच्या १५ऑगस्ट अंकाविषयी संपादक व लेखक यांच्यात एकमत असेल तर एखाद्या लेखातील अभिव्यक्तीच्या मुद्यावर जोर देऊन राजिनाम्याची घाई करण्याचे काहीच कारण नव्हते. दिलगिरी पुरेशी होती. स्पृश्यांना एकदा डिवचायचे, दुखवायचे ठरवल्यावर मग स्पृश्य दुखवले गेले, डिवचले गेले म्हणून वाईट वाटून घेण्यात काय अर्थ आहे ?

हजारो स्पृश्य, अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढण्यासाठी, दलितांना स्वाभिमानाने, बरोबरीच्या नात्याने जगता यावे म्हणून आजही आपापल्या कुवतीनुसार, आपापल्या क्षेत्रात प्रयत्नशील आहेत. यात सर्व जातींचे, सर्व थरातील लोक आहेत. यदुनाथ थत्ते यांचीही गणना अशांमध्येच करावी लागेल. स्वातंत्र्याची लढाई खेळतानाही स्पृश्यांचे हे भान तसे सुटलेले नव्हते. प्रमुख सेनानींनी याही आघाडीवर केलेल्या कामगिरीची नोंद डोळे उघडे ठेवून पाहणाऱ्याला सहज दिसू शकेल. हा सर्व इतिहास, ही परंपरा, हे वर्तमान नाकारून ढाले आणि परिवाराला दलितांच्या मुक्तीचा एकेरी व संकुचित लढा उभा करायचा आहे काय ? तो एक अदूरदर्शीपणा ठरेल. कम्युनिस्टांनी पूर्वी स्वातंत्र्यलढ्याकडे असेच एकांगी, आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले. ते जनतेपासून अलग पडले. आज गरज आहे सर्व दलितांनी, स्पृश्यास्पृश्यांनी एकत्र येण्याची. आर्थिक आणि सामाजिक-सांस्कृतिक इत्यादी सर्व आघाड्यांवरून दलित मुक्तीचा निष्ठापूर्वक प्रयत्न करण्याची. अशा प्रयत्नांना ढाले-अवचट यांची भूमिका निश्चितच अडथळा उत्पन्न करणारी आहे.

**श्री. ग. मा.**

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.



ब विभाग : वरील आकृति पाहून तुम्हास काय वाटते ?
उत्तर फक्त आठ-दहा शब्दातच असावे.

उत्तर :

माणूस साप्ताहिक : ९ सप्टेंबर १९७२ : किंमत ५० पैसे
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०. ५७३५९

## क विभाग

| | | |
|---|---|---|
| १. जयंत नारळीकर | हृदयरोग तज्ज्ञ | ( ) |
| २. डॉ. नरगुंद | अणू विज्ञान | ( ) |
| ३. डॉ. भाभा | वनस्पती शास्त्रज्ञ | ( ) |
| ४. सर जगदीशचंद्र बोस | थोर गणित तज्ज्ञ | ( ) |
| ५. डॉ. के. के. दाते | नोबेल पारितोषिक | ( ) |
| ६. सि. व्ही. रामन | रसायन शास्त्रज्ञ | ( ) |

भारतातील सहा प्रख्यात शास्त्रज्ञांची नावे व त्यांची कार्यक्षेत्रे वर दिलेली आहेत. पण या यादीत काही गडबड घोटाळा झालेला आहे. त्यामुळे या शास्त्रज्ञांच्या वर अन्याय होतो आहे असे आम्हाला वाटते. हा अन्याय तुम्ही दूर करा. शास्त्रज्ञांच्या पाठीमागे आम्ही दिलेला क्रमांक तुम्ही शास्त्रज्ञांच्या कार्यक्षेत्रापुढे ठेवलात की ही यादी दुरुस्त होईल. जसे डॉ. भाभांचा क्रमांक तीन हा तुम्हाला अणूविज्ञान या शब्दापुढे ठेवावा लागेल.

१. भटनागर पारितोषीक–

२. मिरर स्क्रिन–

३. नवे पूल–

४. रसायनम्–

५. लीलावती–

भारताच्या विज्ञान क्षेत्रातील पाच महत्वाच्या गोष्टी वर दिलेल्या आहेत. बाजूला दहा शास्त्रज्ञांची नावे दिलेली आहेत. त्यापैकी पाच शास्त्रज्ञ या पाच गोष्टींना जबाबदार आहेत. त्यातील योग्य शास्त्रज्ञांचे नाव योग्य गोष्टी-समोर लिहा.

शास्त्रज्ञांची यादी–
डॉ. जाधव, डॉ. भाभा, भास्कराचार्य, लिमये, डॉ. मराठे, शांतीस्वरूप भटनागर, कर्नल भटनागर, डॉ. टिळक, व्हेनचरानंद, श्री. भगत

स्पर्धकाचे नाव आणि पत्ता